सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह

सोलापूर | रविवार, २९ डिसेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ५३ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com





**सोलापूर – भवानी पेठ** – राठी सिमेंट, **नई जींदगी** – एस.ए.बडेपीर, **वि.डी घरकुल** – वैष्णवी स्टील, **न्यु पाच्चा पेठ** – हारूण स्टील, **होटगी रोड** – एम.आर.सेल्स, **शेळगी** – शहा ट्रेडर्स, **सिध्देश्वर पेठ** – बेसकर ॲण्ड कंपनी, **कुर्डुवाडी** – श्री.गणेश स्टील, **सांगोला** – महालक्ष्मी स्टील सेंटर, **माढा** – तांबोळी स्टील ॲण्ड हार्डवेअर, **पिंपळनेर** – डिमांड ट्रेडर्स, **नातेपुते** – पोतेकर एंटरप्रायजेस, **पंढरपूर** – दुर्गा स्टील, **मांडवे** – बालाजी ट्रेडर्स, **टेभुंर्णी** – श्री साई ट्रेडर्स, **बार्शी** – भराडीया स्टील, **करमाळा** – शिवम स्टील, **अक्कलकोट** – माशाळे स्टील, **मोहोळ** – तलफदार स्टील, **कुरूल रोड** – श्री.भैरवनाथ स्टील ट्रेडर्स, **अकलुज** – चकेश्वरा स्टील, **वैराग** – गांधी एजन्सी, **दहिताने** – एस. एस. मकंदर स्टील कॉर्पोरेशन, **जेऊर** – तांबोळी सिमेंट ॲण्ड मार्बल, **मरवडे** – सह्याद्री ट्रेडर्स, **मोडलिंब** – शिवाई ट्रेडर्स, **करकंब** – लक्ष्मी स्टील, **मंगळवेढा** – महालक्ष्मी ट्रेडर्स, **बेगमपूर** – सिध्दनाथ ट्रेडर्स, **वेळापूर** – रॉयल बिल्डींग सोल्युशन, **टाकळी** – गुरूकृपा ट्रेडर्स, **कंदलगाव** – श्री.केदारेश्वर हार्डवेअर ॲण्ड सिमेंट, **मुळेगाव** – आदित्य ट्रेडर्स, **महुद** – शेवाळे हार्डवेअर, **हुन्नूर** – लक्की ट्रेडर्स, **साळमुख** – त्रिमूर्ति स्टील, **माळसिरश** – अभिनंदन टाईल्स, **मैंदर्गी** – खलील ट्रेडर्स, **वसंत विहार** – पूजा स्टील, **श्रीपुर** – शक्ती स्टील अँड किसान मॉल, **भोसे (क)** – पटेल स्टील, **कुरूल** – जगदंबा हार्डवेअर, **सोड्डी** – ओम ट्रेडर्स, **तडवळ** – स्वामी समर्थ ट्रेडर्स, **टाकळी सिकंदर** – लक्ष्मी टाईल्स, **नरखेड** – राहुल एंटरप्रायझेस.

आयकॉन स्टील

टीएमटी बार




मेलबर्न क्रिकेट मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या चौथ्या कसोटी सामन्यात तिसऱ्या दिवशी आठव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या भारताच्या नितीशकुमार रेड्डीने कमालीची फलंदाजी केली. आपले पहिले शतक साजरे करताना त्याने संघाला संकटातून बाहेर काढले. शतक पूर्ण होताच नितीशने बाहुबली स्टाईलने आनंद साजरा केला, तो १०५ धावांवर नाबाद आहे

# डॉ. मनमोहनसिंग अनंतात विलीन

### निगमबोध घाटावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार ● राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधानांसह अनेक मान्यवर उपस्थित

◆ **नवी दिल्ली, २८ डिसेंबर**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या पार्थिवावर शनिवारी राजधानी दिल्लीतील निगमबोध घाटावर शासकीय इतमामात आणि शोकाकूल वातावरणात अन्त्यसंस्कार करण्यात आला.

यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनकड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, भूतान नरेश जिग्मे खेसर नमगायेल वांगचूक, मॉरिशसचे परराष्ट्र मंत्री धनंजय रामफूल, संरक्षण मंत्री राजनाथसिंह, गृहमंत्री अमित शाह, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे, काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियांका वढेरा, दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी यांच्यासह मोठ्या संख्येत मान्यवर उपस्थित होते. यावेळी चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान, लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, वायुदलप्रमुख अमरप्रीतसिंग आणि नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेशकुमार त्रिपाठी उपस्थित होते. डॉ. मनमोहनसिंग यांचे गुरुवारी रात्री अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेत (एम्स) वयाच्या ९२ व्या निधन झाले होते. आज सकाळी डॉ. मनमोहनसिंग यांचे पार्थिव त्यांच्या ३ मोतीलाल नेहरू मार्ग निवासस्थानावरून २४ अकबर रोड या काँग्रेस मुख्यालयात आणण्यात आले. काँग्रेस मुख्यालयातून मनमोहनसिंग यांच्या अन्त्ययात्रेला प्रारंभ झाला. सजवलेल्या तोफगाडीवर त्यांचे पार्थिव ठेवण्यात आले. कडेकोट बंदोबस्तात अन्त्ययात्रा ११ किमीचे अंतर पार करीत पावणेबाराच्या सुमारास निगमबोध घाटावर पोहोचली. अन्त्ययात्रेत काँग्रेस नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येत सहभागी झाले होते. निगमबोध घाटावर मनमोहनसिंग यांना तिन्ही सेनादलातर्फे मानवंदना देण्यात आली. ◂(तभा वृत्तसेवा)



माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या पार्थिवावर शनिवारी दिल्लीतील निगमबोध घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आला. तत्पूर्वी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासीयांच्या वतीने त्यांच्या पार्थिवाला पुष्पांजली अर्पण केली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अमित शाह, राजनाथसिंह आणि मान्यवर उपस्थित होते

### २१ फैरी झाडून मानवंदना

डॉ. मनमोहनसिंग यांची ज्येष्ठ कन्या उपिंदर कौर यांनी आपल्या पित्याच्या पार्थिवाला साश्रू नयनांनी मुखाग्नी दिला. यावेळी त्यांच्या पत्नी गुरशरण कौर आणि त्यांच्या अन्य दोन कन्या तसेच जावई उपस्थित होते. यावेळी त्यांना २१ बंदुकांच्या फैरी झाडून मानवंदनाही देण्यात आली.

## सई परांजपे यांना पद्मपाणी जीवनगौरव

◆ **छ. संभाजीनगर, २८ डिसेंबर**

दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची घोषणा करण्यात आली आहे. १५ ते १९ जानेवारी या दरम्यान हा महोत्सव छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न होणार आहे. या महोत्सवात भारतीय सिनेसृष्टीतील अतुलनीय योगदानाबद्दल दिला जाणारा पद्मपाणी जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शिका, पटकथाकार, निर्मात्या, लेखिका व नाटककार पद्मभूषण सई परांजपे यांना जाहीर करण्यात आला. ही घोषणा महोत्सवाचे संस्थापक नंदकिशोर कागलीवाल, प्रमुख मार्गदर्शक अंकुशराव कदम व महोत्सवाचे मानद अध्यक्ष आशुतोष गोवारीकर यांनी केली.



पद्मपाणी पुरस्कार निवड समितीने सई परांजपे यांच्या नावाची निवड केली. या समितीच्या अध्यक्षपदी लतिका पाडगांवकर तर सदस्यपदी चित्रपट दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर, सुनील सुकथनकर व चंद्रकांत कुलकर्णी यांचा समावेश होता. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व दोन लाख रुपये असे आहे. या पुरस्काराचे वितरण १५ जानेवारी रोजी होणार आहे. मागील चार दशकांहून अधिक काळापासून सई परांजपे भारतीय सिनेजगतात कार्यरत असून, त्यांनी दिग्दर्शित केलेल्या हिंदी सिनेमांनी भारतीय सिनेजगताला वेगळी ओळख प्राप्त करून दिली आहे. ◂(वृत्तसंस्था)

## महाकुंभात समुद्र मंथनाने उजळणार आकाश

### ▸ दोन हजार ड्रोन्स करणार किमया

**महाकुंभनगर, २८ डिसेंबर**

उत्तरप्रदेश पर्यटन विभाग समुद्र मंथनासह धार्मिक आणि आध्यात्मिकदृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या घटनांचे चित्रण करणारा ड्रोन शो संगम परिसरात आयोजित करण्याची योजना आखत असल्याने महाकुंभाला येणाऱ्या भाविकांना दिव्य दृश्य पाहता येणार आहे.

दर १२ वर्षांनी होणारा महाकुंभ १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी या कालावधीत प्रयागराज येथे होणार आहे. सायंकाळी संगमाजवळ ड्रोन शो आयोजित केला जाणार असल्याची माहिती राज्य सरकारने एका निवेदनातून दिली. गंगा, यमुना आणि पौराणिक सरस्वती नदीचा येथे संगम आहे.

कार्यक्रमाच्या उद्‌घाटन आणि समारोपाच्या वेळी ड्रोन शो होणार आहे, अशी माहिती जिल्हा पर्यटन अधिकारी अपराजिता सिंह यांनी दिली. जवळपास दोन हजार ड्रोन्सचा ताफा 'प्रयाग महात्म्यम्' आणि महाकुंभाच्या पौराणिक कथा जिवंत करेल. या नेत्रदीपक कार्यक्रमात पौराणिक समुद्र मंथन आणि अमृत कलशचा उदय, अशा ऐतिहासिक घटना दाखवल्या जातील, यात सायंकाळी आकाशात जादूई दृश्य दिसेल, असे अपराजिता सिंह यांनी सांगितले. या शोच्या माध्यमातून प्रयागराजचे धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्वही अधोरेखित केले जाईल तसेच भाविक व स्थानिकांना एक अनोखा अनुभव मिळेल. महाकुंभ २०२५ हा जगातिक सांस्कृतिक देखावा बनण्याच्या तयारीत आहे. आमची तयारी जोरात सुरू आहे.



या माध्यमातून मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे आध्यात्मिक तसेच आधुनिक महाकुंभाचे व्हिजन दिसून येईल. येथील मंदिरांची विकासकामे आणि सौंदर्यीकरणाची कामे वेगाने सुरू आहेत. यात गंगाघाट, वाहनतळ, रस्ते आणि प्रयागराजमधील उड्डाणपुलांचा समावेश आहे.

## बीड हत्येतील आरोपीची संपत्ती जप्त करा : मुख्यमंत्री

**मुंबई, २८ डिसेंबर**

बीड येथील संतोष देशमुख हत्याकांडातील फरार आरोपींची संपत्ती जप्त करण्याची प्रक्रिया सुरू करा, असा निर्देश मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुन्हे अन्वेषण विभागाच्या (सीआयडी) अतिरिक्त महासंचालकांना दिला आहे.



बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या ९ डिसेंबर रोजी झाली होती. या प्रकरणी मंत्री धनंजय मुंडे यांच्या निकटवर्तीय असलेले वाल्मीक कराडचे नाव येत असल्याने, हे प्रकरण हायप्रोफाईल झाले. विरोधक सदर प्रकरण तापवत ठेवण्याच्या प्रयत्नात आहे. काही भाजपा आमदारांनीदेखील धनंजय मुंडेविरोधात भूमिका घेतल्याचे शनिवारी झालेल्या मोर्चातून दिसून आले. दरम्यान, हे प्रकरण मुख्यमंत्री फडणवीस यांनी गांभीर्याने घेतले असून, देशमुख हत्याकांडातील फरार आरोपींची संपत्ती जप्त करण्याचा निर्देश त्यांनी सीआयडीच्या अतिरिक्त महासंचालकांना दिला.

यावेळी समोर आलेले बंदुकीसोबतच्या फोटोची पडताळणी करा आणि ते खरे असतील तर, त्या सर्वांचे बंदुकीचे परवाने रद्द करण्याची कार्यवाही करा, असा निर्देश बीडच्या पोलिस अधीक्षकांना दिला आहे. या हत्याप्रकरणात सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे आणि सुधीर सांगळे यांची नावे संशयीत मुख्य आरोपी म्हणून समोर आली आहेत. तर, वाल्मीक कराड या प्रकरणातील सूत्रधार असल्याचे बोलले जात आहे. सध्या हे सर्व आरोपी फरार असून, आता मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर या आरोपींच्या संपत्तीवर टाच येणार आहे.

## तालिबानी लष्कराचा पाकिस्तानवर हल्ला

**काबुल, २८ डिसेंबर**

मागील आठवड्यात केलेल्या हवाई हल्ल्याला प्रत्युत्तर देत अफगाणिस्तानच्या लष्कराने पाकिस्तानच्या काही ठिकाणांवर हल्ला केला, अशी माहिती तालिबानी संरक्षण मंत्रालयाने शनिवारी दिली.

अफगाणिस्तानच्या पूर्वेला असलेल्या पकटिका प्रांतात पाकिस्तानने मागील मंगळावारी हवाई हल्ला चढवत अतिरेक्यांच्या प्रशिक्षण केंद्रावर हल्ला केले होते. यात काही अतिरेकी आणि महिला व मुलांसह ४५ जण ठार झाले होते.

आमच्या लष्कराने काही पाकिस्तानी ठिकाणांना लक्ष्य केले. येथे दुर्भावनापूर्ण घटक आणि त्यांच्या समर्थकांसाठी केंद्रे होती. अफगाणिस्तानात हल्ले आयोजित करणे आणि समन्वयित करणारेही येथे होते, असे तालिबान संरक्षण मंत्रालयाने शनिवारी केलेल्या एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. तथापि, संरक्षण मंत्रालयाचे प्रवक्ते एनायतुल्लाह ख्वाझ्रमी यांनी हल्ल्याबाबत, तो कसा करण्यात आला आणि या हल्ल्यात जीवितहानी झाली का, याची कोणतीही माहिती दिली नाही. या हल्ल्यानंतर आग्नेय खोस्ट प्रांतातील लोकांनी आनंद वर्तवला, असे परराष्ट्र मंत्रालयाचे अधिकारी यांनी सांगितले. हजारो लोकांनी आनंद व्यक्त करीत पाकिस्तानच्या विरोधात अफगाणी लष्कराला समर्थन दिले.

## आपच्या महिला सम्मान योजनेला नायब राज्यपालांचा लाल झेंडा

**नवी दिल्ली, २८ डिसेंबर**

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर आपने घोषित केलेल्या महिला सम्मान योजनेच्या चौकशीचा आदेश नायब राज्यपाल विनयकुमार सक्सेना यांना दिला. एकप्रकारे आपच्या या योजनेला सक्सेना यांनी लाल झेंडा दाखवला आहे.

दिल्लीतील महिला मतदारांना आपकडे आकर्षित करण्यासाठी अरविंद केजरीवाल आणि मुख्यमंत्री आतिशी यांनी महिलांना दरमहा एक हजार रुपये देण्याची घोषणा केली. आप सत्तेवर आल्यावर ही राशी दरमहा २१०० रुपये करण्याचे आश्वासन आपने दिले. एवढेच नाही तर, यासाठी महिलांची नोंदणीही आपने सुरू केली.



महिला सम्मान योजनेच्या मुद्यावरून भाजपा आणि काँग्रेसने आपवर जोरदार हल्ला चढवला. आप घोषणा करते, पण त्या पूर्ण करीत नाही. पंजाब विधानसभा निवडणुकीच्या वेळीही आपने अनेक आश्वासने दिली होती, पण त्यांची पूर्तता केली नाही, असा आरोप काँग्रेस नेते संदीप दीक्षित यांनी केला.

भाजपा नेते प्रवेश वर्मा यांनीही आपवर हल्ला चढवला. पंजाबमध्ये दिलेली आश्वासने पूर्ण न करणारे केजरीवाल आता दिल्लीच्या महिलांना खोटी आश्वासने देत आहे, त्याची फसवणूक करीत आहे. आपने ही योजना सुरू केली नसतानाही महिलांचे खोटे कार्ड बनवले जात आहे. हा मोठा घोटाळा असल्याचा आरोप वर्मा यांनी केला. नायब राज्यपाल विनयकुमार सक्सेना यांनी मुख्य सचिवांना पत्र पाठवत महिला सम्मान योजनेच्या २१०० रुपयांची चौकशी करण्याचा आदेश दिला आहे. काँग्रेस नेते संदीप दीक्षित यांनी पंजाब पोलिसांच्या गुप्तचर विभागाचे अधिकारी आपल्या निवासस्थानी आले होते, असा दावा केला. त्याचीही चौकशी करावी. त्याचप्रमाणे दिल्लीच्या निवडणुकीत आपला पंजाबमधून पैसा मिळण्याची चर्चा आहे, त्याचीही चौकशी करावी, असे सक्सेना यांनी म्हटले आहे.

नायब राज्यपालांच्या आदेशावर केजरीवाल भडकले आहेत. महिला सम्मान योजना दिल्लीत होऊ नये, अशी भाजपा आणि काँग्रेसची भूमिका आहे. दिल्लीत आप सत्तेवर आली नाही, तर ही योजना बंद केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला.


सोलापूर

तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

भविष्याची सांगे दिशा 'सोलापूर तरुण भारत'ची

२०२५ दिनदर्शिका

● नव्या वर्षाची नवी कोरी दिनदर्शिका

● वर्षभर संग्रही राहील अशा वाचनीय मजकुरासह २४ पानांची रंगीत दिनदर्शिका

● प्रत्येक तारखेचा बारीक-सारिक तपशील

● तिथी वार, नक्षत्र, बारा राशींचे भविष्य, संकष्टी चतुर्थीचे गावोगावचे चंद्रोदय, योगासन, पर्यटन, हॉटेलिंग, आरोग्य विषयी भरगच्च मजकुरासह...



आजच आपल्या दिनदर्शिकेची अंक वितरकाकडे नोंदणी करा.

नोंदणीसाठी संपर्क : 8888847267

विको® — विश्वसनीय आयुर्वेद — १९५२ पासून

संपूर्ण स्वदेशी

हळद आणि चंदनाचे तेच नैसर्गिक गुण

आता नवीन पॅकमध्ये




विको टर्मरिक क्रीम

हळद आहे तर हेल्दी आहे

• Follow us on @viccolabs • Like us on /ViccoLabs
• Shop online at https://viccolabs.com • Customer Care No. 0712-2420890
• Stocks also available in old pack.

अधिक माहितीसाठी आणि खरेदी करण्यासाठी इथे स्कॅन करा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### हॉकी लीगमुळे खेळाबद्दलची समज वाढणार : प्रियोब्रात्रा

**नवी दिल्ली :** भारतीय पुरुष ज्युनियर हॉकी संघाचा बचावपटू तालीम प्रियोब्रात्रा याआधी मस्कत, ओमान येथे पुरुष ज्युनियर आशियाई चषक जिंकल्यानंतर हॉकी इंडिया लीग (एचआयएल) मधील यूपी रुद्रस फ्रॅन्चायझीसह वरिष्ठ स्तरावर आपला खेळ दाखवण्यास उत्सुक आहे. राऊरकेला येथे सुरू होणाऱ्या एचआयएलमध्ये २० वर्षीय स्टार प्रियोबर्टा भारतीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडूंसोबत खेळण्यास उत्सुक आहे. ऑक्टोबरमध्ये एचआयएल लिलावात लखनौस्थित फ्रॅन्चायझीने त्याला विकत घेतले होते. यूपी रुद्रस संघाचा एक भाग बनून मला खूप आनंद आणि उत्साही वाटत आहे. मला वाटते की खेळाडूंसाठी जगभरातीलच नव्हे तर भारतातील सर्वोत्तम खेळाडूंसोबत खेळण्याची ही एक उत्तम संधी आहे. ही स्पर्धा केवळ नाही. मला सर्वोत्कृष्ट गोष्टींकडून शिकण्याची संधी द्या पण मला खेळाबद्दलची समज वाढवण्यास मदत होईल, मी खरोखरच स्पर्धेची वाट पाहत आहे, असे प्रियोब्रात्रा म्हणाला. ज्युनियर आशिया चषक स्पर्धेतील आपला अनुभव सामायिक करताना, जिथे भारताने अंतिम लढतीत कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानला पराभूत केले होते. आम्ही या स्पर्धेतून दबावाखाली कसे खेळायचे आणि स्पर्धेत शिस्त कशी पाळायची हे शिकलो, असे तो म्हणाला. भारताला सुवर्णपदक जिंकण्यास मदत करणे हा एक चांगला अनुभव होता, असेही तो म्हणाला. ■

### ‘खेल रत्न’साठी हायकोर्टात जाईन : योगेश कथुनिया

**नवी दिल्ली :** प्रतिष्ठेच्या मेजर ध्यानचंद खेल रत्न पुरस्कासाठी निकषांची पूर्तता करूनही मी या पुरस्कारासाठी का पात्र ठरलो नाही, याविषयी क्रीडा मंत्रालयाकडून लेखी उत्तर मागण्यासाठी मी न्यायालयात जाणार आहे, दोन वेळा पॅरालिम्पिक पदक विजेता योगेश कथुनिया याने सांगितले. टोकियो आणि पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये रौप्य पदक जिंकणारा पॅरा-डिस्कस थ्रोअर, खेलरत्न पुरस्कारासाठी नामांकन न मिळाल्याने निराश झाला आहे. हा विषय क्रीडा मंत्रालयाचा आहे, परंतु त्यांनी आतापर्यंत माझ्याशी संपर्क साधला नाही. हे स्पष्ट पक्षपातीपणा आहे, ज्या खेळाडूंचे पीआर चांगले आहे त्यांना पुरस्कार मिळणे शक्य आहे. ते आमच्या सारख्या खेळाडूंकडे दुर्लक्ष करतात. अशा प्रकारचे वागणे एखाद्या खेळाडूसाठी निराशाजनक आहे. मी स्वतःसाठी खेळत असलो तरी भारताचे प्रतिनिधित्व करत आहे आणि जर मी जिंकलो तर भारत जिंकेल, असे कथुनियाने सांगितले. नोव्हेंबर २०२१ मध्ये राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्याकडून अर्जुन पुरस्कार मिळालेल्या कथुनियाने आपल्याला वगळण्यामागे क्रीडा मंत्रालयाकडून स्पष्टीकरण मागण्यासाठी हे प्रकरण न्यायालयात नेण्याचे ठरवले आहे.

### मेंडिस, अयुब, जोसेफला आयसीसी पुरस्काराचे नामांकन

**दुबई :** गस अॅटकिन्सन (इंग्लंड), कामिंदू मेंडिस (श्रीलंका), सैम अयुब (पाकिस्तान) आणि शामर जोसेफ (वेस्ट इंडीज) यांना २०२४ च्या आयसीसी पुरुष उदयोन्मुख क्रिकेटर ऑफ द इयर पुरस्कारासाठी नामांकन देण्यात आले आहे. जुलैमध्ये कसोटीत जबरदस्त पदार्पण करून गस अॅटकिन्सनने लक्षवेधक कामगिरी केली. २६ वर्षीय खेळाडूने वेस्ट इंडीजविरुद्ध लॉर्ड्स येथे ४५ धावांत ७ बळी टिपण्याची कारकिर्दीतील सर्वोत्कृष्ट कामगिरी केली. पुरुषांच्या कसोटी इतिहासात नवोदित खेळाडूची सर्वोत्तम आकडेवारी नोंदल्या गेली. त्यानंतर अॅटकिन्सनने इंग्लंडचा आघाडीचा वेगवान गोलंदाज म्हणून आपले स्थान पक्के केले. त्याने वेस्ट इंडीज आणि श्रीलंकेविरुद्ध घरच्या कसोटीत ३४ बळी घेतले आणि इंग्लंडच्या न्यूझीलंडमधील ऐतिहासिक मालिका विजयादरम्यान आणखी १२ विकेट्स मिळवल्या. कामिंडू मेंडिस २०२४ मध्ये श्रीलंकेच्या फलंदाजी क्रमाचा आधारस्तंभ म्हणून उदयास आला आहे. ■

# नितीश रेड्डीच्या शतकामुळे भारताचे आव्हान कायम

### वॉशिंग्टन सुंदरचे अर्धशतक

◆ **मेलबर्न, २८ डिसेंबर**

बॉक्सिंग-डे कसोटी क्रिकेट सामन्याच्या तिसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियाविरुद्ध नितीश कुमार रेड्डीने आपले पहिले कसोटी शतक झळकावून भारताला सामन्यात परत आणले आणि ऑस्ट्रेलियाच्या बॉक्सिंग-डे सामना जिंकण्याच्या आशा धूसर केल्या. ऑस्ट्रेलियाच्या ४७४ धावांच्या प्रत्युत्तरात नितीशच्या शतकाच्या बळावर भारताने दिवस अखेर पहिल्या डावात ११६ षटकांत ९ बाद ३५८ धावांची नोंद केली. पावसामुळे तिसऱ्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा नितीश नाबाद १०५ धावांवर, तर मोहम्मद सिराज नाबाद २ धावांवर खेळत होते. भारत अजून ११६ धावोनी पिछाडीवर आहे.



फटका मारताना वॉशिंग्टन सुंदर

मेलबर्न क्रिकेट मैदानाची खेळपट्टी गोलंदाजांना फारशी साथ देत नसल्याचे दिसत असल्यामुळे भारताला हा सामना वाचवणे फारसे कठीण जाणार नाही असे दिसत आहे.

नितीश रेड्डीच्या रुपाने भारताला एक धाडसी रत्न गवसला आहे. त्याने आठव्या क्रमांकावर फलंदाजी करताना भारताला संकटातून बाहेर काढले, ही फार कौतुकास्पद व अभिमानास्पद बाब आहे. रेड्डीची लढाऊ वृत्ती व त्याने वॉशिंग्टन सुंदरसोबत केलेली १२७ धावांची अमूल्य भागीदारी भारतासाठी टर्निंग पॉइंट ठरली.

भारताने ५ बाद १६४ धवांवरून पुढे तिसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली, मात्र भरवशाचा खेळाडू ऋषभ पंतला (२८) बोलॅण्डने लियोनकडून झेलबाद केले, तर रवींद्र जडेजाला (१७) लियोनने पायचित केले. हे दोघे बाद होताच भारताची स्थिती ६४.५ षटकांत ६ बाद २२१ अशी झाली होती.

मात्र, त्यानंतर नितीश कुमार रेड्डी व वॉशिंग्टन सुंदरने धैर्याने ऑस्ट्रेलियन गोलंदाजांचा सामना केला व भारताचा डाव सावरलाच नाही, तर भारताला सामन्यात परत आणले. नितीश कुमार रेड्डीने आपल्या कारकिर्दीतील पहिले कसोटी शतक झळकावले, वॉशिंग्टन सुंदरनेही अर्धशतकी खेळी केली. नितीश कुमार रेड्डीने १७६ चेंडूंत १० चौकार व एका षट्काराच्या मदतीने नाबाद १०५ धावांची खेळी केली, तर वॉशिंग्टन सुंदरने १६२ चेंडूंत एका चौकारासह ५० धावांचे योगदान दिले.

नॅथन लियोनने त्याला स्मिथकडे झेल सोपवण्यास भाग पाडले. त्यानंतर आलेला जसप्रीत बुमराह भोपळा न फोडताच पॅट कमिन्सच्या गोलंदाजीला बळी पडला. पावसामुळे खेळ थांबला तेव्हा नितीश कुमार नाबाद १०५ धावांवर, तर मोहम्मद सिराज नाबाद २ धावांवर खेळत होते.

ऑस्ट्रेलियाकडून पॅट कमिन्स व स्कॉट बोलॅण्डने प्रत्येकी ३ बळी, नॅथन लियोनने २ बळी टिपलेत. ◀(वृत्तसंस्था)

# अर्धशतक पूर्ण केल्यानंतर ‘पुष्पा’; शतक झळकावल्यानंतर ‘बाहुबली’

◆ **मेलबर्न, २८ डिसेंबर**

मेलबर्न क्रिकेट मैदानावर शनिवारी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या बॉक्सिंग-डे कसोटी सामन्यात भारताच्या नितीश कुमार रेड्डीने नाबाद शतकी खेळी करून भारताला संकटातून बाहेर काढले आणि ऑस्ट्रेलियाच्या आशेवर पाणी फेरले.

२१ वर्षीय नितीश कुमार रेड्डीने आपले अर्धशतक पूर्ण केल्यानंतर ‘पुष्पा’ पोझ दिली आणि शतक साजरे करताना नाटकीय ‘बाहुबली’ पोझ दिली. त्याची या दोन्ही पोझ चर्चेचा विषय ठरल्या.

नितीश कुमारच्या या खेळीचे दिग्गज सुनील गावस्करनेही सर्वात मोठी खेळी म्हणून गौरवाने उल्लेख केला.

भारताच्या ७ बाद २२१ धावा अशा स्थितीनंतर नितीश कुमार रेड्डी व वॉशिंग्टन सुंदरने ऑस्ट्रेलियन गोलंदाजांचा खरपूस समाचार घेत कमालीची फलंदाजी केली.

जसप्रीत बुमराह बाद झाला तेव्हा आंध्र प्रदेशचा युवा फलंदाज नितीश कुमार रेड्डी ९९ धावांवर खेळत होता, स्ट्राईकवर मोहम्मद सिराज होता. सिराजने ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सच्या तीन चेंडूंचा सामना केला. नंतर स्कॉट बोलॅण्ड गोलंदाजीला आला, नितीशने सामन्यातील ११४ व्या षटकांतील तिसऱ्या चेंडूवर चौकार हाणला आणि आपले शतक पूर्ण केले.



शतक पूर्ण केल्यावर बाहुबली शैलीत गुडघ्यावर बसून ईश्वराचे स्मरण करताना नितीश कुमार रेड्डी

नितीश कुमार व त्याचे वडील मुथ्याला यांनी बघितलेले कसोटी शतकाचे स्वप्न शनिवारी मेलबर्न मैदानावर ८३,०७३ प्रेक्षकांच्या उपस्थितीत पूर्ण झाले. नितीशच्या आनंद गगनात मावेनासा झाला. त्याने हेल्मेट बॅटसह संतुलित केले व मैदानावर गुडघे टेकवत बॅट उंचावत ईश्वराला व प्रेक्षकांना अभिवादन केले. प्रेक्षकांनीही उभे राहून त्याला दाद दिली. नितीश कुमार रेड्डीचे हे कारकिर्दीतले पहिले कसोटी शतक ठरले.

ज्या मेलबर्न मैदानावर अव्वल फिरकीपटू शेन वॉर्नने आपले ७०० वा कसोटी बळी टिपला होता आणि ज्या मैदानावर १९८५ साली बेन्सन अॅण्ड हेजेस विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामना जिंकल्याचा आनंद साजरा करताना रवी शास्त्री आडी कारमधून फिरला, त्या मैदानावर आज नितीश कुमार रेड्डीने आपले पहिले कसोटी शतक झळकावले. त्यामुळे नितीशला अश्रु अनावर झाले. ◀(वृत्तसंस्था)

# नितीशचे कुटुंब आनंदाने रडले

◆ **हैदराबाद, २८ डिसेंबर**

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या चौथ्या कसोटी सामन्यात भारताकडून आंध्र प्रदेशच्या २१ वर्षीय नितीश कुमार रेड्डीने आपले पहिले कसोटी शतक झळकावले, तेव्हा त्याच्या घरी त्याच्या कुटुंबीयांच्या डोळ्यातून आनंदाचे अश्रू वाहत होते. बीसीसीआयने त्या भावनिक क्षणाचा एक हृदयस्पर्शी व्हिडीओ समाजमाध्यमात सामायिक केला. हा व्हिडीओ त्याच्या पालकांना वाटलेला प्रचंड अभिमान आणि दिलासा दर्शवतो.



या व्हिडीओमध्ये, नितीशच्या आईला आपले अश्रू आवरत नाही. त्याचे वडील मुतायाला रेड्डी यांनी त्याच्याशी मनापासून मिठी मारली आणि त्याच्या बहिणीच्या चेहऱ्यावर आपल्या भावाच्या कर्तृत्वाबद्दल शुद्ध आनंद आणि प्रशंसा पसरली. हे यश केवळ खेळातील मैलाचा दगड नसून अनेक वर्षांच्या त्याग, संघर्ष आणि अतूट विश्वासाचा आहे, हेच या व्हिडीओतून स्पष्ट होते.

मुतायाला रेड्डी यांनी नितीशच्या क्रिकेटच्या स्वप्नाला पाठिंबा देण्यासाठी २०१६ मध्ये आपली नोकरी सोडली.

नितीश आज खूप छान खेळला. मला खूप अभिमान आहे. आम्ही खूप संघर्ष केला आहे. आम्ही भारतीय संघाचे आभारी आहोत, असे ते म्हणाले.

हा प्रवास सोपा नव्हता. मी एवढेच सांगू शकते की आम्हाला खूप अभिमान आहे आणि खूप आनंद झाला आहे, असे नितीशची बहीणही अभिमानाने म्हणाली.

नितीश स्वतः वारंवार आपल्या वडिलांच्या त्यागाबद्दल बोलतो व त्याने आपल्या क्रिकेट प्रवासाचे श्रेय त्यांना दिले आहेत.

माझ्या वडिलांनी माझ्यासाठी आपली नोकरी सोडली. ते आर्थिक संघर्ष करत होते, पण ते नेहमी माझ्या पाठीशी उभा राहिले. जेव्हा मी त्याला एकदा रडताना पाहिले, तेव्हा मी ठरवले की मला त्याचा अभिमान वाटावा यासाठी मला अधिक मेहनत करावी लागेल, असे नितीशने बीसीसीआयच्या व्हिडीओमध्ये म्हटले. ◀(वृत्तसंस्था)

### निक किर्गिओसची सिनर, स्वियातेकवर टीका

◆ **ब्रिस्बेन, २८ डिसेंबर**

ब्रिस्बेन इंटरनॅशनलमध्ये टेनिसमध्ये परत येण्यास काही दिवस शिल्लक असताना निक किर्गिओसने जॅनिक सिनर व इगा स्वियातेक यांच्यावर डोपिंग-संबंधित आरोपांचा संदर्भ देऊन जोरदार टीका केली आहे.

हे दोन्ही खेळाडू आमच्या टेनिस खेळासाठी घृणास्पद आहे, असे तो म्हणाला. आंतरराष्ट्रीय टेनिस इंटिग्रिटी एजन्सीने सिनर व स्वियातेकवर डोपिंग उल्लंघनाचे आरोप लावले आहे. सिनरने मार्चमध्ये अॅनाबॉलिक स्टिरॉइडसाठी दोनदा डोपिंग चाचणीत दोषी आढळला, परंतु त्याची बंदी टाळली कारण एजन्सीने ठरवले की तो दोषी नाही.

इगा स्वियातेकसुद्धा डोपिंग चाचणी दोषी आढळी, तरीही तिला नोव्हेंबरमध्ये एका महिन्यासाठीच निलंबित केले. या दोन खेळाडूंनी डोपिंग करणे आमच्या खेळासाठी घृणास्पद आहे. हे एक भयानक रूप आहे, असे किर्गिओस ब्रिस्बेन आंतरराष्ट्रीय पत्रकार परिषदेत म्हणाला. ◀(वृत्तसंस्था)

# पंतचा ‘तो’ फटका म्हणजे मूर्खपणा होता : गावस्कर

◆ **मेलबर्न, २८ डिसेंबर**

दिग्गज सुनील गावस्करने शनिवारी ऋषभ पंतला त्याच्या मूर्ख शॉटबद्दल फटकारले. भारताला यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंतची सर्वात जास्त गरज असताना त्याने नाहक आपली विकेट गमावून संघाला संकटाच्या दरीत ढकलले. पंतने मारलेला फटका मूर्ख फटका होता, असे गावस्कर म्हणाला.

ऑस्ट्रेलियाविरुद्ध एमसीजी येथे सुरू असलेल्या चौथ्या कसोटीच्या तिसऱ्या दिवशी मोठ्या भागीदारीची आतुरतेने वाट पाहत असताना पंतने स्कॉट बोलॅण्डला फाइन लेगवर फटकाण्याचा प्रयत्न केला व नॅथन लियोनकडे आपला सोपा झेल सोपविला.



पंतने बाद होण्यापूर्वी आधीचा फटका चुकीचा खेळला. तिकडे क्षेत्ररक्षक असताना पंतने पुन्हा तसाच फटका मारला आणि त्याचा डीप थर्ड मॅनने झेल पकडला. पंतचा मूर्ख फटका होता, अशा शब्दात गावस्करने त्या फटक्याबद्दल आपला संताल व्यक्त केला. भारतीय संघाची परिस्थिती समजून घेणे आवश्यक आहे. हा तुमचा नैसर्गिक खेळ आहे असे तुम्ही म्हणू शकत नाही. तो एक मूर्ख शॉट आहे. संघ खराब झाला आहे, असे गावस्कर म्हणाला. भारताचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी हा खूप जोखमीचा फटका असल्याचे म्हटले आहे. ◀(वृत्तसंस्था)

### स्कॉट बोलॅण्डने केले नितीश रेड्डीचे कौतुक

◆ **मेलबर्न, २८ डिसेंबर**

ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज स्कॉट बोलॅण्डने भारतीय फलंदाज नितीश कुमार रेड्डीच्या तडाखेबंद फलंदाजीचे मुक्तकंठाने प्रशंसा केली. नितीशक या भारतीय फलंदाजाकडे क्रिकेटच्या पुस्तकातील प्रत्येक शॉट आहे, त्याची फटकेबाजी पाहून त्याच्या क्षमतेची खात्री पटली, असे स्कॉट बोलॅण्ड म्हणाला. रेड्डीने स्कॉट बोलॅण्डवर सरळ ड्राईव्ह मारून आपले कसोटी शतक पूर्ण केले. रेड्डीने नाबाद १०५ धावा केल्यामुळे भारताने पहिल्या डावात ९ बाद ३५८ धावांपर्यंत मजल मारली आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे येथील चौथ्या कसोटी सामन्यात भारताला विजयाची संधी दिली. हो, अर्थातच तो खरोखर छान खेळत आहे. तो तळाच्या फळीतील फलंदाज आहे, परंतु तो आमच्यावर पुन्हा दबाव आणण्याचा प्रयत्न करीत आहे, असे बोलॅण्ड सामन्यानंतर म्हणाला. ◀(वृत्तसंस्था)

# लक्ष्य सेनची उपांत्य फेरीत धडक

### किंग चषक आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन

◆ **शेन्झेन, २८ डिसेंबर**

भारताचा अव्वल मानांकित पुरुष बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनने हाँगकाँगच्या अँगस एनजी का लाँगवर विजय नोंदवून येथे आयोजित किंग चषक आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली.

जागतिक क्रमवारीत १२व्या स्थानावर असलेल्या लक्ष्य सेनने जागतिक क्रमवारीत १७व्या क्रमांकावर असलेल्या का लाँगचा १०-२१, २१-१३, २१-१३ असा पराभव केला. सामन्याच्या सुरुवातीला लक्ष्य संथपणे खेळला, परिणामी त्याने पहिला गेम गमावला, मात्र दुसऱ्या व तिसऱ्या गेममध्ये त्याने आक्रमक पवित्रा घेतला व सामन्यात वर्चस्व गाजवले.



लक्ष्याचा अँगस एनजी का लाँगवर गत चार सामन्यातील हा पहिला विजय ठरला. या दोन्ही खेळाडूंचा शेवटचा सामना २०२३ मध्ये मलेशिया मास्टर्समध्ये झाला होता व यात अँगसने २१-१४, २१-१९ असा सामना जिंकला होता.

उपांत्य फेरीत लक्ष्यचा सामना चीनच्या १८ वर्षीय हु झियान एनशी होईल. हु झियान एनने अन्य सामन्यात माजी विश्वविजेत्या लोह कीन य्यूचा पराभव केला. झियान वरिष्ठ क्रमवारीत १८३ व्या क्रमांकावर आहे.

पॅरिस २०२४ चा रौप्यपदक विजेता आणि थायलंडचा विद्यमान जगज्जेता कुनलावुत विटिडसर्न, डेन्मार्कचा जागतिक क्रमवारीत २ क्रमांकाचा अँडर अँटोन्सेन, फ्रान्सचा अॅलेक्स लॅनियर चीनचा वांग झी जून हे किंग चषकात विजेतेपदासाठी झुंज देत आहेत. या स्पर्धेदरम्यान दिग्गज लिन डॅन व तौफिक हिदायत यांच्यादरम्यान प्रदर्शनीय सामना खेळला जाणार आहे. चीनच्या दोन वेळा ऑलिम्पिक विजेत्या लिन डॅनने ही स्पर्धा सुरू केली आहे. ◀(वृत्तसंस्था)

### केरळ ब्लास्टर्स, जमशेदपूर एफसी यांच्यात लढत

**जमशेदपूर :** जमशेदपूर एफसी रविवारी येथील जेआरडी टाटा क्रीडा संकुलात इंडियन सुपर लीग (आयएसएल) २०२४-२५ मध्ये केरळ ब्लास्टर्स एफसीविरुद्धच्या सामन्यात लढणार आहे.

दोन्ही संघांनी अव्वल सहा क्रमांकात स्थान मिळविण्याचे लक्ष्य ठेवले आहे. मागील पाच सामन्यांमध्ये दोनदा विजय आणि तीनदा पराभव पत्करलेल्या सारख्याच फॉर्मच्या जोरावर दोन्ही संघ या सामन्यात उतरणार आहे. जमशेदपूर एफसी ११ सामन्यांत सहा विजयांसह १८ गुणांसह गुणतालिकेत आठव्या स्थानावर आहे. केरळ ब्लास्टर्स एफसी १० व्या स्थानावर असून त्यांनी १३ सामन्यातून १४ गुण मिळवले आहे. त्यांनी चार विजय नोंदविले व दोन अनिर्णीत राखल्या. ■

# आयसीसी पुरस्कारासाठी श्रेयंका पाटीलला नामांकन

### चार खेळाडू पुरस्काराच्या शर्यतीत

◆ **दुबई, २८ डिसेंबर**

भारताची युवा फिरकीपटू श्रेयंका पाटील हिची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील उत्कृष्ट कामगिरीमुळे आयसीसी महिला उदयोन्मुख क्रिकेटर ऑफ द ईयर पुरस्कारासाठी नामांकन करण्यात आले आहे.

श्रेयंका पाटील हिच्यासोबत दक्षिण आफ्रिकेच्या अॅनेरी डेर्कसेन, स्कॉटलंडच्या सास्किया हॉर्ले व आयर्लण्डच्या फ्रेया सार्जेंट यांनाही या पुरस्कारासाठी नामांकन देण्यात आले आहे.



कर्नाटकातील २२ वर्षीय ऑफ-स्पिनर श्रेयंकाने डिसेंबर २०२३ मध्ये महिला कॅरेबियन प्रीमियर लीगमध्ये खेळणारी पहिली भारतीय म्हणून इतिहास घडवला आणि तेव्हापासून सर्व फॉरमॅटमध्ये छाप पाडली.

डिसेंबर २०२३ मध्ये पदार्पण केल्यापासून तिने खेळलेल्या १३ टी-२० सामन्यांमध्ये श्रेयंका पाटीलने १५ बळींची नोंद केली आहे. तिने खेळलेल्या दोन एकदिवसीय सामन्यांमध्ये चार बळी घेतले.

महिला टी-२० आशिया चषक आणि टी-२० विश्वचषक यांसारख्या प्रमुख स्पर्धांमध्ये सहभागी होण्याशिवाय ऑस्ट्रेलिया, बांगलादेश आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या द्विपक्षीय मालिकांमध्ये खेळून पाटील या वर्षी भारताच्या संघात सातत्यपूर्ण उपस्थिती दर्शवत आहे.

श्रेयंका पाटीलच्या प्रयत्नांमुळे पाकिस्तानला गट साखळी सामन्यात ८ बाद १०५ धावांपर्यंत रोखण्यात मदत झाली व भारताला १९ षटकांत लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करता आला. श्रेयंका गोलंदाजीसाठी ओळखली जात असताना, ती तळाच्या फळीतील एक सक्षम फलंदाज आहे. ◀(वृत्तसंस्था)

# हरयाणा, पाटणा अंतिम सामना आज

### अकरावा प्रो-कबड्डी लीग हंगाम

◆ **पुणे, २८ डिसेंबर**

अडीच महिन्यांच्या काळात झालेल्या संघर्षपूर्ण व रोमांचक १३६ सामन्यांनंतर अकराव्या प्रो-कबड्डी लीग हंगामाची सांगता रविवारी, बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात हरयाणा स्टीलर्स आणि पाटणा पायरेट्सचा यांच्यादरम्यानच्या अंतिम सामन्याने होणार आहे. या अंतिम सामन्यातून अकराव्या प्रो-कबड्डी लीग हंगमाता नवीन विजेता ठरणार आहे.

शुक्रवारी खेळल्या गेलेल्या उपांत्य सामन्यात हरयाणा स्टीलर्सने युपी योद्धावर २८-२५ असा तीन गुणांनी विजय मिळविला, तर पाटणा पायरेट्सने चिवट झुंज देत दबंग दिल्लीवर (३२-२८) चार गुणांनी वर्चस्व गाजविले व स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली.



आता हा अंतिम सामना केवळ विजेतेपदासाठीचा संघर्ष नसून हे तत्त्वज्ञानांमधील युद्ध आहे. पाटणा पायरेट्सच्या धाडसी, सर्वांगीण आक्रमणाविरूद्ध हरयाणा स्टीलर्सची बचावात्मक खेळी अशी ही लढाई आहे.

गत वर्षीच्या उपविजेत्या हरयाणा स्टीलर्सने या हंगामाच्या प्रारंभीच आपले पहिले विजेतेपद पटकावण्याचे लक्ष्य ठेवले व त्यानुसार साखळी फेरीत सरस कामगिरी बजावत अंतिम गुणतालिकेत अव्वल स्थान मिळवले व उपांत्य फेरीच्या लढतीत युपी योद्धाविरुद्ध संघर्षपूर्ण विजय मिळवून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले.

मोहम्मदरेझा चियानेह शादलौई आणि उजवीकडे राहुल सेठपाल यांच्या नेतृत्वाखालील हरयाणा स्टीलर्सनने उत्तमपणे बचावात्मक खेळी केली. कर्णधार जयदीप दहिया आणि दिग्गज संजय धुल यांची संरक्षणात्मक भिंतीला साथ असेल. मनप्रीत सिंग यांच्या प्रशिक्षित संघ चांगल्या फॉर्ममध्ये आहे. विनय आणि शिवम पटारे ही जोडी चांगलीच फॉर्मात आहे.

आम्ही संपूर्ण स्पर्धेत कबड्डीला १०० टक्के योगदान दिले आणि त्यामुळे आम्हाला यश मिळाले. पाटणा हा खूप चांगला संघ आहे पण आम्ही अंतिम सामन्यासाठी आमचा दृष्टिकोन बदलणार नाही, असे हरयाणा स्टीलर्सचा कर्णधार जयदीप म्हणाला.

दुसरीकडे, पाटणा पायरेट्सने पाचव्यांदा प्रो-कबड्डी लीगच्या अंतिम फेरीत स्थान मिळविले आहे. पीकेएलच्या अंतिम फेरीत पोहोचणे हा खरोखरच उल्लेखनीय प्रवास होता. त्यांना आपल्या आक्रमक फळीवर मोठा विश्वास आहे. ◀(वृत्तसंस्था)

# अर्जुनला संयुक्त आघाडी

### जागतिक रॅपिड व ब्लिट्झ बुद्धिबळ

### नियमाचा भंग केल्यामुळे मॅग्नस कार्लसनला दंड

◆ **न्यूयॉर्क, २८ डिसेंबर**

येथे सुरू असलेल्या जागतिक जलद व ब्लिट्झ बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय ग्रॅण्डमास्टर अर्जुन एरिगायसीने आपल्या कौशल्यपूर्वक खेळाचे प्रदर्शन करत नवव्या फेरी अखेर चार खेळाडूंसह संयुक्तपणे आघाडी मिळविली.

पोलंडच्या डुडा जान-क्रिझस्टोफसह रशियन व्होलोदार मुर्झिन आणि अलेक्झांडर ग्रिस्चुकने नवव्या फेरीनंतर अर्जुनसह सात गुणांसह संयुक्त आघाडी घेतली आहे. स्पर्धेत १३ फेऱ्यांनंतर सर्वोत्तम खेळाडू ठरेल.


मॅग्नस कार्लसन

स्पर्धेत पाचवेळचा विश्वविजेता नॉर्वेच्या मॅग्नस कार्लसन जीन्स परिधान करून आला. त्यामुळे कार्लसनने फिडेच्या ड्रेस कोडचे पालन केले नाही. त्यामुळे त्याला दंड आणि आजच्या दिवसासाठी अपात्र ठरवण्यात आले.

गतविजेत्या कार्लसनला जीन्स परिधान केल्याबद्दल २०० डॉलर्सचा दंड ठोठावण्यात आला.

मुख्य पंच अॅलेक्स होलोझॅक यांनी कार्लसनला ताबडतोब पोशाख बदलण्याची विनंती केली, परंतु त्याने नाकारली. त्यामुळे त्याला अपात्र ठरवण्यात आले आणि रॅपिडच्या ९व्या फेरीसाठी त्याला प्रवेश देण्यात आला नाही.

कार्लसनच्या माघारीमुळे, अर्जुनची जिंकण्याची शक्यता नाटकीयरित्या वाढली आहे. १० व्या फेरीत भारतीय ग्रॅण्डमास्टर अर्जुनचा सामना ग्रिशुकशी होणार आहे.

महिला विभागातही भारतीय पदकाची आशा बळावली आहे. कोनेरू हम्पीने पहिल्या फेरीतील पराभवानंतर चार डाव जिंकून देशबांधव डी. हरिका आणि चीनच्या वेनजुन जूसह ६.५ गुणांसह आघाडी घेतली. हरिका आपल्या सर्वोत्तम कामगिरीवर असताना हम्पीने आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करून आगेकूच केली. आता स्पर्धेत केवळ तीन फेऱ्या शिल्लक असताना, पुढील सामन्यात हम्पी-जू यांच्यादरम्यानच्या लढतीनंतर बरेच काही चित्र स्पष्ट होईल. ◀(वृत्तसंस्था)

### न्यूझीलंडचा श्रीलंकेवर ८ धावांनी विजय

◆ **माउंट मौनगानुई, २८ डिसेंबर**

डॅरिल मिशेल व मायकेल ब्रेसवेलने सहाव्या गड्यासाठी केलेल्या १०५ धावांच्या भागीदारीच्या बळावर न्यूझीलंडने शनिवारी पहिल्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात श्रीलंकेवर ८ धावांनी रोमांचक विजय मिळवला व तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या न्यूझीलंडने मर्यादित षटकांत ८ बाद १७२ धावा ठोकल्या. प्रत्युत्तरात श्रीलंकेला ८ बाद १६४ धावांपर्यंतच मजल मारता आली. २१ धावांत ३ बळी टिपणारा न्यूझीलंडचा जेकब डफी सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. डॅरील मिचेलने ४२ चेंडूंत ४ चौकार व २ षट्कारांसह ६२ धावांचे, तर मायकेल ब्रेसवेलने ३३ चेंडूंत ४ चौकार व ४ षट्कारांसह ५९ धावांची खेळी केली. ◀(वृत्तसंस्था)

# आमदार सुरेश धस यांनी माझी जाहीर माफी मागावी : प्राजक्ता माळी

## मुख्यमंत्र्यांकडे आज तक्रार करणार





**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि.२८ डिसेंबर-**

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडामुळे राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त होत असताना भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर टीका करताना केलेली शेलक्या शब्दातील टोलेबाजी त्यांच्या अंगलट येण्याची शक्यता आहे मराठी अभिनेत्री प्राजक्ता माळी यांच्या संदर्भ जोडून त्यांनी केलेल्या वक्तव्याबद्दल प्राजक्ताने तीव्र आक्षेप घेतला असून धस यांनी तातडीने जाहीर माफी मागावी, अशी मागणी केली आहे.

धस यांच्या वक्तव्याच्या विरोधात राज्य महिला आयोगाकडे तक्रार केली असून याप्रकरणी रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार करणार असल्याचे त्यांनी शनिवारी मुंबईत पत्रकार परिषदेत सांगितले.

सुरेश धस यांनी शुक्रवारी बीडमध्ये पत्रकारांशी बोलताना मुंडे यांच्यावर टीका करताना प्राजक्ता माळी व अन्य मराठी अभिनेत्रींनी परळीमध्ये केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचा उल्लेख केला होता. हा वेगळा परळी पॅटर्न असल्याची उपरोधिकपणे उल्लेख केला होता. त्यामुळे संतापलेल्या प्राजक्ता माळी यांनी त्याबाबत राज्य महिला आयोगाकडे धाव घेतली आहे तसेच मुंबई मराठी पत्रकार संघात पत्रकार परिषद घेऊन धस यांच्या वक्तव्याचा तीव्र निश्चित केला. त्या म्हणाल्या,

एका सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सत्कार स्वीकारताना काढलेला फोटो ती आमची एकमेव भेट आहे. धन्यवाद हा आमच्यातील एकमेव संभाषण आहे'', गेले दीड महिने अत्यंत शांतपणाने मी या सगळ्याला सामोरे जात होते. ट्रोलिंग आणि नेगेटिव्ह कमेंट्सला सामोरे जात आहे. ही माझी शांतता मूक संम्मती नाही. ही कलाकाराची हतबलता आहे. एक व्यक्ती रागाच्या भरात बोलते. त्या दोन वाक्याचे हजारो वाक्य बोलले जातात. चिखलफेक चालू राहते, महिलांची अब्रू निघत राहते, सर्वांचे मनोरंजन होतं राहतं म्हणून यात पडले नव्हते हा विषय खोटा आहे. त्याला काही बेस नाही.आपल्यासाठी न्याय मागावा आपल्या हक्कांचं रक्षण करावे ,अशी ज्यांच्याकडून आपली अपेक्षा आहे. अशी मंडळी जेव्हा चिखलफेक करतात तेव्हा ही गोष्ट गांभीर्याने घ्यावी वाटली. म्हणूनच मी तुम्हाला सगळ्यांसमोर आले. जसेंच्या वक्तव्याबद्दल आपण मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे तक्रार करणार असून त्यांनी यापुढे कोणत्याही महिलाबद्दल, कलाकारांबाबत असे आक्षेपार्ह उल्लेख करू नये, यासाठी कठोर कारवाई करण्याची मागणी करणार आहे.

करूणा शर्मा यांनी केलेल्या वक्तव्याबाबत त्यांना यापूर्वीच नोटीस बजावली आहे. त्यानंतर त्यांनी पुन्हा त्याबाबत वक्तव्य केलेले नाही असे त्यांनी स्पष्ट केले.

### माफी मागणार नाहीः सुरेश धस

अभिनेत्री प्राजक्ता माळी यांच्या बद्दल आपण कोणतेही आक्षेपार्ह वक्तव्य केलेले नाही. मी जे बोललेले पुन्हा पाहू शकतात त्यामुळे त्यांची माफी मागण्याचा प्रश्नच उद्भवत नाही असे प्रत्युत्तर भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी दिले आहे ते म्हणाले ते जर माझा निषेध करत असतील तर मी यापुढे त्यांच्या हास्यजत्रा कार्यक्रमाचाही निषेध करीन ,तो मी बघणार नाही,असे सांगितले.

# अजित पवारांनी दिल्ली विधानसभेच्या रिंगणात उतरविले ११ उमेदवार

◆ **मुंबई, २८ डिसेंबर**

पुढील वर्षी फेब्रुवारी महिन्यात होऊ घातलेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे ११ उमेदवार उतरविले आहेत.

दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी निवडणुकीची घोषणा नवीन वर्षाच्या सुरुवातीला होण्याची शक्यता आहे. यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. दिल्लीच्या राजकीय आखाड्यात भाजपा, आम आदमी पार्टी आणि काँग्रेस हे तीन प्रमुख पक्ष असतातच. मात्र, यात आता भर पडली असून, अजित पवारांनी देशाच्या आर्थिक राजधानीतून थेट राजधानीच्या निवडणूक रिंगणात अचानकपणे उडी घेतली.पक्षाने ११ उमेदवारांची नावे जाहीर केली असून, यात बदली येथून मुलायम सिंह, बुराडीतून रतन त्यागी, चांदनी चौकमधून खालिद उर रहमान, बल्ली मारनमधून मोहम्मद हारुन आणि ओखलामधून इम्रान सैफी, छतरपूरमधून नरेंद्र तंवर, लक्ष्मीनगरमधून नमहा, गोकुळपुरीतून जगदीश भगत, मंगोलपुरीतून खेम चंद, सीमापुरीतून राजेश लोहिया आणि संगम विहारमधून कमर अहमद यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. दिल्ली विधानसभेची निवडणूक फेब्रुवारीमध्ये होण्याची शक्यता आहे. या विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवार जाहीर करण्यात आम आदमी पक्ष आघाडीवर आहे. या पक्षाने सर्व उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. काँग्रेसनेही दोन याद्या जाहीर केल्या असून, ७० पैकी ४७ जागांसाठी उमेदवार जाहीर केले आहेत. त्याचवेळी भाजपाकडून अद्याप उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आलेली नाहीत.

भाजपा मित्रपक्षांसोबत दिल्ली विधानसभा निवडणूक लढवू शकते, मित्रपक्षांना काही जागा देऊ शकते. जनता दल युनायेड, लोक जनशक्ती पार्टी आणि जीतन राम मांझी यांच्या हिंदुस्थानी अवाम मोर्चाने भाजपाकडे दिल्लीत जागांची मागणी केली आहे. २०२० च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने जदयूला दोन आणि लोक जनशक्ती पक्षाला एक जागा दिली होती. त्यामुळे भाजपा यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसला सुद्धा काही जागा सोडून सोबत घेतो की, राकाँ स्वतंत्र निवडणूक लढेल, हे येत्या काळात कळणार आहे. (तभा वृत्तसेवा)

# बँक घोटाळ्यांमध्ये तब्बल आठपट वाढ

## २०२४-२५च्या पहिल्या सहामाहीत विक्रम

◆ **नवी दिल्ली, २७ डिसेंबर**

२०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत बँक घोटाळ्यांत वार्षिक आधारावर आठपट वाढ झाली आहे. या कालावधीत १८,४६१ प्रकरणांत २१,३६७ कोटी रुपयांचे बँक घोटाळे झाले. भारतीय रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या आकडेवारीतून ही माहिती समोर आली.

रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या 'भारतातील बँकिंग कल आणि विकास २०२३-२४' या अहवालात ही आकडेवारी देण्यात आली. २०२३-२४ आणि २०२४-२५ चा आतापर्यंतचा कालावधी यातील बँकांच्या कामगिरीची माहिती अहवालात देण्यात आला आहे. यंदा एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीत देशातील विविध बँकांत १८,४६१ घोटाळे झाले, त्यात २१,३६७ कोटी रुपयांची फसवणूक झाली. आदल्या वर्षी १४,४८० बँक घोटाळ्यांत २,६२३ कोटी रुपयांची फसवणूक झाली होती.

अहवालात म्हटले आहे की, या घोटाळ्यांमुळे देशातील वित्तीय व्यवस्थेसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. यात प्रतिष्ठात्मक जोखीम, परिचालनात्मक जोखीम आणि व्यावसायिक जोखीम यांचा समावेश आहे. याशिवाय वित्तीय स्थैर्याबाबत संशयाचे वातावरण निर्माण झाल्यामुळे ग्राहकांचा विश्वास कमी झाला आहे. (वृत्तसंस्था)

# पीडितेला २५ लाखांची भरपाई द्या

## विद्यापीठ लैंगिक शोषण प्रकरणी हायकोर्टाचा आदेश

◆ **चेन्नई, २८ डिसेंबर**

तामिळनाडूची राजधानी चेन्नईमधील अण्णा विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये लैंगिक अत्याचाराची घटना समोर आली होती. विद्यार्थ्यांनी आंदोलन केल्यानंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई करीत आरोपीला बेड्या ठोकल्या. या प्रकरणाच्या चौकशीसाठी महिला अधिकाऱ्यांचा समावेश असणारे विशेष चौकशी पथक अर्थात् एसआयटी स्थापन करावे, पीडितेला २५ लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी, असा आदेश मद्रास उच्च न्यायालयाने दिला आहे.

पोलिसांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेल्या एफआयआरमध्ये तिची ओळख उघड केली. पोलिसांनी केलेल्या या गंभीर चुकीबद्दल पीडितेला २५ लाख रुपयांची अंतरिम भरपाई द्या, असा निर्देश न्या. एस. एम. सुब्रमण्यम् आणि व्ही. लक्ष्मीनारायण यांच्या खंडपीठाने राज्य सरकारला दिला.

न्यायालयाने तामिळनाडू पोलिसांना दुसऱ्या वर्षाच्या विद्यार्थिनी आणि तिच्या कुटुंबाला संरक्षण देण्याचाही निर्देश दिला. पीडित महिला सोमवारी कॅम्पसमधील एका मोकळ्या जागेत तिच्या पुरुष मित्रासोबत बसली होती, तेव्हा तिच्यावर एकाने लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. ज्ञानशेखरन् असे आरोपीचे नाव आहे. त्याने पीडितेला मारहाण केली. नंतर तिला इमारतीच्या मागे ओढून अत्याचार केला. या घटनेनंतर विद्यार्थ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. विरोधी पक्षांनीही सरकारला धारेवर धरले आहे. उच्च न्यायालयाने या प्रकरणाच्या चौकशीतील विविध त्रुटींवर प्रकाश टाकत तीन आयपीएस अधिकाऱ्यांचा समावेश असलेली एसआयटी स्थापन करण्याचा आदेश दिला. (वृत्तसंस्था)

# एस. जयशंकर यांची मिशेल वॉल्ट्झसोबत चर्चा

## द्विपक्षीय भागीदारी, जागतिक मुद्दे केंद्रस्थानी

◆ **सॅन फ्रॅन्सिस्को, २८ डिसेंबर**

अमेरिकेचे निर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारपदी नियुक्त केलेले खासदार मिशेल वॉल्ट्झ यांच्यासोबत परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी द्विपक्षीय भागीदारी आणि सध्याच्या महत्त्वपूर्ण जागतिक मुद्यांवर विस्तृत चर्चा केली.



जयशंकर २४ ते २९ डिसेंबर या कालावधीत अमेरिकेच्या दौऱ्यावर आहेत. भारत सरकार आणि सत्तेत येणाऱ्या ट्रम्प प्रशासनाच्या भावी अधिकाऱ्यासोबत झालेली ही पहिलीच उच्चस्तरीय बैठक आहे. वॉल्ट्झ यांना भेटून आनंद झाला, असे जयशंकर यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

द्विपक्षीय भागीदारी आणि सध्याच्या जागतिक मुद्यांवरील व्यापक चर्चेचा आनंद घेतला. त्यांच्यासोबत काम करण्यास उत्सुक आहे, असे जयशंकर यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे. अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प सूत्रे स्वीकारतील, त्यावेळी म्हणजे २० जानेवारीला मिशेल वॉल्ट्स हे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जॅक सुलियन यांची जागा घेतील.

भारत-अमेरिका संबंध वॉल्ट्झ यांच्यासाठी नवीन नाहीत. फ्लोरिडाच्या सहाव्या काँग्रेशनल जिल्ह्यातून तीन वेळा खासदार राहिलेले वॉल्ट्झ हे काँग्रेशनल इंडिया कॉकसचे रिपब्लिकन सहअध्यक्ष आहेत. अमेरिकेच्या प्रतिनिधी सभागृहातील ही सर्वांत मोठी कॉकस आहे. मागील वर्षी भारतात आलेल्या अमेरिकन खासदारांच्या प्रतिनिधी मंडळाचे ते सहअध्यक्ष होते. या प्रतिनिधी मंडळाला लाल किल्ल्यावरील प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात आले होते. (वृत्तसंस्था)

## बीआरएस नेते केटीआर यांना ईडीचा समन्स

◆ **हैदराबाद, २८ डिसेंबर**

फॉर्म्युला ई-रेसिंग प्रकरणी कथित गैरव्यवहारात अंमलबजावणी संचालनालय अर्थात ईडीने भारत राष्ट्र समितीचे (बीआरएस) नेते केटी रामाराव आणि इतरांना समन्स बजावत ७ जानेवारीला हैदराबाद येथील इडी कार्यालयात चौकशीसाठी हजर राहण्यास सांगितले.

तेलंगणा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (एसीबी) दाखल करण्यात आलेल्या तक्रारीची दखल घेऊन ईडीने पीएमलएतील विविध कलमांतर्गत गेल्या आठवड्यात एफआयआर दाखल केला होता. आता या प्रकरणात बीआरएसचे अध्यक्ष आणि तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांचे पुत्र केटी रामाराव यांना समन्स बजावून ७ जानेवारी रोजी बयान दाखल करण्यासाठी ईडी कार्यालयात हजर राहण्यास सांगितले. (वृत्तसंस्था)

# जगातील वेगवान ट्रेनची चीनने घेतली यशस्वी चाचणी

## ताशी ४५० किमीचा वेग

◆ **नवी दिल्ली, २८ डिसेंबर**



चीनमध्ये ताशी ४५० किलोमीटर वेगाने धावणाऱ्या हायस्पीड ट्रेन सीआर ४५० ची यशस्वी चाचणी घेण्यात आली. ही जगातील सर्वांत वेगवान ट्रेन मानली जात आहे. पुढील वर्षीपासून या ट्रेनचे कामकाज सुरू होऊ शकते.

बुधवारी ही ट्रेन तियानजिनहून बीजिंगसाठी ट्रायल रनसाठी निघाली, तेव्हा लोकांनी या ट्रेनचे अनेक व्हिडीओ बनवले. हे व्हिडीओ चीनच्या इंटरनेट मीडियावर व्हायरल होत आहेत. ही ट्रेन बाजूने पाहिल्यास बाणासारखी दिसते. सीआर ४५० चे शरीराचे वजन अंदाजे १० टन आहे. हे सीआर ४५० च्या सध्याच्या मॉडेलपेक्षा १२ टक्के हलके आहे. या ट्रेनचा अनुक्रमांक पांढऱ्या टेपने झाकलेला आहे. हा प्रकल्प चीनच्या १४ व्या पंचवार्षिक योजनेचा एक भाग आहे, ज्या अंतर्गत हाय-स्पीड रेल्वे पायाभूत सुविधादेखील अद्ययावत केल्या जातील.

चीनमध्ये सर्वाधिक ४५ हजार किमीचे हायस्पीड रेल्वे नेटवर्क आहे. चीनच्या नव्या स्टेल्थ फायटर प्लेनचा व्हिडीओ इंटरनेट मीडियावर व्हायरल होत आहे. सहाव्या पिढीतील लढाऊ विमान असे त्याचे वर्णन केले जात आहे. जगातील कोणत्याही देशाकडे सहाव्या पिढीचे लढाऊ विमान नसताना चीनने हे लढाऊ विमान विकसित केले आहे. (वृत्तसंस्था)

# काँग्रेस आमदारावर ईडीचे छापे

◆ **रायपूर, २८ डिसेंबर**

दारू घोटाळ्यातील 'मनी लाँड्रिंग'चा तपास करताना अंमलबजावणी संचालनालयाने काँग्रेस आमदार व माजी उत्पादन शुल्क मंत्री कावासी लखमा आणि त्यांच्या मुलाशी संबंधित काही ठिकाणांवर छापेमारी केली, अशी माहिती अधिकृत सूत्रांनी शनिवारी दिली.

सुकमा यांच्या रायपुरातील घरासह त्यांच्या मुलाचे आणि या प्रकरणाशी संबंधित असलेल्या इतर काही जणांच्या सुकमातील ठिकाणांवर ईडीने छापेमारी केली. स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायत निवडणुकांपूर्वी विरोधी पक्ष नेत्यांचा छळ करण्यासाठी भाजपाने कटकारस्थान रचले आहे, असा आरोप छत्तीसगड काँग्रेसने केला. लखमा हे कोंटा मतदारसंघातून सहा वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत. ते काँग्रेसच्या कार्यकाळात उत्पादन शुल्क मंत्री होते. हरीश लखमा हे जिल्ह्यातील पंचायतचे अध्यक्ष असल्याचे सांगितले जात आहे. लखमा उत्पादन शुल्क मंत्री असताना २०२० ते २०२२ या काळात त्यांना दरमहा दोन कोटी रुपये दिले जायचे, असा आरोप या प्रकरणाती काही नेत्यांनी केला आहे. या आरोपाचा तपास ईडी करीत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. मुख्यमंत्री भूपेश बघेल यांच्या नेतृत्वातील तत्कालीन काँग्रेस सरकारने २०१९ ते २०२२ या काळात मद्य घोटाळा केल्याचा आरोप आहे. (वृत्तसंस्था)

# चित्रपट वार्ता

## नवीन वर्षात प्रदर्शित होणार लोकप्रिय वेबसीरिज

**मुंबई** : मोठ्या पडद्याव्यतिरिक्त अनेक बहुप्रतिक्षित वेब सीरिज आणि चित्रपट २०२५ मध्ये ओटीटी प्लॅटफॉर्मवर ऑनलाईन स्ट्रीम केले जाणार आहेत. अमेरिकेतील प्रसिद्ध उद्योगपती ब्रायन जॉन्सन यांच्या जीवनावर 'डोंट डाय-मॅन हू वॉन्ट्स लिव्ह फॉरएव्हर' ही डॉक्युमेंट्री फिल्म येणार आहे. ती १ जानेवारीपासून नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होईल. लॉकडाऊनमध्ये प्राईम व्हिडीओवर पाताल लोक ही वेब सीरिज रिलीज झाली होती. या क्राईम थ्रिलर वेब सीरिजचा दुसरा सीझन ४ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर रिलीज होणार आहे. 'द फॅमिली मॅन' या वेब सीरिजने चाहत्यांची मने जिंकली आहेत. या सीरिजचे आतापर्यंत दोन सीझन लोकप्रिय झाले. त्यामुळे नव्या वर्षात प्राईम व्हिडीओवर याचा सीझन ३ पाहायला मिळेल. हॉलीवूडची लोकप्रिय वेब सिरीज 'स्ट्रेन्जर्स थिंग्ज सीझन ५' ची अधिकृत घोषणा नेटफ्लिक्सने केली आहे. काल्पनिक जगाचा शेवटचा अध्याय ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्यात रिलीज होऊ शकतो.

## प्रियांका ८ वर्षांनंतर पुन्हा दिसणार भारतीय चित्रपटात



**मुंबई** : अभिनेत्री प्रियांका चोप्रा ही राजामौलींच्या नवीन प्रोजेक्टचा हिस्सा होणार असल्याचे सांगितले जात आहे. प्रियांकाने बॉलिवूड तसेच हॉलीवूड सिनेसृष्टी गाजवल्याचे सर्वांनाच माहिती आहे. त्यामुळे आता पुन्हा ८ वर्षांनंतर राजामौलींच्या प्रोजेक्टचा ती हिस्सा होणार असल्याने प्रियांकाच्या चाहत्यांमध्ये चर्चा रंगली आहे. राजामौलींच्या या चित्रपटाचे चित्रीकरण एप्रिलमध्ये सुरू करणार आहेत. प्रियांकासोबत दाक्षिणात्य सिनेमातील सुपरस्टार महेश बाबू मुख्य भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाचे कथानक तयार झाले आहे. २०१९ प्रदर्शित झालेल्या 'द स्काय इज पिंक' या चित्रपटात ती शेवटची दिसली होती.

## प्रसिद्ध हिंदी 'आनंद' चित्रपट येणार मराठीत

**मुंबई** : १९७१ मध्ये प्रदर्शित झालेल्या हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित 'आनंद' या हिंदी चित्रपटाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. रसिकांचा लाडका 'आनंद' आता मराठमोळे रूप घेऊन समोर येणार आहे. विघ्नहर्ता फिल्म्सने मराठी भाषेत 'आनंद' चित्रपट बनवण्याचे शिवधनुष्य उचलले आहे. २९ डिसेंबर या राजेश खन्ना यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधत मराठी 'आनंद' चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. विघ्नहर्ता फिल्म्सच्या बॅनरखाली निर्माते दिलीप शेट्टी या चित्रपटाची निर्मिती करणार आहेत. हेमंतकुमार महाले या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहेत. यातील कलाकारांची नावे अद्याप समोर आलेली नाहीत. कला दिग्दर्शन निलेश चौधरी करणार असून, अविनाश-विश्वजीत ही मराठी सिनेसृष्टीतील आघाडीची संगीतकार जोडी या चित्रपटाचे संगीत दिग्दर्शन करणार आहे.

# अभिनेत्री उर्मिला कानेटकरच्या कारने दोघा मजुरांना चिरडले

## एक जागीच ठार, एक गंभीर



**मुंबई दि.२८ डिसेंबर-**

मराठी चित्रपट अभिनेत्री उर्मिला कानेटकर कोठारे हिच्या कारने भरदा वेगा मुळे मेट्रोचे काम करत असलेल्या दोघा मजुरांना चिरडण्याची घटना शुक्रवारी रात्री पश्चिम द्रुतगती मार्गावरील पोईसर परिसरात घडली. या अपघातात एक मजुर जागीच ठार झाला असून दुसरा अत्यवस्थ आहे. कारचा चालक व अभिनेत्री उर्मिला या किरकोळ जखमी झाल्या. अपघातानंतर सेफ्टी बॅग उघडल्याने त्या बचावल्या असल्याचे सांगण्यात आले

मिळालेल्या माहितीनुसार उर्मिला ही शुटींग संपल्यानंतर घरी परत येत होती. त्यावेळी कांदिवलीतल्या पोईसर मेट्रो रेल्वे स्टेशन जवळ चालकाला गाडीवर नियंत्रण ठेवता आले नाही तो डिव्हाइडला धडकून काम सुरू ठिकाणी जाऊन गाडी आदळली. यावेळी त्या ठिकाणी काम करत असलेले दोघे कामगार त्यात सापडले. त्याच्या डोक्याला गंभीर मार बसल्याने रक्तबंबाळ होऊन ते पडले त्यापैकी एक मजुराचा जागीच मृत्यू झाला. घटनास्थळी असलेल्या अन्य कामगारांनी तातडीने पोलिसांना कळविण्यात जखमींना रुग्णालयात नेले. ही ठोकर इतकी जोरात होती की गाडीच्या पुढील भागाच्या चक्काचुर झाला आहे. दुसरा मजूर हा ही गंभीर जखमी असून त्याच्यावर मालाड येथील माऊली रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघातात अभिनेत्री उर्मिला कानेटकर व चालकही किरकोळ जखमी झाला आहे. अपघातानंतर एअर बॅग उघडल्याने झाल्यामुळे तिला किरकोळ दुखापत झाली. चालकही या अपघातात जखमी झाला आहे. कांदिवलीच्या नमः हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. याबाबत समतानगर पोलिस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# बीडमध्ये विशाल 'आक्रोश मोर्चा'

▸ संतोष देशमुख हत्या प्रकरण ▸ धनंजय मुंडेंना हटवण्याची मागणी

**बीड, २८ डिसेंबर-**

सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येच्या निषेधार्थ बीड येथे शनिवारी विशाल मोर्चा काढण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळातून हटवण्यात यावे, अशी मागणी या प्रकरणी सर्वपक्षीय आमदारांनी केली.

आज काढण्यात आलेल्या आक्रोश मोर्चात मराठा आंदोलक मनोज जरांगे, छत्रपती संभाजी राजे, भाजपाचे स्थानिक आमदार सुरेश धस, अभिमन्यू पवार, राष्ट्रवादी काँग्रेसे प्रकाश सोळंके आणि शरद पवार गटाचे आ. जितेंद्र आव्हाड व संदीप क्षीरसागर सहभागी झाले होते.

धनंजय मुंडे यांचा सहकारी व बीडमधील राजकीय नेता वाल्मीक कराडला अटक करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली. ९ डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांचे अपहरण करण्यात आले आणि अनन्वित छळ करून त्यांची हत्या करण्यात आली. या हत्येप्रकरणी चार जणांना अटक केली असली, तरी वाल्मीक कराड हा या हत्येमागील सूत्रधार आहे, असा दावा विरोधकांनी नागपुरातील हिवाळी अधिवेशनादरम्यान केला होता. या संबंधित प्रकरणात खंडणीप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आलेला कराड अद्याप फरार आहे. माझ्या वडिलांना न्याय देण्यात यावा, अशी मागणी देशमुख यांची मुलगी वैभवी यांनी आंदोलना दरम्यान केली.


देशमुख यांच्या हत्येचे अत्यंत दुःख आहे. त्यांच्या हत्येमुळे हा भाग महाराष्ट्रातील नाही, असे वाटल्याची प्रतिक्रिया भाजपाचे औसा येथील आमदार अभिमन्यू पवार यांनी व्यक्त केली. आरोपीला अटक न झाल्यास, आंदोलनाचा वणवा राज्यातील इतर भागांत पोहोचेल, असे मी सत्ताधारी पक्षाचा आमदार असलो, तरी सरकारला सांगू इच्छितो.



कुमार सप्तर्षी



मधुसूदन दास



हसन देसाई

# डॉ. सप्तर्षी यांना बाबा आमटे जीवन गौरव पुरस्कार जाहीर

## सामाजिक कार्यकर्ता पुरस्काराचे मानकरी मधुसूदन दास व हसन देसाई

**वरोडा, २८ डिसेंबर**

बाबा आमटे एकता अभियान ट्रस्टच्या वतीने राष्ट्रीयस्तरावर कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार दिले जातात. यावर्षीचा बाबा आमटे जीवन गौरव राष्ट्रीय पुरस्कार डॉ. कुमार सप्तर्षी यांना, तर बाबा आमटे सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार मधुसूदन दास व हसन फतेखान देसाई यांना जाहीर करण्यात आला. हा पुरस्कार ११ फेब्रुवारी रोजी पुणे येथे दिला जाणार आहे.

युवा पर्यावरण रक्षण, आरोग्यसेवा यात कार्य करणाऱ्या व्यक्तींची पुरस्काराकरिता निवड करण्यात येते. जीवनगौरव पुरस्काराचे हे दुसरे वर्ष आहे. डॉ. कुमार सप्तर्षी यांनी आयुष्यभर महात्मा गांधी यांच्या विचारांनी प्रेरित होऊन कार्य केले. त्यांना एक लाख रुपये, सन्मानपत्र व सन्मानचिन्ह दिले जाणार आहे.मधुसूदन दास ओडिशा राज्यात युवा पिढीबरोबर कार्यरत असून, प्रसिद्ध गांधीवादी व एस. एन. सुब्बाराव यांच्या तालमीत तयार झाले आहे. हसन देसाई राष्ट्रसेवा दलाचे सक्रिय कार्यकर्ते आहे. या पुरस्कारात ५१ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र दिले जाणार आहे.

## चुकीचे नाव ऐकताच चिडली कीर्ति सुरेश



**मुंबई** : कीर्ति सुरेश गेल्या अनेक दिवसांपासून वरुण धवन आणि वामिका गब्बीसोबतच्या तिच्या २५ डिसेंबर रोजी प्रदर्शित झालेल्या बेबी जॉन या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटातून तिने बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. एका व्हिडीओत कीर्ति ही पापाराझींवर चिडल्याचे पाहायला मिळत आहे. पापाराझी तिला क्रिती म्हणून हाक मारत होते. त्यामुळे कीर्ति चिडली. नंतर तिने सांगितले की, तिचे नाव क्रिती नाही, कीर्ती आहे. त्यानंतर लगेच काही जण डोसा ओरडू लागले. तिचा डोसाचा व्हिडीओ खूप व्हायरल झाला होता. त्यानंतर कीर्तिने हसत उत्तर दिले की, कीर्ति डोसा नाही, कीर्ति सुरेश आहे. डोसा मला खूप आवडतो.

## रोखठोक

दिनेश गुणे

# नव्या इतिहासाची नांदी...

इतिहासाची पुनरावृत्ती होते असे म्हणतात. पण तसे नेहमीच होत नाही. काही इतिहास एकदाच लिहिले जातात आणि अल्पकाळानंतर ते इतिहासाच्या पानावरून पुसलेदेखील जातात. तरीही, पुनरावृत्तीच्या कल्पनेवर मात्र या इतिहासाची श्रद्धा असते. विशेषतः, राजकारणाच्या क्षेत्रात इतिहासाच्या पुनरावृत्तीच्या आशेवर अनेकजण आपल्या भविष्याकडे डोळे लावून बसलेले असले, तरी सगळ्यांच्याच भूतकाळात घडून गेलेली कोणतीही गोष्ट एकदा पुसली गेली की भविष्यात उमटत नाही. म्हणूनच, शिवसेनेतील फुटीच्या इतिहासाची पुनरावृत्ती झाली, तरी शिवसेनेचे मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्राचे नेतृत्व केले त्या इतिहासाची पाने फुटीनंतर पुसली गेली असल्याने त्याची पुनरावृत्ती होण्याची शक्यता मात्र पुसली गेली आहे. आता तो घटनाक्रम हाच इतिहास झाला आहे. या इतिहासाची पुनरावृत्ती होईल आणि पुन्हा एकदा उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होतील असे त्यांच्या काही समर्थकांना वाटत होते, तो काळही आता इतिहासजमा झाल्याने, तसे काही वाटण्याच्या इतिहासाची पुनरावृत्तीदेखील संभवत नाही हे त्यांना कळून चुकले आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली हा इतिहास झाला. आता त्याची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नसली तरी शरद पवार पुन्हा एकदा सत्तावर्तुळाच्या केंद्रस्थानी येतील या आशेच्या इतिहासाची शक्यतादेखील मावळलीच आहे. अशा तऱ्हेने ठाकरे आणि पवार यांच्या राजकीय इतिहासाची पाने इतिहासजमा होऊ लागल्याने त्यांच्या पुनरावृत्तीचा प्रश्नच मिटलेला असून, भारतीय जनता पार्टीचे नेते देवेंद्र फडणवीस यांना मात्र इतिहासाच्या पुनरावृत्तीचा प्रत्यय आल्याने, हा सिद्धांत राजकारणात नेहमीच खरा ठरत नाही या समजुतीवरच शिक्कामोर्तब झाले आहे. 'मी पुन्हा येईन' या त्यांच्या वाक्यात इतिहासाच्या पुनरावृत्तीचाच विश्वास होता आणि नवा इतिहास घडविण्याची जिद्ददेखील होती. त्या विश्वासाच्या बळावर त्यांनी इतिहास घडविण्याचे ध्येय उराशी बाळगले व ते सार्थदेखील करून दाखविले. अन्यथा, 'करून दाखविले' वगैरे काही वाक्ये केवळ घोषणांपुरतीच राहिल्याने, त्या वाक्यावरचा लोकांचा विश्वासदेखील संपतच चालला होता. तसे नसते, तर केवळ या एका घोषणेच्या बळावर इतिहासाची पुनरावृत्ती करून दाखविण्याची किमया अनेकांना साधली असती. तसे झाले नाही, यावरूनच, नेहमीच इतिहास पुनरावृतीसाठी तयार असतो असे नाही हे सिद्ध होते. आता देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री झाले आहेत आणि त्यांनी नव्याने काही करून दाखविण्याची तयारीही सुरू केली आहे. सत्तेची सूत्रे हाती घेताच त्यांनी केलेली एक घोषणा केवळ कागदावर राहणार नसून त्यानुसार काही करून दाखविण्याची आणि नवा इतिहास घडविण्याची त्यांची इच्छाशक्ती आता उघड होऊ लागली आहे. 'महाराष्ट्र आता थांबणार नाही', असे त्यांनी सत्ता हाती घेताच जाहीर केले होते. आता महाराष्ट्राची वाटचाल सुरू झाली आहे. नव्या महाराष्ट्रासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या नव्या टीमचे काम सुरू झाले आहे आणि नव्या सत्ताकाळातील पहिल्या शंभर दिवसांत करावयाच्या कामांच्या पूर्वतयारीने वेग घेतला आहे.

गेल्या पाच वर्षांचा काळ हा महाराष्ट्राच्या संक्रमणाचा काळ होता. या काळात असंख्य आरोप, प्रत्यारोपांची राळ उडाली होती. महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीने असा काळ याआधी अनुभवला नव्हता. २०१९ ते २०२४ या काळात देवेंद्र फडणवीस या व्यक्तीस आणि त्यांच्या कुटुंबास ज्या प्रकारे लक्ष्य करण्यात आले, तसे याआधी कधीच घडले नव्हते. असे आरोप करणाऱ्या सर्वांचे नव्या सरकारच्या स्थापनेनंतर नागपुरात झालेल्या पहिल्या विधिमंडळ अधिवेशनात आभार मानून देवेंद्र फडणवीस यांनी कामाला सुरुवात केली आहे. फडणवीस यांना सातत्याने लक्ष्य करून त्यांनी बिघडविलेल्या वातावरणामुळे महाराष्ट्राच्या जनतेमध्ये सहानुभूती निर्माण झाली. याआधीच्या काळात महाराष्ट्रासाठी आणि राज्याच्या जनतेच्या हितासाठी जे काम फडणवीस सरकारने केले होते, त्याची पोचपावती या निवडणुकीतून जनतेने दिली. ज्यांनी निवडणुकीच्या राजकारणातून सामाजिक ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न केला, त्यांना जनतेने झिडकारले. जवळपास पन्नास टक्के मतदारांनी महायुतीला पसंतीची पावती दिली. महाराष्ट्राच्या निवडणुकीच्या इतिहासात हे पान नव्याने लिहिले गेले आहे. असा भरघोस जनाधार याआधी कोणत्याच राजकीय पक्षाला, आघाडीला मिळाला नव्हता. नव्याने लिहिल्या गेलेल्या या इतिहासाची पुनरावृत्ती झालीच, तरी फडणवीस यांच्यावर व्यक्तिगत आरोपाची, टीकेची आणि असभ्य कुचेष्टेची राळ उठविणाऱ्यांना त्याचा फायदा मिळणार नाही याची खबरदारी इतिहासच घेईल, हे



आता हळूहळू स्पष्ट होऊ लागले आहे. म्हणूनच, निवडणुकी आधीच्या काळात महाराष्ट्राचे वातावरण गढूळ करण्यात पुढाकार घेणाऱ्यांचा सूर आता मवाळ होताना दिसत आहे. अधिवेशनकाळात शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या आमदारांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली एकत्रितपणे जाऊन फडणवीस यांची भेट घेतली, त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले, त्यांच्या नेतृत्वावर जनतेने उमटविलेली मान्यतेची मोहर स्वीकारली, याचा हा पुरावा आहे. त्या भेटीत नेमके काय घडले ते स्पष्ट झालेले नाही. पण, उद्धव ठाकरे यांनी याआधी फडणवीस यांच्यावर केलेल्या आरोपांचा, टीकेचा आणि टोमण्यांचा पश्चात्ताप त्यांना झाला असावा, असे त्या भेटीनंतरच्या काही बातम्यांवरून स्पष्ट झाले. कदाचित त्या भेटीदरम्यानच्या त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले भाव वाचून तशा बातम्यांचा जन्म झाला असावा. त्यामुळे आता फडणवीस यांच्यावरील आरोप, टीका आणि टोमणे हा इतिहास झाला आहे आणि त्याची पुनरावृत्ती होणार नाही, यावर एकतर्फी शिक्कामोर्तबही झाले आहे.


याच निवडणुकीच्या निकालनंतर आणखी एका मुद्याने नेहमीप्रमाणे पुन्हा एकदा उचल खाल्ली होती. जेव्हा जेव्हा भाजपा आघाडीच्या विरोधातील आघाड्यांना निवडणुकीत पराभव पाहावा लागला, तेव्हा तेव्हा मतदान यंत्रांच्या नावाने खडे फोडणे हा गेल्या दहा वर्षांतील निवडणुकोत्तर काळाचा इतिहास झाला आहे. त्याच इतिहासाची निकालानंतर पुनरावृत्ती झालेली महाराष्ट्रात पाहावयास मिळाली. ईव्हीएमच्या कार्यशैलीवर निराधार प्रश्नचिन्हे उमटवून संशयाचे वादळ निर्माण करण्याचा प्रयत्न विरोधकांनी करून पाहिला. शरद पवार यांनी उमटविलेल्या प्रश्नचिन्हावर सावधगिरीचा मुलामा होता, तर ठाकरे गटाने आक्रमकपणे प्रश्नचिन्हे उमटविण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसने तर या निकालाचे भांडवल करून पराभवाचे संपूर्ण खापर ईव्हीएमच्या माथ्यावर मारण्याची जोरदार कसरत केली. याआधीही, अनेक निवडणुकांत हेच झाले होते. देशातील ज्या ज्या राज्यांतील वेगवेगळ्या निवडणुकांत भाजपाविरोधी पक्षांना पराभव चाखावा लागला, त्या त्या राज्यांत ईव्हीएमवर शंका उपस्थित करावयाचे तंत्र या वेळी काँग्रेसने महाराष्ट्रातही वापरले आणि ठाकरे-पवार यांच्या युतीने त्यास पाठिंबा देत शंकेचे सूर आळविले. आता मात्र, तो सूरही मवाळ झाला आहे. पवार यांच्या गटाने ईव्हीएमच्या वादावर पडदा टाकण्याची तयारी सुरू केली आहे. शरद पवार यांच्या कन्येने, खासदार सुप्रिया सुळे यांनी ईव्हीएमला एक प्रकारे क्लीन चिट दिल्याने पवार गटातून आता या वादाच्या इतिहासाची पुनरावृत्ती होणार नाही, याची खबरदारी घेतली जाईल, अशी चिन्हे आहेत. याच ईव्हीएमद्वारे घेतल्या गेलेल्या निवडणुकीत मी चार वेळा विजयी झाले असल्याने व ईव्हीएमच्या कार्यशैलीवर शंका घेण्याएवढे कोणतेही ठोस पुरावे हाती नसल्याने, या निवडणूक प्रक्रियेवर शंका घेणे योग्य नाही, असा सूर सुप्रिया सुळे यांनी लावला आणि विरोधकांच्या आक्रमक पवित्र्यातील हवाच निघून गेली. विरोधकांच्या आरोपास उत्तर देताना महाविकास आघाडीचे नेतेदेखील याच मुद्यावर भर देत होते. जेव्हा विजय होतो, तेव्हा ईव्हीएमविरोधात तक्रार नसते आणि पराभव होताच ओरड सुरू होते, हा कांगावा टिकणार नाही, हे दिसू लागले. साहजिकच, महाविकास आघाडीतील ईव्हीएमविरोधी सूर आता मावळत चालल्याने ठाकरे गटाच्या ईव्हीएमविरोधी आवाजातील हवादेखील निघून जाईल. इतिहासाची अल्पकाळ झालेली एक पुनरावृत्ती आता पुसली गेली आहे आणि ईव्हीएमच्या नावाने वादळ निर्माण करून फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचे प्रयत्न पुरते फसले आहेत. एका वादळाचे ढग विरल्याने, महाराष्ट्राच्या वाटचालीतील पुढच्या पावलांचा प्रकाश स्वच्छ झाला आहे.

विधिमंडळाच्या पहिल्या अधिवेशनातील आपल्या पहिल्याच भाषणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील १४ कोटी जनतेचे आभार मानले. महायुतीला घवघवीत यश देऊन २३७ आमदार सत्तापक्षाच्या बाजूने निवडून आणले आणि महायुतीच्या घटक पक्षांनी एकत्रितपणे केलेल्या कामास विजयाचे श्रेय बहाल केले. गेल्या पाच वर्षांत विरोधकांनी फडणवीस यांना चक्रव्यूहात फसविण्याचे अनेक प्रयत्न केले. पण असे चक्रव्यूह भेदण्याची कला आपल्याला अवगत आहे आणि त्यातून बाहेर पडण्याचा मार्गदेखील आपणास माहीत आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी पाच वर्षांपूर्वी एका वृत्तवाहिनीवरील मुलाखतीत म्हटले होते. 'मी पुन्हा येईन' या त्यांच्या विश्वासाची तेव्हा खिल्ली उडविणाऱ्यांनी त्याच काळात फडणवीस यांचे ते वक्तव्यदेखील फार गांभीर्याने घेतले नव्हते. त्यामुळे, इतिहासाची पुनरावृत्ती होईल असे त्यांना वाटलेदेखील नव्हते. आता फडणवीस यांनी पुन्हा मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतली आणि आपण आधुनिक अभिमन्यू आहोत हे सिद्ध केले. एक प्रकारे इतिहासाचीच नव्हे, तर पुराणाचीही पुनरावृत्ती इथे झालेली दिसते. इतिहासाच्या पुनरावृत्तीच्या इतिहासातही असे क्वचितच घडलेले दिसते. अर्थात, या यशाचे श्रेय फडणवीस यांनी पक्षाला, सोबत काम करणाऱ्या सहकाऱ्यांना आणि राज्यातील जनतेला दिले. 'आंधियों में भी, जो जलता हुआ मिल जायेगा, वो दिये से पूछना, मेरा पता मिल जायेगा' हे त्यांचे उद्गार, भविष्यातही इतिहासाची पुनरावृत्ती करण्याच्या आत्मविश्वासाची साक्ष देणारे ठरले आहेत. म्हणूनच, महाराष्ट्र आता थांबणार नाही, या त्यांच्या घोषणेची आता खिल्ली न उडविता, महाराष्ट्राच्या नव्या वाटचालीत साथ देण्यासाठी तयारी करण्याचा मोठेपणा विरोधकांना दाखवावा लागेल. विधानसभा निवडणुका जिंकण्याकरिता विरोधकांनी केलेल्या राजकारणाची सभागृहातच सडेतोड चिरफाड करून फडणवीस यांनी विरोधकांच्या राजकीय संस्कृतीला आरसा दाखविला आहे. नव्या वाटचालीत ही संस्कृती बासनात बांधून राज्याच्या हितासाठी सरकारसोबत काम करण्यातच हित आहे, हे विरोधकांनी ओळखले, तर संस्कृतीच्या इतिहासाची पुनरावृत्ती होईल. महाराष्ट्रात महायुती सरकारने दिलेले प्रत्येक आश्वासन पूर्ण केले जाईल, ज्या कल्याणकारी योजना सुरू केल्या आहेत, त्यापैकी एकही योजना बंद होणार नाही आणि योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी दूर केल्या जातील अशी ग्वाही देऊन फडणवीस सरकारने नव्या महाराष्ट्राच्या नव्या वाटचालीची दिशा स्पष्ट केली आहे. विरोधकांनी नव्याने सुरू केलेली फेक नॅरेटिव्हची नवी फॅक्टरी उद्ध्वस्त करण्याचा निर्धार करून फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने नवी वाटचाल सुरू केली आहे. याच फॅक्टरीमधील मारकडवाडीचा डाव फडणवीस यांनी उघड केला. शरद पवार यांच्यासारख्या नेत्याने या काळात ईव्हीएमच्या सेटिंगवर प्रश्नचिन्हे उभी करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. आता सुप्रिया सुळे यांनी समंजस भूमिका घेतल्याने, शंकेचे ढग विरले आहेत आणि ईव्हीएमचा वादही संपल्यात जमा आहे. आता महाराष्ट्र थांबणार नाही, या फडणवीस यांच्या विश्वासाची या नव्या वाटचालीला साथ लाभली आहे. जनतेने दिलेला कौल विरोधकांनी खुल्या मनाने स्वीकारला नसला, तरी आता नव्या महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी सुरू झालेली नव्या सरकारची वाटचाल निर्विघ्नपणे सुरू राहील आणि नवा इतिहास निर्माण होईल, असे वातावरण निर्माण होऊ लागले आहे. महाराष्ट्राच्या दुष्काळमुक्तीसाठी केलेल्या कामांना गती येणार आहे. गेल्या अडीच वर्षांत महायुती सरकारने राज्यातील १६७ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली, त्यामुळे २५.२१ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आली आहे. हा नवा इतिहास आहे. गेल्या तीन-चार दशकांपासून राज्यात नदीजोड प्रकल्पांवर केवळ चर्चा होत होती. शाश्वत पाणीपुरवठ्याचा हा हमखास स्रोत असल्याची भूमिका दहा वर्षांपूर्वीच मांडली गेली होती. आंतरराज्य प्रकल्पांचा वाद त्या त्या राज्यांनी चर्चा करून सोडवावा व मार्ग काढावा असा केंद्र सरकारचा स्पष्ट निर्देश आहे. पण आंतरराज्य प्रकल्पांसाठी केंद्राच्या मदतीची गरजच नसल्याने कोणावरही अवलंबून न राहता असे प्रकल्प राज्यात राबविण्याचे धोरण राज्य सरकारने स्वीकारले आणि त्यानुसार महाराष्ट्रात पाच वर्षांपूर्वी पहिल्यांदा महाराष्ट्राचा जल आराखडा तयार करण्यात आला. गेल्या अडीच वर्षांत महायुती सरकारने राज्यातील चार प्रमुख नदीजोड प्रकल्पांना मान्यता दिली आणि त्याच्या निविदाही जारी झाल्या आहेत. राज्यात मेट्रो रेल्वेच्या कामांना वेग आला आहे. मुंबई महानगर क्षेत्रात सुमारे ३७४ किलोमीटरचे मेट्रो रेल्वेचे जाळे उभारण्याचा संकल्प राज्य सरकारने सोडला आहे, त्यापैकी सुमारे ९५ किलोमीटरचे जाळे कार्यान्वित होऊन मुंबईला नवी जीवनरेखा प्राप्त होणार आहे. पुणे, नागपूर मेट्रोच्या कामालाही गती मिळाली आहे, हादेखील एक नवा इतिहास आहे. 'समृद्धीचा वेग आता कुणी रोखणार नाही, महाराष्ट्र आता थांबणार नाही', असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. विधिमंडळात त्यांच्या या विश्वासाच्या सुरात सभागृहाचे सूर मिसळले, तेव्हाच नव्या इतिहासाची नांदी गायिली गेली आहे.

## रविवारची पत्रे

### बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक उबाठासाठी अस्तित्वाची लढाई



राज्याच्या निवडणुकीत मिळालेल्या घवघवीत यशानंतर महायुतीचे लक्ष बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीवर आहे. विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान आपल्या प्रत्येक भाषणात उद्धव ठाकरे खरी शिवसेना कोणाची याबाबत मला न्यायालयाकडून फारशी अपेक्षा नाही. शिवसेना कुणाची याचा निर्णय आता जनतेच्या न्यायालयातच होईल, असे वारंवार संबोधित करीत होते. त्यासाठी ते राज्यातील विधानसभेच्या निवडणुकीची आतुरतेने वाट पाहत होते. कारण या आधी पार पडलेल्या मुंबईतल्या लोकसभा निवडणुकीत सहा मतदार संघापैकी चार जागा महाविकास आघाडीला तर दोन जागा महायुतीला मिळालेल्या होत्या. त्यामुळे महाविकास आघाडीचा आत्मविश्वास चौथ्या अस्मानाला भिडला होता. त्यात ही शिवसेना उद्धव ठाकरेंची. या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला महायुतीपेक्षा केवळ १.१८ टक्के अधिक मते मिळाली होती. पण आघाडीने ३० जागा जिंकल्या आणि युतीला १७ जागांवर समाधान मानावे लागले होते. महाविकास आघाडीला ४३.९१ तर महायुतीला ४२.७३ टक्के मिळाली होती. पण मुंबईचा फक्त विचार केला या ठिकाणी महाविकास आघाडीला या निवडणुकीत २ लाख मते महायुतीपेक्षा कमी पडली आहेत. २६ लाख महायुतीला, तर महाविकास आघाडीला २४ लाख मते पडली होती. ही कमी मते शिवसेना ठाकरेंच्या दृष्टीने धोक्याची घंटा होती.

पण नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीतील निकालाने राज्यातील जनतेने महाविकास आघाडीला पूर्णपणे नाकारले. या निवडणुकीत राज्यातील जनतेने दाखवून दिले की त्यांच्या मनातील खरी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस कोणती आहे. त्याद्वारे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचारांचा खरा वारसा कोण प्रभावीपणे पुढे नेऊ शकतो. या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेने ८१ जागांवर आपले उमेदवार उभे केलेत. त्यापैकी ५७ जागांवर विजयी झाले. १२.३८ टक्के मते शिवसेनेला मिळाली. तर त्यांना मिळालेल्या एकूण मतांची संख्या ७९ लाख ९६ हजार ९३० आहेत. उद्धव ठाकरे गटाला फक्त २० जागांवर विजय मिळवता आला आहे. ९.९६ टक्के मते त्यांना मिळाली आहेत. ६४ लाख ३३ हजार ०१३ इतकी एकूण मतं ठाकरे गटाला मिळाली आहेत. या निकालात शिवसेना उद्धव ठाकरेंपेक्षा वरचढ ठरली.

मागील २०१७ बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीत शिवसेनेला ८४, भाजपाला ८२ जागा मिळाल्यात. भाजपला शिवसेनेपेक्षा दोन जागा कमी मिळाल्यात. काँग्रेस पक्ष या निवडणुकीत तिसऱ्या स्थानावर राहिला असून ३१ जागा मिळाल्यात. तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला ७ तर राष्ट्रवादीला ९ जागा मिळाल्यात.

या सगळ्या पृष्ठभूमीवर उद्धव ठाकरे पक्षाच्या दृष्टीने आज मुंबई महानगर पालिका महत्त्वाची आहे. त्या मागचे मुख्य कारण अर्थकारण सोबत पक्षाचा पाया. आज एकट्या मुंबई महानगर पालिकेचे बजेट हे उर्वरित महाराष्ट्र राज्याएवढे आहे. तसे मुंबई महानगरपालिका जिंकली तरच उर्वरित महाराष्ट्रात पक्ष कार्यान्वित राहील हे उद्धव ठाकरे ओळखून आहेत. आजच्या परिस्थितीत मुंबईतच उद्धव ठाकरे यांचा पक्ष महाविकास आघाडीतील इतर घटकांपेक्षा मजबूत स्थितीत असला तरी गेल्या पाच वर्षात शिवसेना उद्धव ठाकरे हे सत्तेसाठी किती कोल्यांट्या मारत आहेत याची गणती न केलेली बरी.

मुंबईतील विधानसभा जागांचा विचार केला तर यावेळी भाजपाने १७ पैकी १५, उद्धव ठाकरे गटाने २२ पैकी १०, तर शिवसेनेने १५ पैकी ६, तर काँग्रेसने १० पैकी ३, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने २ पैकी शून्य, तर राष्ट्रवादी अजित पवार गटाने २ पैकी १ जागा जिंकल्या तर महाविकास आघाडीने १३, तर महायुतीने २२ जागा जिंकल्या आहेत. या विधानसभा निवडणुकीत आलेल्या अपयशानंतर उद्धव ठाकरे यांनी मुंबई महापालिकेवर मराठी माणसांचा, हिंदुत्वाचा झेंडा आहे तो उतरू नये, असे शिवसैनिकांना आवाहन केले आहे.

उद्धव ठाकरे पक्ष हा आतापर्यंत कायम कट्टर हिंदुत्ववादी विचारधारेचा पुरस्कर्ता असलेला पक्ष म्हणून ओळखला जात होता. मुस्लिम मतं शिवसेनेला कधीच मिळत नव्हती. पण उद्धव ठाकरे महाविकास आघाडीत आल्यामुळे लोकसभा, विधानसभा निवडणुकीत हा मुस्लिम मतदार उबाठाकडे वळला. याचा फायदा मुंबईत तसेच राज्यातील काही भागांत झाला.

विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्या महायुतीचा वाढलेला आत्मविश्वास, याउलट महाविकास आघाडीतील अंतर्गत द्वंद्व यात बदललेली राजकीय परिस्थिती बृहन्मुंबई महानगरपालिका आपल्याकडे राखणे म्हणजे उद्धव ठाकरेंसाठी अस्तित्वाची लढाई आहे.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

### डिमेंशिया खरंच काळजीचा विषय

तरुण भारत आकांक्षा पुरवणीतील मंगला जोगळेकर, ज्या या विषयातील तज्ज्ञ आहे, यांचा या विषयावरचा अभ्यासपूर्ण लेख वाचला. डिमेंशिया किंवा विस्मरण हा आजार आता भयावह रूप धारण करतो आहे. आधी फक्त उतारवयात होणारा हा आजार तरुणांनाही होताना दिसत आहे. हा आजार बरा होणे कठीण आहे व तो वाढतच जातो हा फार भयंकार अनुभव आहे. सुरुवातीला होणाऱ्या विस्मरणाची लोक गंमत करतात पण ही सुरुवातच घातक असते हे लक्षात घ्या.

हा आजार होणारा व परिवार दोन्ही फार त्रस्त असतात कारण याला इलाज नाही व दिवसेंदिवस होणारी वाढ ही जीवावर पण बेतू शकते. कारण पुढे पुढे हे विस्मरण घातक सिद्ध होऊ शकते. नाव, पत्ता विसरणे यामुळे फार कठीण प्रसंग ओढवतात. ज्याचा परिवाराला फार मानसिक त्रास होतो.

समुपदेशन व योग्य मार्गदर्शन उपयोगी सिद्ध होते आहे. याकरिता समाजसेवी वृत्तीच्या समुपदेशक मंगला जोगळेकर, (दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे) निःस्वार्थपणे गेली पंधरा वर्षे मार्गदर्शन करत आहेत. त्यांच्या मंगल.जोगळेकर जीमेल.कॉम वर आपण संपर्क साधू शकता. तसेच रामनगर नागपूरचे विजय (राजू) दिवेकर यांच्याशी पण संपर्क करू शकता. आरोग्य भारतीचे? डॉ. रमेश गौतम यात पुढाकार घेणार आहेत. आपल्या परिवारातील, ओळखीतील कोणाला हा त्रास असेल तर जरूर संपर्क साधावा.

**रवी वाघमारे**/९९६००१८०३०


### भारताला चीनपासून सतर्क राहण्याची गरज

कझानमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत युद्धाला नाही तर शांतता आणि संवादाला पाठिंबा देतो असे म्हटले होते. अलिकडेच रशियात झालेल्या 'ब्रिक्स'च्या परिषदेत त्यांनी दहशतवादाचा मुद्दा उपस्थित केला. या विषयावर दुटप्पी वृत्ती असता कामा नये, असे परखड मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडले होते. आंतरराष्ट्रीय मंचावर भारत कायमच दहशतवादाच्या विरोधात भूमिका घेत आला आहे. तथापि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रशिया दौऱ्यात सकारात्मक घटना घडली ती चीनसोबत झालेल्या द्विस्तरीय बैठकांची.

त्यातही भारताने अर्थात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शांतता आणि स्थैर्याचा मुद्दा मांडला. आणि चीननेही त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला. भारत आणि चीन संबंधात पुन्हा काहीसा कथित स्नेह परतताना दिसतो आहे. अर्थात हे ब्रिक्सच्या काही तासांच्या अवधीत झाले नाही. पाकिस्तानला झालेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या परिषदेपासूनच त्याची सुरुवात झाली होती. चीनसमोर आज जगातील इतरही काही विषय आहेत. त्यामुळे चीनने भारताशी जुळवून घेण्याचा किंवा त्यांच्या स्वभावाच्या विपरीत नमते घेण्याचा प्रयत्न केला गेला. भारताने यावर गाफील राहून चालणार नाही. आणि चीनबरोबरचा तणाव हलका होण्याच्या दिशेने आपण मार्गस्थ झालो आहोत या संतुष्टीतही जाता कामा नये. गेल्या चार वर्षांपासून भारत आणि चीन यांच्यात तणाव सुरू होता. दरम्यानच्या काळात कोविडचा अवधी सोडला तरी विविध जागतिक मंचांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनने राष्ट्रपती जिनपिंग यांच्या औपचारिक भेटी झाल्या. या भेटीत दोन्ही नेत्यांनी स्वतंत्र अशी चर्चा झाली नाही. ब्रिक्समध्ये रशियाच्या पडद्यामागच्या पुढाकाराने ही चर्चा केली गेली. उभय देशांच्या सर्वोच्च नेत्यांच्या भेटीच्या अवघे चोवीस तास अगोदर दोन्ही देशांत एक शांतता करारही झाला. त्यानुसार लडाखच्या पूर्व भागात दोन्ही देशांनी आपले सैन्य मागे घेण्याचे आणि प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर जुनी स्थिती पुन्हा बहाल करण्याचा निर्णय घेतला. आता दोन्ही देशांचे सैनिक आपापल्या हद्दीत सीमेवर गस्त घालतात. सीमावाद सोडवण्यासाठी आम्ही भारताला सहकार्य करू अशी ग्वाही चीनने दिली. करार आणि ब्रिक्सच्या दरम्यानची चर्चा यावरून ही बाब स्पष्ट होते की ताठर चीन आता लवचीक होण्याचा प्रयत्न करतो आहे. चीनला भारताशी अगदी पाकिस्तानप्रमाणे सर्व काळात किंवा सर्व ऋतूत बहरणारी मैत्री जरी नको असली तरी भारतासोबत आज त्यांना तणाव नको आहे. आपल्या सीमेवर तसेच आपल्या शेजारी देशांतील चीनच्या लुडबुडीकडेही अधिक लक्ष द्यावे लागणार आहे आणि सावधही राहावे लागणार आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/ ९४२०५६६४०४

### ढकलगाडी बंद करण्याचा स्वागतार्ह निर्णय



इयत्ता पाचवी आणि आठवीत नापास झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश न देता त्याच वर्गात ठेवण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. महाराष्ट्र सरकारने हा निर्णय गेल्याच वर्षी घेतला आहे. आता केंद्र सरकारने हा निर्णय घेतल्याने तो संपूर्ण देशासाठी लागू झाला आहे. केंद्र सरकारने घेतलेला हा निर्णय स्वागतार्ह आहे. पालक, शिक्षक आणि समाजातून या निर्णयाचे स्वागतच होत आहे कारण असा निर्णय घ्यावा अशी मागणी मागील अनेक वर्षांपासून होत होती. शिक्षण हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन होत होते. त्यात विद्यार्थ्यांची परीक्षाही होत असे मात्र नापास होणारच नाही याची खात्री असल्याने विद्यार्थी परीक्षेसंदर्भातील म्हणावे तितके गंभीर नसत. पासच होणार असल्याने काही मुले अभ्यासाकडे दुर्लक्ष करीत असे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेत घसरण होऊ लागली होती. विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेत घसरण होऊ लागल्याने शिक्षणाच्या दर्जावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. आता सरकारने हा निर्णय घेतल्याने नापास होण्याच्या भीतीने तरी विद्यार्थी नियमित अभ्यास करतील. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन पातळीत वाढ होऊन शिक्षणाचा दर्जा उंचावेल.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### धर्म-संस्कृती -श्रद्धा

२०२५ या इंग्रजी नवीन वर्षाच्या कालगणनेनुसार काही प्रख्यात मंदिरे भक्तांच्या सोयीसाठी ३१ डिसेंबर २०२४ संपूर्ण रात्र दर्शनासाठी उघडी राहातील. त्यामुळे रात्रीची शेजारती व ०१ जानेवारीच्या पहाटेची काकड आरती होणार नाही अशी बातमी सातत्याने दूरदर्शन वाहिनीवर बघायला मिळते आहे. याचा अर्थ भक्तांच्या आशेवर परमेश्वराचे अधिष्ठान असते का? की ईश्वरकृपेमुळे जगाचे रहाटगाडगे चालते? याचे भान कोणालाच राहिलेले दिसत नाही . अखंड रात्रभर दर्शन हे तात्पुरते मान्य केले तरी भगवंताच्या अर्चेनेमध्ये खंड का पडला जातो? त्यामुळेच धर्म -संस्कृती आणि श्रद्धा या गोष्टींना तडा जातो आहे याकडे कोणी लक्ष देतील का? आणि देवाला रात्रीच्या १२ वाजता दुसरा दिवस अभिप्रेत आहे का? आणि असे असेल तर धर्मशास्त्राप्रमाणे हिंदू पंचांगांना तिलांजली दिली असा समज होणे चुकीचे ठरणार नाही . चैत्र पाडव्याच्या प्रथम दिवशी अशी मंदिरे दर्शनासाठी उघडी नसतात याचे भान मंदिरातील धर्मशास्त्र पंडितांनी आणि सरकारने ठेवणे गरजेचे वाटते. केवळ मंदिराचे उत्पन्न वाढावे हाच मुख्य हेतू समोर येतो आहे. हिंदुत्व आणि हिंदू समाज यामुळे अन्य धर्मीयांपेक्षा अंध होतो आहोत.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७


### हिंदू समाजाचे संघटन हे एक व्रत

आपला भारत हा देवनिर्मित आहे. अनादी काळापासून हिमालय याची साक्ष आहे. गंगा, यमुना व सरस्वती या नद्या पण हेच सांगत आल्या आहेत. इथेच श्रीराम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, सीतादेवी अवतरल्या. भगवान श्रीकृष्ण, राधा, गोपी अवतरल्या. कारण हा देश देवनिर्मित आहे. आपला परमेश्वरावर विश्वास, देशावर प्रेम म्हणूनच आपण या भारत भूमीत हिंदू समाजात जन्माला आलो. भगवद्गीतेत तर श्रीकृष्णाने स्पष्टच सांगितलेले आहे, "साधूचे संरक्षण, दुष्टांचा नाश आणि धर्माची स्थापना करण्यासाठी मी युगे युगे जन्म घेतो." आणि म्हणून १८८९ साली डॉ. हेडगेवार यांचा जन्म झाला. पुन्हा भारत हिंदू समाज याचे संरक्षण करून हिंदू समाजाचे विशाल संघटन डॉ. हेडगेवार यांच्याकडून झाले. डॉ. हेडगेवार हे आध्यात्मिक वृत्तीचे होतेच पण प्रखर देशभक्तही होते. हिंदू राष्ट्राला बलवान करण्यासाठी हिंदू संघटित असला पाहिजे हे त्यांनी हेरले होते व तसे सिद्धही केले. म्हणून आपला समाज संघटित व्हावा असा प्रयत्न आपण सर्वांनी करायला हवा.

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

### समृद्धी महामार्गावर अडथळे

समृद्धी मार्गावर अलिकडे अपघातांचे प्रमाण कमी झाले आहे. मात्र या महामार्गावर अनेक नादुरुत वाहने २-४ दिवस जागेवरच थांबलेली दिसतात. या महामार्गावर पाळीव प्राणी किंवा जनावरे असू नये, पण या महामार्गाच्या लगत गाई, म्हशी, शेळ्या चरताना दिसतात. ही जनावरे आपातकालीन मोकळ्या



जागेत केव्हाही येऊन मोठा अपघात होऊ शकतो. कुत्र्यांचाही मुक्त संचार या मार्गावर सर्रास असतो. जर अपघातात एखादे कुत्रे आले तर ते मृतावस्थेत कित्येक दिवस तेथेच पडलेले असते. रानटी प्राणी विशेषतः हरणांचा कळपही या मार्गावर येतो. कारण या महामार्गाच्या बाजूला जे सिमेंट कंपाऊंड आहे, त्यांचे अनेक पत्रे काढून शेजारी राहणाऱ्या नागरिकांनी गाई, म्हशी व शेळ्या चारण्यासाठी मार्ग काढला आहे.

या सर्व बाबी मोठ्या किंवा छोट्या अपघातांना कारणीभूत ठरतात. त्यामुळे या महामार्गाच्या सुरक्षेच्या दृष्टीने सर्व बाबतीत सतर्कता बाळगून हे अडथळे दूर करण्यासाठी सर्वंकष प्रयत्न व्हावेत अशी अपेक्षा आहे.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

### जड झाले ओझे




गेल्या काही वर्षांत विमान प्रवास करणाऱ्यांची संख्या प्रचंड वाढलेली आहे. देशांतर्गत विमान प्रवास करताना आपल्यासमोर इंडिगो, एअर इंडिया आणि क्वचित इतर विमान कंपन्यांचे पर्याय उपलब्ध असतात. तिकिटांचे दर आणि वेळापत्रक बघता इंडिगोची निवड केली जाते. इंडिगोच्या देशांतर्गत विमान प्रवासासाठी प्रत्येकी पंधरा किलोपेक्षा कमी वजनाची एक चेक-इन बॅग आणि सात किलोपेक्षा कमी वजनाची एक हॅण्ड बॅग अशी परवानगी आहे. चेक-इन होणाऱ्या सामानाचे वजन पंधरा किलोपेक्षा जास्त असल्यास अतिरिक्त पैसे घेतले जातात. पण हॅण्ड बॅगच्या बाबतीत ना वजन केले जाते ना त्यांची संख्या बघितली जाते. अनेक प्रवासी एकपेक्षा जास्त हॅण्ड बॅग्स, सात किलोपेक्षा जास्त वजनाच्या आणि अवाढव्य आकाराच्या बिनदिक्कत घेऊन जात आहेत. विमानात चढताना आणि उतरताना या बॅगचा इतर प्रवाशांना त्रास होतो. विमानात सीटच्या वर असलेली सामान ठेवण्याची जागा हाऊसफुल्ल होऊन जाते. क्वचितप्रसंगी वरून सामान काढताना या मोठाल्या बॅगमुळे इतर प्रवाशांच्या डोक्याला इजा होण्याची शक्यता असते. विमानतळावर या बॅग वाहून नेण्यासाठी ट्रॉलीचा उपयोग करणे आवश्यक आहे. पण सामानासोबत लहान मुलांना बसवणे चुकीचे आहे. विमान कंपन्यांनी याकडे लक्ष द्यावे.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

### हाताला काम हवं !

ग्रामीण भागात विशेषता कोकणात रोजगाराची अपुरी साधने, पाण्याची कमतरता, हाताला अपुरे काम यास्तव तेथील उरली सुरली युवा पिढी शहरी भागात स्थलांतरित होत असून, साहजिकच बहुतांश शेत जमिनी ओस पडू लागल्या आहेत. डोंगर उजाड होत असून, एकेकाळी वाडे, खुराडी प्रत्येक घरी भरभरून असायची. परंतु आज ती सुद्धा रिकामी आहेत किंवा अस्तित्वात नाहीत. शेती निगडित पशुधन आणि लघुउद्योग निर्मित पक्षिधन यांच्यातही मोठ्या प्रमाणात घट होत आहे. वाडे, खुराडे रिकामी पडत आहेत अशीच परिस्थिती होत राहिली तर भविष्यासाठी ही परिस्थिती गंभीर असून वेळीच तज्ज्ञ, कोकणातील लोकप्रतिनिधी यांनी गांभीर्याने या संकटाकडे लक्ष घालून कोकण भूमीच्या सर्वांगीण विकासासाठी शेती, पशु, पक्षिधन, वाढविण्यासाठी, हाताला काम देण्यासाठी त्वरित उपाययोजना आखणे गरजेचे आहे. अजून वेळ गेलेली नाही.

**विश्वनाथ पंडित**/९५८८४५०४४२

# वेळापूरच्या इंग्लिश स्कूलचे खेळाडू राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत चमकले

## ● अयोध्यातील स्पर्धेत मुलींना सुवर्ण, मुले रौप्यचे मानकरी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

आयोध्या (उत्तरप्रदेश) येथे झालेल्या शालेय १७ वर्षांखालील राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुली सुवर्ण तर मुले रौप्य पदकाचे मानकरी ठरले.

यात इंग्लिश स्कूल, वेळापूर व अर्धनारी नटेश्वर क्रीडामंडळाचे खेळाडू प्राजक्ता सोमनाथ बनसोडे व आश्विनी गोविंद मांडवे या दोघींनी खो खो मुली संघात उत्कृष्ट खेळी करत महाराष्ट्रला सुवर्ण तर मुलांच्या स्पर्धेत शंभुराजे चंदनशिव, अरमान शेख, अकबर शेख या तिघांनी रौप्य पदक मिळवून दिले. या वर्षी प्रशालेतील खेळाडूंनी चार सुवर्ण, तीन रौप्य, व एक कांस्य पदक मिळविले. झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये ८०पेक्षा जास्त खो-खो खेळाडूंनी सहभाग नोंदवला. या खेळाडूंना सतीश कदम, राष्ट्रीय प्रशिक्षक सोमनाथ बनसोडे, शिवाजी जाधव, जावेद मुलाणी, जावेद आतार, पोलिस शहाजी मंडले, श्रीनाथ खटके, सत्यजीत बारुंगुळे, संजय मंडले, लखन मंडले, भैय्या कोडग, बाबाराजे चंदनशिव यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी खेळाडूंचे आमदार उत्तमराव जानकर, वेळापूरचे सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासाहेब मुंगुस्कर, माजी उपसरपंच जावेद मुलाणी, दादासाहेब घाडगे, जीवन जानकर, संजय देशपांडे, मिलींद सरतापे, संस्थेचे अध्यक्ष सुजित कदम, सचिवा डॉ. प्रियदर्शनी महाडिक, संस्था उपाध्यक्ष डॉ. सुभाष कदम, संस्था मार्गदर्शिका व संचालिका डॉ. मीनाताई कदम, संचालिका तेजस्विनी कदम, स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन प्रतापराव पाटील, प्राचार्य आर. बी. पवार, उपमुख्याध्यापक पठाण शिवशरण, पर्यवेक्षक सावळे बी एस, तसेच शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष काकासाहेब मेटकरी आदींनी अभिनंदन केले.

### वेळापूर खो-खोची पंढरी

वेळापूर नगरी ही खो-खो ची पंढरी आहे आणि यामध्ये आतापर्यंतच्या इतिहासामध्ये नवीन उच्चांक इंग्लिश स्कूल वेळापूरच्या विद्यार्थ्यांनी घडवला आहे. पालखी मैदानावरती रोजचा होणारा सराव आणि सर्वांचे मार्गदर्शन व विद्यार्थ्यांनी घेतलेले परिश्रमामुळे मिळालेले यश हे कौतुकास्पद आहे.

**-आर. बी. पवार, प्राचार्य इंग्लिश स्कूल, वेळापूर**



# भुवनेश्वरी संघाची विजयी सलामी

## श्री तोगटवीर क्षत्रिय युवक संघटनेची महाराज चषक किक्रेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

श्री तोगटवीर क्षत्रिय युवक संघटना आयोजित श्री तोगटवीर क्षत्रिय समाज अंतर्गत महाराज चषक किक्रेट स्पर्धेत भुवनेश्वरी संघाने बनशंकरी संघाचा पराभव करीत विजयी सलामी दिली.

अन्य सामन्यात कुलस्वामिनी, जगदंबा, शारदंबा, माहेश्वरी व बनशंकरी संघ या संघानी प्रतिस्पर्धी संघाविरूद्ध विजय संपादन केले.येथील पुंजाल मैदानावर आठ संघानी भाग घेतलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन तोगटवीर समाज अध्यक्ष नागनाथ कोंतम यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी श्री चौडेश्वरी तोगटवीर पतसंस्थेचे चेअरमन विठ्ठल बडगंची, तोगटवीर संस्थेचे अध्यक्ष सुभाष चिलवेरी, युवक संघटना अध्यक्ष दत्तात्रय बडगंची, समाज उपाध्यक्ष युवराज चिंता, खजिनदार अरुण भिमरथी आदी मान्यवर उपस्थित होते.

ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी युवक संघटनेचे सदानंद अकिम, अजय द्यावरकोंडा, प्रशांत रंगम, साई कंदिकोंडा, उमेश मायकुंटे, विनायक मादम यांच्यासह युवक संघाचे कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.



# महाराष्ट्र डॉजबॉल संघात सोलापूरच्या सहा खेळाडूंची निवड

## संघ चेन्नईकडे रवाना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ डिसेंबर**

महाराष्ट्राच्या सब ज्युनिअर डॉजबॉल संघात येथील ६ खेळाडूंची निवड झाली. नंदिता नंदुरकर, सूर्या सावंत, प्रांजली जगदाळे आणि हर्ष कुडगुंटे, सुदर्शन काळे व ऋतुराज काळे हे निवड झालेले खेळाडू आहेत.

तामिळनाडू चेन्नई येथे सुरु असलेल्या सब ज्युनिअर राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेकरिता महाराष्ट्र राज्य डॉजबॉल मुला मुलींचा संघ चेन्नईकडे रवाना झाला. तत्पूर्वी जालना येथे झालेल्या राज्य स्पर्धेतून महाराष्ट्राच्या मुला-मुलींच्या संघांची निवड करण्यात आली होती. या संघाचे सराव शिबिर येथील सिंहगड कॉलेज येथे आयोजित केले होते. संघास महाराष्ट्र राज्य डॉजबाल असोसिएशनचे सचिव श्री लुंगे, सदस्य सुदेश मालप, शरण वांगी पवन भोसले यांनी शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले या संघासोबत मार्गदर्शक म्हणून आशिष जगताप, अमन दोमाले, शरद बडे, फिरोज पठाण हे आहेत.

**मुले : पृथ्वीराज गजानन वायल, लदाफ सैफअली नबीसाब, विकास बालाजी पारवे, ध्रुव राजेश पांडे, हर्षवर्धन संजय कुडगुंटे, सुदर्शन चंद्रकांत काळे, हर्षल सुरेश लोखंडे, ऋतुराज धनंजय काळे, निलेश मुकेश भारवाड, श्रेयश श्रीरंग गोले, सोहम विलास जाधव, सुरज शिवाजी धामधेरे.**

**मुली : प्रांजली जगदाळे, सूर्या सावंत, नंदिता नंदुरकर (सोलापूर), मानसी चव्हाण, श्रावणी चव्हाण, सिद्धी विधाते, अक्षरा पाटील, शमिका दाते, समीक्षा देवाडे (पुणे), आरती आरगडे, प्रीती भोपळे (जालना), प्रणाली चव्हाण (नागपूर).**

# राष्ट्रीय योंगमुडो स्पर्धेमध्ये रुद्रशक्ती गुरुकुलची १६ पदकांची कमाई

## ▸▸ १४ सुवर्ण, १ रौप्य, १ कांस्य




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

मुंबई (विरार) येथे झालेल्या ९ वी राष्ट्रीय योंगमुडो स्पर्धेमध्ये पूमसे आणि क्युरोगी या प्रकारात येथील रुद्रशक्ती गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी १४ सुवर्ण, १ रौप्य व १ कांस्य अशी १६ पदकांची कमाई केली.

या विद्यार्थ्यांना मुख्य प्रशिक्षक विवेक मिस्कीन यांचे मार्गदर्शन लाभले. योंगमुडो असोसिएशन महाराष्ट्र सचिव नागेश शेट्टीकर, योंगमुडो असोसिएशन इंडिया अध्यक्ष रोहित नारकर, रुद्रशक्ती गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष योगीनाथ फुलारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

### कामगिरी

▸ **१० वर्षाखालील**
जानवी म्हेत्रे (२ सुवर्ण ), दुर्वा रोहिटे (२ सुवर्ण).

▸ **१४ वर्षाखालील**
दिव्या मिस्कीन (२ सुवर्ण), आदिती नल्ला (२ सुवर्ण), गौरी माळी (२ सुवर्ण), बिंदूप्रिया कुने (२ सुवर्ण), हार्दिक चिलका (१ सुवर्ण, १ रौप्य) भावेश कुने (१ रौप्य, १ कास्य).



# प्रार्थना स्पोर्टस् अकादमीस विजेतेपद

## शरद चषक क्रॉसकंट्री स्पर्धा : स्वामी समर्थ अक्कलकोट, अजिंक्य पंढरपूरची बाजी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

शरद चषक क्रॉसकंट्री स्पर्धेत येथील प्रार्थना स्पोर्ट्स अकॅडमी, अक्कलकोटचे स्वामी समर्थ अन्नछत्र क्रीडा मंडळ व पंढरपूरच्या अजिंक्य स्पोर्टस् अकादमीने आपापल्या गटातून सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले.

शासकीय मैदान नेहरूनगर येथे शरदचंद्रजी पवार यांच्या वाढदिवसानिमित्त सोलापूर शहर व जिल्हा अ‍ॅथलेटिक्स असोसिएशन व समृद्धी स्पोर्ट्स क्लब सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा झाली. याचे उद्घाटन व पारितोषिक वितरण समारंभ उद्योजक तथा शिक्षक समितीचे राज्य उपाध्यक्ष राजन सावंत यांच्या हस्ते झाले. यावेळी समृद्धी स्पोर्ट्स क्लबचे अध्यक्ष तथा असोसिएशनचे सचिव प्रा. राजू प्याटी, उपाध्यक्ष रामचंद्र दत्तू, फैजअहमद बेगमपुरे, तुकाराम शेंडगे, राज्य अ‍ॅथलेटिक्स मार्गदर्शक मा. गणेश पवार, सचिव संजय सावंत, जीवन इंगळे, श्रीरंग खांडेकर, रवी राठोड, प्रकाश गायकवाड, गणेश कुडले, शोभराज प्याटी आदी उपस्थित होते.

### स्पर्धेचे अंतिम निकाल याप्रमाणे (प्रथम तीन ते सहा)

▸ **खुला गट पुरुष :** अरुण धनसिंग राठोड, सुमित अविनाश जावीर, पवन विलास सुरवसे. खुलागट महिला : अश्विनी मोहन इगवे

▸ **२० वर्षांखालील मुले :** कुमार नामदेव मदने, अनिकेत हरिबा देशमुख, रमेश अण्णासो वगरे, संग्राम अनिल राठोड, सचिन तुकाराम बोदगिरे. मुली : गायत्री शांतीलाल मासाळ, प्रीती दत्तात्रय माने, विजयलक्ष्मी महेश कळके.

▸ **१८ वर्षांखालील मुले :** कृष्णा अंबादास लोंढे, शशिकांत जगन्नाथ चव्हाण, रखमाजी पांडुरंग गडदे, समर्थ दशरथ लोंढे, सुमित सतीश माने. मुली : मालन विनोद नाईकनवरे : गौरी साहेबराव रणदिवे.

▸ **१६ वर्षांखालील मुले :** राहुल गिरमल अस्वले, कार्तिक राहुल साळुंखे, सिद्धाराम सोमनाथ मैंदर्गी, आर्यन विकास पवार, ओम शिवसिंग चव्हाण, मेघराज धानय्या हिरेमठ. मुली : सानिका परमेश्वर आयवळे, आरोही प्रदीप पाटमास, अर्पिता तुळशीराम पवार, श्रावणी दशरथ लोंढे, अनुश्री हरिदास माशाळ, सृष्टी संजय राठोड.



# मुंगशीतून मोटरसायलची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २८ डिसेंबर-**

बार्शी तालुक्यातील मुंगशी (आर) येथील पत्राशेडमध्ये लावलेली मोटारसायकल अज्ञात चोरांनी पळवली असून फिर्यादी हरिचंद्र शत्रुघ्न कुरुंद (रा. मुंगशी आर) यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरा विरुद्ध वैराग पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर चोरीची घटना दि २८ रोजी उघडकीस आली. हकीकत अशी की, फिर्यादी यांची तीस हजार रुपये किंमतीची हिरो फॅशन प्लस मोटारसायकल (क्र. एम. एच. १३/ इ. जे. २७४४ )ही फिर्यादीचे राहत्या घरासमोरील खुल्या पत्र्याचे सेडमध्ये हॅन्डल लॉक करुन लावली असताना. ती कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या परस्पर लबाडीने चोरुन नेली आहे.

## पुतळाबाई मानकर यांचे निधन

**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**



कर्णिक नगर येथील पुतळाबाई मानकर (वय ७७) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे.कर्णिक नगर येथील डॉ. सूर्यकांत मानकर यांच्या त्या आई तर डॉ. स्नेहलता, डॉ.कोमल, डॉ. तुषार, डॉ. मेघा मानकर यांच्या आजी होत.

# बोरामणी नाका येथे बल्करने धडक दिल्याने दुचाकीवरील तिघे जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

जुना बोरामणी नाका येथे सिमेंट बल्करने धडक दिल्याने दुचाकीवरील तिघे जखमी झाले.

याबाबत राहूल सिध्दाराम गामाजी (वय २९, रा. अरळी, ता, अक्कलकोट, जि. सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन परमेश्वर प्रल्हाद दाईंगडे (वय ४५, रा. दाईंगडेवाडी, ता. मोहोळ) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ डिसेंबर रोजी सकाळी साडेआकराच्या सुमारास जुना बोरामणी नाका येथे राहुल गामाजी हे एमएच १३ ईएम ६३९३ या दुचाकीवरून पत्नी व मुलास घेऊन सिग्नल सुटल्यावर पुढे जात होते. त्यावेळी परमेश्वर दाईंगडे याने त्याच्या ताब्यातील सिमेंट बल्कर क्र. एमएच १२ व्हीटी ९९३६ या गाडीवर मदतनीस न ठेवता सिग्नल सुटल्यानंतर इंडिकेटर न लावता गामाजी यांच्या दुचाकीस जोरदार धडक दिली. यामध्ये दुचाकीवरील राहुल गामाजी, त्यांची पत्नी व मुलगा हे गंभीर मार लागून जखमी झाले. त्यामुळे याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार राठोड पुढील तपास करीत आहेत.

### गांधी नगरमधून दुचाकीची चोरी

**सोलापूर :** शहरातील अक्कलकोट रोडवरील गांधी नगर येथून चोरट्याने ४० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली.

याबाबत शाहिद अल्लाबक्ष छुरी (वय २१, रा. महेश नगर, घर नं. ६२, हैद्राबाद रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फियादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २६ डिसेंबर रोजी




रात्री शाहिद छुरी याने त्याची एमएच १३ डीजी ११५३ क्रमांकाची दुचाकी ही गांधी नगर येथे हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद एमआयडीसी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिस हवालदार भांगे पुढील तपास करीत आहेत.

### हातउसने घेतलेले पैसे मागितल्याने मारहाण

**सोलापूर :** हातउसने घेतलेले पैसे मागितल्याने तरूणास फरशीच्या तुकड्याने मारहाण करण्यात आली. याबाबत रिजवान खलील मुच्छाले (वय ३८, रा. तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अरबाज मैंदर्गी, मुज्जु मैंदर्गी, गुलाब मैंदर्गी, एक अनोळखी यांच्याविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२६ डिसेंबर रोजी दुपारी सदानंद मंगल भांडारजवळ रिजवान मुच्छाले थांबला होता. त्यावेळी अरबाज मैंदर्गी याने मुच्छाले यास तु माझ्याकडून हातउसने घेतलेले १० हजार रुपये दे असे म्हणाला. त्यावर मुच्छाले याने पैसे नाहीत असे म्हणाल्यानंतर अरबाजने रिजवानला शिवीगाळ केली. तेवढ्यात इतर आरोपींनी येऊन रिजवान यास तु अरबाज याच्याकडून घेतलेले पैसे दे असे म्हणून शिवीगाळ करून फरशीच्या तुकडयाने कानावर मारून जखमी केले. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार काळे तपास करीत आहेत.

### भवानी पेठेतून ३० हजारांची दुचाकी चोरीस

**सोलापूर :** शहरातील भवानी पेठेतून चोरट्याने ३० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत सचिन शशिकांत रवि (वय ४६, रा. भवानी पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सचिन रवि यांनी त्यांची एमएच १३ यू ५५०५ क्रमांकाची दुचाकी ही २६ डिसेंबर रोजी सायंकाळी घरासमोर हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जोडभावी पेठ पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस हवालदार शिवशरण पुढील तपास करीत आहेत.

### उत्कर्ष नगरातून ५० हजारांची दुचाकी चोरीस

**सोलापूर :** शहरातील विजापूर रोडवरील उत्कर्ष नगर येथील महापालिकेच्या शाळेसमोरून चोरट्याने ५० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली.याबाबत राकेश किसन बडवणे (वय ३४, रा. उत्कर्ष नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राकेश बडवणे यांनी २२ डिसेंबर रोजी दुपारी महानगरपालिका शाळा क्र. ४ येथे त्यांची एमएच १३ सीवाय ६२०२ क्रमांकाची दुचाकी हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद विजापूर नाका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिस हवालदार हार पुढील तपास करीत आहेत.

# सर्व वाहनांना हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट बसविणे बंधनकारक

**सोलापूर, दि. २८ डिसेंबर -**

केंद्रीय मोटार वाहन नियमानुसार राज्य शासनाने सर्व वाहनांना हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट बसविण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार जिल्ह्यातील वाहनधारकांनी हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट बसवावी, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांनी केले आहे.

जिल्ह्यासाठी एजंसी निश्चित करण्यात आली असून, एचएसआरपी नंबर प्लेटसाठी बुकींग करण्यासाठी http://maharashtrahsrp.com हे पोर्टल निश्चित केले आहे. वाहनधारकांनी पोर्टलवर बुकींग करून त्यांच्या सोईप्रमाणे अपॉइंटमेंट घेऊन एचएसआरपी नंबर प्लेट बसवून घेण्यात यावी. वाहनधारक सोलापूर कार्यालयातील नोंदणीधारक नसला तरी सोलापूरमध्ये वाहन वापरत असल्यास एचएसआरपी नंबर प्लेट बसविणे आवश्यक आहे. दुचाकी, ट्रॅक्टरसाठी ४५०, तीनचाकीसाठी ५००, इतर सर्व वाहनांसाठी ७४५ रूपयांप्रमाणे जीएसटी वगळून शुल्क आकारण्यात येईल. वाहनधारकांना त्यांच्या वाहनावर एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्याबाबत तक्रारी असल्यास संबंधित सेवापुरवठा धारकांच्या पोर्टल, तसेच सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयात तक्रार दाखल करू शकतील. वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करून होणारे गुन्हे कमी करणे, वाहनांची ओळख पटविणे, तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व वाहनांना एचएसआरपी बसविणे आवश्यक आहे. यासाठी सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत.

Shri Vishweshwar Shikshan Prasarak Mandal’s
Proposed- Vishweshwarayya Institute of Management and Technology
Wasangaon, Tq. Latur, Dist. Latur Email: svspma@gmail.com

**RECRUITMENT**

Applications are invited for the following Non granted posts to filled for the academic year 2025-26 in our college.

| Sr. No. | Post | Qualification | Required |
|---|---|---|---|
| 01 | Principal | MCA /ME, Ph.D. | 01 |
| 02 | Assistant Professor | MCA | 01 |
| 03 | Assistant Professor | MSC Math | 01 |
| 04 | Assistant Professor | M.A., English | 01 |
| 05 | Librarian | M Lib | 01 |
| 06 | Accountant | B Com/ M Com | 01 |
| 07 | Lab Technician | BCA | 02 |
| 08 | Clerk | Any Graduate | 01 |
| 09 | Peon | 10th/12th | 03 |


Qualification, age & pay scale as per Govt. of Maharashtra, UGC and AICTE , New Delhi norms. Interested candidates should send their applications along with Xerox copies of certificates, and two recent photographs with 08 days from the publishing date of this advertisement on above email address.

Secretary
Shri Vishweshwar Shikshan Prasarak Mandal,
Almala, Tq. Ausa, Dist.Latur

# पंढरपूर कॉरिडॉर : ४० हजार चौरस फुटांचे ४४१ कोटींतून भूसंपादन, पुनर्वसनासाठी २२५ कोटी

## विठ्ठल मंदिराचा सुमारे २० एकरांचा सभोवताल भाविकांच्या सुविधांसाठी होणार खुला..!





**पंढरपूर कॉरिडॉर केवळ प्रस्तावित असून या प्रकल्पाबाबत कोणताही ठोस निर्णय नाही. शासन, प्रशासन स्तरावर जबाबदार व्यक्तींकडून या प्रकल्पाबाबत कोणतेही सूतोवाच नाही. परिणामी प्रकल्पाबाबत खोटा नेरेटिव्ह पसरुन शासनविरोधी वातावरण तयार होण्याची शक्यता आहे.**


**-महेश भंडारकवठेकर,**
**पंढरपूर, मो. ७५८८०२०७६६**


महाराष्ट्राची दक्षिण काशी तथा अध्यात्मिक नगरी म्हणून संपूर्ण देशात नव्हे तर जगभरात ओळखल्या जाणाऱ्या विठुरायाच्या पंढरीनगरीने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींना देखील मोहिनी घातलेली आहे. दर बारा वर्षांनी एकदा देशात मोजक्याच तीर्थस्थळी कुंभमेळा संपन्न होत असतो. मात्र वारकरी सांप्रदायात कुंभमेळ्या पेक्षा जास्तीचे महत्व असलेला आषाढी यात्रेचा सोहळा दरवर्षी पंढरपूरात संपन्न होत असतो. त्यामुळेच पंढरपूरचे अध्यात्मिक महत्व ओळखून पंतप्रधान मोदींनी पंढरपूर 'कॉरिडॉर' म्हणून विकसित करण्याचे स्वप्न बाळगले आहे. देशाच्या अर्थमंत्री निर्मला सितारामण यांनी पंढरपूर 'कॉरिडॉर' हा पंतप्रधान मोदींचा ड्रीमप्रोजेक्ट असल्याचे नुकतेच सूतोवाच करुन त्यावर शिक्कामोर्तब केलेले आहे. त्यामुळे हा प्रकल्प राज्यातील महायुती सरकारच्या दृष्टीने देखील महत्वपुर्ण मानला जात आहे. आयोध्या, वाराणसी, तिरुपती, उज्जैनच्या धर्तीवर पंढरपूर तीर्थक्षेत्र विकासाचा प्रयत्न केंद्र आणि राज्य शासनाकडून केला जात आहे. पंढरपूर कॉरिडॉर विकसित झाल्यानंतर देशभरातील लाखो धार्मिक पर्यटकांचा ओढा पंढरीकडे वाढेल. वारक-यांसाठी दर्शन रांग, नदी घाट, पायाभूत सुविधांसह रोजगाराच्या नवीन संधीची उपलब्धता राहील. पंढरपूर 'कॉरिडॉर' ७६ हजार चौरस मीटर क्षेत्रावर राबविण्याचे प्रस्तावित असल्यामुळे विठ्ठल मंदिराला सुमारे २० एकराचा सभोवताल भाविकांच्या सुविधांसाठी उपलब्ध होईल. बाधित निवासी, व्यावसायिकांना नुकसान भरपाई म्हणून ४४१ कोटी रुपये तर त्यांच्या पुनर्वसनासाठी म्हणजे घरे, व्यापारी संकुलांसाठी २२५ कोटी रुपये असे एकूण ७१६.२५ कोटी रुपयांचा निधी या प्रकल्पासाठी प्रस्तावित करण्यात आला आहे.

### कॉरिडॉरमुळे बाधित होणारे घटक

निवासी मालमत्ता (२७४ ). व्यावसायिक मालमत्ता (१९०). निवासी मालमत्ता (२७४). सेवाधारी कुटुंबे (२२५). मिश्र मालमत्ता (१७८). मठ (२१). मंदिरे (१६). इतर मालमत्ता (३७). मुळ मालक कुटुंब संख्या (४५२). भाडेकरु कुटुंब संख्या (१२८).


**शासकीय जमिनीचेही भूसंपादन (चौरस मीटरमध्ये) जागा मालकी क्षेत्रफळ खालील प्रमाणे)**

| | |
|---|---|
| सार्वजनिक रस्ते | २३ हजार ७५० |
| विठ्ठल मंदिर समिती | ६ हजार ६५० |
| नगरपालिका | १ हजार ७५५ |
| मठ, मंदिर, धर्मशाळा | ५ हजार २९५ |
| एकूण | ३६ हजार ४५० |

व्यावसायिक पुनर्वसन करण्याकामी उपलब्ध होणाऱ्या जागा




रहिवास पुनर्वसन करण्याकामी उपलब्ध जागा




### कॉरिडॉरचा काय फायदा होणार

कॉरिडॉर झाल्यानंतर पंढरपूर शहराच्या विकासाला मोठी गती मिळणार आहे. अयोध्या, उज्जैन, वाराणसी तसेच तिरुपती प्रमाणे येथे देशभरातून येणाऱ्या भाविकांची संख्या वाढेल. व्यवसाय, रोजगार आणि अर्थकारणाला चालना मिळेल. येथे येणाऱ्या वारकरी भाविकांना निवास आणि दर्शन सुविधा चांगल्याप्रकारे उपलब्ध होतील. सध्या श्री विठ्ठल मंदिर परिसर (प्रदक्षिणा मार्गाच्या आतील जुने गावठाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंढरपूर) मध्ये अतिशय अरुंद रस्ते आणि छोटे, छोटे बोळ आहेत. कॉरिडॉर-नंतर मंदिरा भोवतालच्या सर्व रस्त्यांचे रुंदीकरण, गर्दीवर नियंत्रण करणे शक्य होणार आहे.

### 'पंढरपूर कॉरीडॉर'बाबत अद्याप प्रशासनाकडे माहिती आली नाही

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ड्रीमप्रोजेक्ट असलेला (आयोध्या, वाराणसी, तिरुपती, उज्जैनच्या धर्तीवर) पंढरपूर कॉरिडॉर बाबत देशाच्या अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनीही नुकतेच मुंबईमध्ये सुतोवाच केले आहे. त्यामुळे वारकऱ्यांना केंद्रबिंदू मानुन साकारला जाणारा हा प्रकल्पही येत्या काळात होणार; हे निश्चित झाले आहे. यासंदर्भात दै. तरुण भारतच्या माध्यमातून विचारणा केल्यावर जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले, केंद्र, राज्य शासनाकडून या पंढरपूर कॉरिडॉरबाबत जिल्हा प्रशासनाकडे अद्यापपर्यंत तरी कोणताही जीआर, इतर बैठकांद्वारे सुचना स्पष्ट करण्यात आलेली नाही. याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडून सुचना आल्यावर जिल्हा प्रशासन त्यावरही काम करण्यास तयार आहे.

### केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या वक्तव्यामुळे चर्चेला उधाण

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १० जुलै २०२२ रोजी पंढरपूर कॉरिडॉरची घोषणा केली होती. मात्र त्या नंतर काही काळ या विषयावर पडदा पडला होता. मात्र राज्यात झालेल्या विधानसभा निवडणूकीच्या निकाला नंतर भाजपाचा गटनेता निवडी वेळी भाजपाच्या निरीक्षक म्हणून आलेल्या केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामण यांनी ४ डिसेंबर रोजी मुंबई मध्ये भाजपाच्या सर्व नवनिर्वाचित आमदारांना संबोधित करताना पंढरपूर कॉरिडॉर बाबत मोठे विधान केले. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पंढरपूर कॉरिडॉर हा ड्रीमप्रोजेक्ट असल्याचे त्यांनी सांगितले. त्या मुळे दस्तुरखुद्द देशाच्या अर्थमंत्र्यांनीच या बाबत सूतोवाच केल्यामुळे पंढरपूर कॉरिडॉर बाबत पुन्हा चर्चेला उधाण आले.

### प्रकल्प केवळ प्रस्तावित; अद्याप याबाबत ठोस काही नाही

राज्यभरात ज्या पंढरपूर कॉरिडॉरची चर्चा रंगली तो कॉरिडोर ७६ हजार ४५० चौरस मीटर्स क्षेत्रफळावर प्रस्तावित आहे. या पैकी ३६ हजार ४५० चौरस फूट इतके क्षेत्रफळ विना मोबदला उपलब्ध आहे. तर सुमारे ४० हजार चौरस मिटर खासगी क्षेत्र भुसंपादन करावे लागणार आहे. यामध्ये १६ मंदिरे, २९ मठ बाधित होणार आहेत.

### निवासी, व्यवसायिक पुर्नवसानासाठींच्या उपलब्ध जागा

रहिवासी पुर्नवसनासाठी उजनी कालनी वसाहत येथील १० हेक्टर जागा जी जलसंपदा विभागाच्या ताब्यात आहे. या जागेवर शासकीय कार्यालय व साधारणपणे ४० वर्षापूर्वीच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या सदनिका आहेत. या बरोबरच व्यवसायिक पुर्नवसनासाठी नगरपालिका मालकीची आरक्षण क्रं. ६८ शाँपिंग सेंटर, खादीग्रामोद्योगची जागा, आरक्षण क्रमांक ३४ नगरपालिका मालकीची खुली जागा, आरक्षण क्रं. ३३ खेळाचे मैदान ( या जागेवर काही भागात ५० वर्षापूर्वीचे बांधकाम आहे तर उर्वरित जागा खुली आहे. आरक्षण क्रमांक २९ शाँपिंग सेंटर ही गोरक्षण (खासगी मालकीची जागा), शिरसीकर यांची रहिवास विभागातील व नवीन साईट नं.४५ मधील आरक्षित जागा, जुनी कोर्टाची अर्बन बँके समोरील इमारत या बरोबरच मनमाडकर यांची रहिवासी विभागातील जागा उपलब्ध आहेत.

### प्रकल्पाबाबत खोटा नेरेटिव्ह पसरण्याची शक्यता

शासन आणि प्रशासकीय स्तरावर कोणताही जबाबदार व्यक्तीं या प्रकल्पा बाबत माहिती देताना दिसत नाही. त्यामुळे या प्रकल्पा बाबत उलटसुलट चर्चो पसरत आहे. परिणामी प्रकल्प जरी योग्य असला आणि राज्य शासनाकडून या प्रकल्पातील बाधितांना योग्य मोबदला देवून त्यांचे योग्य पुर्नवर्सन जरी केले जाणार असले तरी पंढरपूर नागरिकांना त्याबाबतची ठोस माहिती नसल्यामुळे अनभिज्ञ आहेत. शासन किंवा प्रशासनस्तरातील जबाबदार व्यक्तींकडून जो पर्यंत या बाबत ठोस माहिती दिली जाणार नाही तो पर्यंत नागरिकांमध्ये या प्रकल्पाबाबत संशयाचे वातावरणा निर्माण होईल. या संधीचा फायदा घेऊन झारीतील शुक्राचार्य केंद्र आणि राज्य शासना बद्दल खोटा नेरेटिव्ह पसरविण्याची भिती देखील काही जाणकांर पंढरपूरकंरांमधून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शासन आणि प्रशासनातील व्यक्तींनी या प्रकल्पाबाबत पुढे येवून योग्य माहिती द्यावी जेणे करुन खोटा नेरेटिव्ह पसरुन प्रकल्पा विषयी गैरसमज पसरणार नाही या बाबत दक्षता घेण्याची गरज आहे.

### बाधितांच्या हरकतीवर सुनावण्या

जिल्हा प्रशासनाने वाराणसी, उज्जैन, तिरुपती येथील तीर्थक्षेत्रांना भेटी देऊन खाजगी एजन्सीकडून कॉरिडॉरचा आराखडा तयार केला. मालमत्ता, भूसंपादन सर्वेक्षण करून, नुकसान भरपाई रक्कम आणि धोरण निश्चित करण्यात आले आहे. ऐतिहासिक वास्तु, मठ, पुरातन मंदिरे वाचवून आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यानंतर मालमत्ता धारकांच्या हरकती मागवून त्यावर सुनावण्या घेतल्या आहेत.

### विरोध वाढल्याने कॉरिडॉरचे काम लटकले

शासनाच्या या महत्वकांक्षी प्रकल्पाला विरोध वाढत गेल्याने कॉरिडॉरचे काम दोन वर्षांपासून पुढे सरकलेच नाही. दरम्यान सध्या विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील आतील भागातील सुशोभिकरणाचे काम सुरु आहे.

### कॉरिडॉर मध्ये विविध विकास कामांचा समावेश

विठ्ठल रुक्मिणी मंदिर विकास, दर्शन रांग सुधारणा, घाट बांधकाम आणि या परिसरात करावयाची पायाभूत विकास कामे, पंढरपूर शहरात अन्यत्र करावयाची विकास कामे, पालखी तळ भूसंपादन आणि विकास कामे, वारकरी संप्रदाय प्रचार आणि प्रसिद्धीच्या अनुषंगाने करावयाची कामे यांचा आराखडा तयार करण्यात आलेला आहे.

### शासन आणि प्रशासन स्तरावर स्पष्टता नाही

सुमारे दोन वर्षापासून 'पंढरपूर कॉरिडॉर बाबत कोट्यावधींचे आकडे आणि केवळ चर्चोच रंगताना दिसत आहे. शासन स्तरावर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तर प्रशासकीय स्तरावर राज्याचे मुख्य सचिव, विभागीय आयुक्त किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडून या बाबत कोणतीही स्पष्ट माहिती दिली जात नाही. त्यामुळे शहरातील नागरिकांमध्ये संभ्रमावस्था आहे. जे बाधित होणार आहेत ते टेन्शन मध्ये असून हा कॉरिडॉर टाळला जावा यासाठी तर ज्यांना फायदा होणार आहे ते हा कॉरिडॉर लवकरात लवकर व्हावा म्हणून देव पाण्यात ठेवुन बसलेले आहेत.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# कासेगाव येथील यल्लम्मा देवीच्या यात्रेची सांगता



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २८ डिसेंबर -**

तालुक्यातील कासेगांव येथील श्री यल्लमादेवीच्या यात्रेची शनिवारी सांगता झाली.

कासेगाव येथे मार्गशीर्ष महिन्या मधील एकादशीला जोगती, देवीचे जग, भावीकभक्त गावाच्या वेशितून वाजत गाजत देवीच्या मंदिराकडे जातात. पहिल्या दिवशी रात्री बारा वाजता देवीची पुजा व आरती होते. दुसरा दिवशी नेवैद्य,नारळ, लिंब, गंध अश्या प्रकारे विधी चालतात. गावांतील मानकरी देशमुख व देशपांडे यांचा नेवैद्य वाजत गाजत जातो. दरम्यान संध्याकाळी देवीची गाणी, आरती, जागरण इत्यादी कार्यक्रम होतात. तिसरा दिवशी पूजा, आरती, होऊन मान-पान होतात. त्या त्याप्रमाणे शनिवारी सर्व मानपान विधी पार पडले. गावातील मानकरी दोन देशमुख व देशपांडे यांच्या वाड्यामध्ये जाते. गावाला पालखीची प्रदक्षिणा होते.मंदिराला पाच प्रदक्षिणा मारून पुजारी,भाविकभक्त, मानकरी अग्नी होमा कडे रवाना होतात. देवीची पालखी, पुजारी, देवीची जग भावीकभक्त अग्नीतून जातात व यात्रेची सांगता होते.

# संत नामदेव महाराज स्मारक, केशवराज मंदिराचा मार्ग मोकळा

## दोन्ही गटाची उपस्थिती; प्रदेशाध्यक्ष महेश ढवळे यांची समन्वयाची भूमिका यशस्वी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २८ डिसेंबर-**

अनेक वर्षापासून केशव राजा मंदिर दोन गटाचा वाद अखेर प्रदेशाध्यक्ष महेश ढवळे यांच्या मध्यस्थीने दोघांच्या एकमताने मिटला. संगोपनाची जबाबदारी दोन्ही गटाने उचलली. याचबरोबर शिंपी समाजाचा विकास व एकत्रीकरण करणे हा बैठकीत घेण्यात आला.



महाराष्ट्रात असलेली एकूण संख्या लक्षात घेता राजकीय क्षेत्रामध्ये शिंपी समाजाला स्थान मिळणे नामदेव पायरीचे दर्शन विठ्ठलाच्या दर्शनाला जाण्याच्यापूर्वी होणे, ६७५ वा समाधी सोहळा हा मोठ्या उत्साहात साजरी करून महाराष्ट्रात वेगवेगळे समाज उपयोगी सामाजिक उपक्रम राबवणे, संत शिरोमणी नामदेव महाराज आर्थिक विकास महामंडळ गठित करण्यासाठी वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा करणे, महाराष्ट्रात संत शिरोमणी नामदेव महाराजांची प्रलंबित असलेली बांधकामे यांना अर्थसहाय्य मिळवून देणे, अशी वेगवेगळ्या विषयावर चर्चा एकमताने पार पडून सर्वांची संमती दर्शवण्यात आली. वेगवेगळे उपक्रम राबवणे यावर चर्चा झाली.

अखिल भारतीय नामदेव क्षत्रिय महासंघ केशवराजा संस्थान व महाराष्ट्रातील प्रमुख शिंपी समाजाची, पदाधिकाऱ्यांची काल शुक्रवार रोजी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे संत नामदेव महाराज मंदिर येथे प्रदेश अध्यक्ष ॲड. महेश ढवळे, राष्ट्रीय अध्यक्ष नानासाहेब पाथरकर, केशवराय संस्थेचे सचिव धनंजय जवंजाळ, नासपचे अध्यक्ष संजय नेवासकर, यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. बैठकीत सर्वप्रथम श्री पांडुरंगाचे पूजन करण्यात आले. यानंतर संत नामदेव महाराजांचे १६ वे वंशज हभप मुकुंद महाराज व माधव महाराज यांचा सत्कार करण्यात आला. या बैठकीला ॲड. अजय तल्हार, पंढरपूर समाज अध्यक्ष गणेश उंडाळे, जिल्हाध्यक्ष राजेश धोकटे, प्रदेश पदाधिकारी महादेव खटावकर, मनोज भांडारकर, नंदकुमार कोसतवार, अनिल गचके, प्रभाकर नानोटे, संतोष मुळे, अशोक खैरनार, होमकर कोरमर, विलास पोरे, महेश गानबोटे, संजय चांडोले, भिकाजीराव गनबावले, जिल्हा महिला अध्यक्ष रेखाताई मुळतकर, बबीता माळवतकर, डॉ. प्रज्ञा तल्हार, अभा युवक अध्यक्ष रुपेश बागुल, प्रदेश युवक अध्यक्ष ॲड. सिद्धार्थ भांबुरे, प्रभू सोनवणे, अभा नामदेव छीपा महासभा राष्ट्रीय युवा संयोजक खेमराज नामा व ॲड. सागर मांढरे उपस्थित होते.

# मंद्रुपला दररोज कृषी सहाय्यक हजर राहणार : अवधूत मुळे

## तालुका कृषी अधिकाऱ्यांकडून कृषी सहाय्यकांना आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २८ डिसेंबर-**



मंद्रुप कृषी कार्यालयात कृषी सहायक नसल्याने शेतकरी शासकीय योजनांपासून वंचित राहत असल्याची बातमी दैनिक 'तरूण भारत'ने शनिवारी २७ डिसेंबरला प्रसिध्द करताच दक्षिण सोलापूर तालुका कृषी अधिकारी अवधूत मुळे यांनी या बातमीची दखल घेऊन मंद्रुप कृषी कार्यालयात दररोज एका कृषी सहाय्यकांची नेमणूक केल्याचे सांगितले.

तरुण भारत इफेक्ट

शासन शेतकऱ्यांसाठी अनेक योजना सुरू करीत असताना मंद्रुप कृषी कार्यालयात कृषी सहायक नसल्याने शेतकऱ्यांना कार्यालयासमोर ताटकळत बसावे लागत होते. शिवाय कृषी सहायकांच्या गैरहजेरीमुळे शेतकऱ्यांना योजनांचा लाभ मिळत नव्हते. म्हणून दैनिक 'तरूण भारत'ने शेतकऱ्यांची व्यथा प्रसिध्द करताच तालुका कृषी अधिकाऱ्यांनी शनिवारी मंद्रुप मंडल कार्यालयातील कृषी सहायकांना आदेश काढून सोमवार ते शुक्रवारपर्यंत कार्यालयात उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे शेतकऱ्यांमधून दैनिक 'तरूण भारत'सह तालुका कृषी अधिकारी अवधूत मुळे यांचे कौतुक करण्यात येत आहे.



# 'कर्मयोगी'च्या तीन लाख साखर पोत्यांचे पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २८ डिसेंबर-**

कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगाम २०२४-२५ मध्ये उत्पादित झालेल्या ३ लाख १ हजार १११ व्या साखर पोत्याचे पूजन कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांचे हस्ते पार पडले.

यावेळी कारखान्याचे व्हा.चेअरमन कैलास खुळे सर्व संचालक, कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी व अधिकारी उपस्थीत होते. यावेळी कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी कारखान्याचा चालु गळीत हंगाम सुरळीत सुरु असून हंगामात कारखान्याच्या इतिहासातील सर्वोच्च गाळप, सर्वोच्च साखर उत्पादन व सर्वोच्च आसवनी प्रकल्पाच्या उत्पादनाची नोंद झाली आहे असल्याचे सांगून हे ऊस उत्पादक सभासद शेतकरी, कार्यकारी संचालक, अधिकारी, कामगार व संचालक मंडळ इत्यादींनी घेतलेल्या परिश्रमामुळे शक्य झाले आहे असे सांगितले.

तर कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी यांनी या हंगामात कारखान्याचे गाळप अखंडीत सुरु असून कारखान्याकडे नोंदलेला संपुर्ण ऊस वेळेत गाळप केला जाईल. त्याचप्रमाणे गाळप झालेल्या ऊसाचे पेमेंट वेळेत अदा करणार असल्याचे सांगत चालु हंगामात कारखान्याचे ४२ दिवसात ३, २६, ८९६ मे.टन ऊसाचे गाळप होऊन ३,०१,१११ क्विं. पोती साखर उत्पादन केली आहेत. को-जनरेशन मधून २.०७ कोटी युनिट विज निर्मीती केली असून आसवनी प्रकल्पामधून ३६ लाख लि. उत्पादन घेतले आहे.

यावेळी कारखान्याचे संचालक दिनकरराव मोरे, उमेशराव परिचारक, दिलीपराव चव्हाण, ज्ञानदेव ढोबळे, तानाजी वाघमोडे, बाळासो यलमर, भगवान चौगुले, लक्ष्मण धनवडे, भास्कर कसगावडे, भैरू वाघमारे, गंगाराम विभुते, हणमंत कदम सुदाम मोरे, विजय जाधव, किसन सरवदे, शामराव साळुंखे, सीताराम शिंदे, राणू पाटील, तज्ञ संचालक दाजी पाटील, दिलीप गुरव, कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेच्या चरणी चांदीचा नक्षीदार तांब्या अर्पण



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२८ डिसेंबर -**

श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या चरणी शनिवारी (दि.२८ डिसेंबर) राहुल अशोक नागणे या दानशुर भाविकाने चांदीचा नक्षीदार तांब्या अर्पण केला आहे. त्याचे वजन ७६८ ग्रॅम असून, अंदाजे किंमत ५८ हजार होत असल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

संबंधित दानशुर भाविक हे श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे निस्सिम भक्त तसेच श्रीक्षेत्र पंढरपूर येथील रहिवाशी आहेत. याशिवाय, त्यांनी ५१ हजार इतकी देणगी देखील दिली आहे. त्याबद्दल त्यांचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी उपरणे व श्रींची प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब व विभाग प्रमुख ज्ञानेश्वर कुलकर्णी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### सांगोल्यातील उत्कर्ष विद्यालयात सेवा इंटरनॅशनल अनुभूती कॅम्पचे उद्घाटन

**सांगोला, दि. २८ डिसेंबर-**

सेवा इंटरनॅशनल संस्था, कुप्पम, आंध्रप्रदेश यांच्यावतीने महाराष्ट्रात प्रथमच उत्कर्ष विद्यालय, सांगोला येथे आयोजित सेवा इंटरनॅशनल अनुभूती कॅम्पचे उद्घाटन संस्था अध्यक्षा प्रा. निलिमा कुलकर्णी, उपाध्यक्षा डॉ. संजीवनी केळकर, सेवा इंटरनेशनल संस्थेचे प्रमुख सर्वानन व त्यांचे सहकारी, प्राचार्य सुनील कुलकर्णी, मुख्याध्यापिका संध्या शास्त्री, नितीन बडवे, अश्विनी कुलकर्णी, प्रा. राजेंद्र ठोंबरे यांच्या उपस्थित करण्यात आले. या शिबिरातून विद्यार्थ्यांना विज्ञाननिष्ठ बनविण्यात येणार असून त्यांच्यात मुलभूत विज्ञानाचा पाया निर्माण व्हावा व भावी शास्त्रज्ञ तयार व्हावेत अशी अपेक्षा डॉ. केळकर यांनी व्यक्त केली. या सुवर्ण संधीचा फायदा घेवून नोबेल पारितोषिक मिळवणाऱ्या शास्त्रज्ञाच्या यादीत उत्कर्ष विद्यालयाचे नाव यावे, अशी अपेक्षा प्रा.कुलकर्णी यांनी व्यक्त केली. सर्वानन यांनी मनोगतात या शिबिरातून विद्यार्थ्यांनी चौकस होऊन ज्ञानार्जन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, नियोजन, आभार प्रदर्शन विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पर्यवेक्षक प्रज्ञानंद मिसाळ, प्रा. निर्मला भोसले, प्रा. सुनयना मजगे व सहकारी यांनी परिश्रम घेतले.

### सांगोल्यात माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली

**सांगोला, दि.२८ डिसेंबर-**



सांगोल्यातील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्या वतीने भारताचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. आधुनिक भारताच्या उभारणीचे शिल्पकार असलेले डॉ. मनमोहन सिंग यांनी आयोजिलेल्या आर्थिक धोरणामुळे भारत देशात जगात एक आर्थिक महासत्ता म्हणून उभा राहत आहे. डॉ. मनमोहन सिंग यांनी देशासाठी दिलेले योगदान ही अतुलनीय आणि अविस्मरणीय असे आहे. डॉ.मनमोहन सिंग यांच्या रूपाने भारताने आज एक मुत्सद्दी अर्थतज्ञ गमावला आहे असे प्रतिपादन नीलकंठ शिंदे यांनी केले. डॉ.मनमोहन सिंग यांच्या प्रतिमेचे पूजन मकरंद पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. उपस्थित सर्व सदस्यांनी डॉ. मनमोहन सिंग यांना फुले वाहून श्रद्धांजली अर्पित केली.

# बार्शीतील खुल्या वक्तृत्व स्पर्धेत राजनंदिनी गाडेकर, गौरी भाकरे, अक्षता शिंदे यांचे यश



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २८ डिसेंबर-**

नेहरु युवा केंद्र सोलापूर व क्रांती बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने येथील शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयात सुशासन दिनानिमित्त आयोजित खुल्या वक्तृत्व स्पर्धेत राजनंदिनी गाडेकर हिने प्रथम, गौरी भाकरे हिने द्वितीय तर अक्षता शिंदे हिने तृतीय क्रमांक पटकावला. अश्विनी फोफले हिला उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

भारत सरकारद्वारा क्रीडा व युवक मंत्रालय अंतर्गत, नेहरु युवा केंद्र सोलापूर, क्रांती बहुद्देशीय संस्था, बेलगाव व शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंती (सुशासन दिवस) निमित्त खुल्या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज, स्व. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब जाधव म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपली ध्येयपूर्ती गाठण्यासाठी जिद्द आणि सातत्य ठेवण्याची व महापुरुषांचे विचार आत्मसात करण्याची गरज आहे.

अध्यक्षीय मनोगतात जयकुमार शितोळे यांनी अटलबिहारी वाजपेयी यांच्या जीवनावर प्रकाश टाकत वाजपेयींच्या काव्यपंक्तींनी वातावरण प्रफुल्लित केले. स्पर्धेतील प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे १००१, ७०१, ५०१ तर उत्तेजनार्थ ३०१ रु सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले. यावेळी शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक गुंड, मंडळ अधिकारी प्रशांत कोरके, क्रांती बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष धिरज शेळके आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेचे परीक्षण प्रा. शंकर शेटे व डॉ. चंद्रकांत उलभगत यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार प्रा. जयद्रथ गायकवाड यांनी केले.



# सुट्टीमुळे श्री जागृत मारूतीच्या दर्शनासाठी प्रचंड गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२८ डिसेंबर-**

जय बंजरंगबली, पवनपुत्र हनुमान की जय जयचा जयघोष करीत तालुक्यातील गौडगाव येथील श्रीक्षेत्र मारुतीच्या दर्शनासाठी शासकीय सुट्टया व मावळते वर्ष अखेरच्या निमित्ताने राज्य व परराज्यातील भाविक भक्तांनी तुफान गर्दी केल्याने मंदिर परिसर भाविकांनी फुलून गेले.

अक्कलकोट स्टेशन ते गौडगाव मारुती मंदिर पर्यंत पायी चालत जाणाऱ्यांची संख्या अधिक होती.जय जय बजरंग बली अशा घोषणा देत दक्षिणमुखीचे दर्शन घेतले. पहाटे पासूनच मारूतीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी केली होती. यावेळी महारूद्राभिषेक, नवग्रह पूजा, गजलक्ष्मी पूजा व होम हवन यज्ञ पार पडले. त्यानंतर मारूतीस अभिषेक व आरती करण्यात आले.मारुतीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना सर्व सोयी सुविधा देवस्थान कमिटीतर्फे करण्यात आले होते. प्रत्येक भाविक भक्तांना भक्तांना हनुमान चालीसा मंदिर समितीकडून देण्यात आले. दुपारची महाकाकड आरती प्रज्वल खताळ या भक्तांच्या हस्ते करण्यात आले.

राज्य व परराज्यातून आलेल्या हजारो भाविक भक्तांनी खीर हुग्गीचा महाप्रसादचाआस्वाद घेतला. माणिकराव पोतदार या भक्तानी महाप्रसाद दिला. यावेळी श्रीकांत खानापुरे, सिद्राम वाघमोडे, प्रकाश मेंथे, ज्ञानेश्वर फुलारी, आमशिदद कोरे, चौडप्पा सोलापुरे, परमेश्वर सुतार, प्रकाश सनकळ, श्रीमंत सवळतोट, बिरप्पा पुजारी, श्रीमंत म्हेत्रे, मल्लिनाथ मेत्रे, मल्लिनाथ पाटील, भारत ननवरे, श्रीमंत सवळतोट आदी उपस्थित होते.

# ग्राहक संरक्षण कायदा ग्राहकांचे कवच

## तहसीलदार सचिन लंगोटे : पंढरपुरात राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २८ डिसेंबर-**

ग्राहक संरक्षण कायदा हे ग्राहकाचे कवच असून ग्राहकांनी या कायदाचा लाभ घ्यावा असे प्रतिपादन पंढरपूरचे तहसीलदार सचिन लंगोटे यांनी राष्ट्रीय ग्राहक दिना निमित्त तहसील कार्यालय व ग्राहक पंचायत यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.



राज्यभर २६ डिसेंबर हा ग्राहक दिन म्हणून साजरा केला जातो ग्राहक दिनाचे अवचित साधुन सदर कार्यक्रम तहसील कार्यालय पंढरपूर या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता. पुढे बोलताना ते म्हणाले की, ग्राहक संरक्षण कायदा हा नागरिकांसाठी, ग्राहकांसाठी करण्यात आला आहे.या कायद्यामुळे व्यक्तीला आधार मिळाला असून यासाठी नागरिकांनी सजग राहिले पाहिजे असे ते म्हणाले.आज समाजामध्ये ग्राहक पंचायती सारखी संघटना काम करते आहे त्यांच्या माध्यमातून अनेक ग्राहकांचे प्रश्न मार्गी लागले आहेत असे ते अध्यक्षीय भाषणातून संवाद साधताना तहसीलदार सचिन लंगोटे यांनी सांगितले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तहसीलदार लंगोटे तर प्रमुख पाहुणे म्हणून नंदकुमार देशपांडे हे होते.प्रारंभी अखिल भारतीय ग्राहक पंचायत व सर्वांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन तहसीलदार लंगोटे यांच्या हस्ते हस्ते करण्यात आले. ग्राहक व नागरिक यांनी एखादी वस्तू खरेदी करताना पावतीचा आग्रह धरला पाहिजे कारण पावती शिवाय कुठलीही तक्रार चालत नाही ज्या ठिकाणी पैसे घेऊन व्यवहार केला जातो त्या सर्वांना ग्राहक संरक्षण कायद्यानुसार पावती देणे बंधनकारक आहे आणि पावती घेणे हा नागरिकांचा हक्क आहे.याकरता नागरिकांनी जागरूक राहून पावतीच्या आग्रह धरला पाहिजे असे अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे तालुका उपाध्यक्ष नंदकुमार देशपांडे यांनी सांगितले. प्रारंभी ग्राहक दिना बद्दल प्रास्ताविक आझाद अल्लापुरकर यांनी केले. या कार्यक्रमास ग्राहक पंचायत सदस्य सतीश निपाणकर, सागर कारंडे, विभुते,पुरवठा विभागाचे अधिकारी कुंभार,तसेच सचिन देठे, सागर शिंदे, सूरज सरवदे यांचेसह तहसील कार्यालयातील विविध खात्याचे कर्मचारी नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# प्लास्टिक विरोधी मोहिमेत १८३ दुकानांची तपासणी

- २८ दुकानदारांवरील कारवाईत १.४० लाखाचा दंड वसूल
- ३८ किलो प्लास्टिक केले जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

सोलापूर महापालिकेच्या पथकाकडून विविध बाजारपेठांमध्ये प्लास्टिक विरोधी कारवाईची मोहीम जोरदारपणे सुरूच आहे. आज शनिवारी दिवसभरात एकूण १८३ आस्थापनांची तपासणी करून त्यापैकी २८ दुकानदारांवर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून एक लाख ४० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. यामध्ये ३७.७ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.

सोलापूर महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली

सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या नियंत्रणाखाली नियोजनपूर्वक प्लास्टिक विरोधी कारवाई मोहीम राबविण्यात येत आहे. आज शनिवारी महापालिकेच्या पथकाने मोठ्या प्रमाणात प्लास्टिक विरोधी कारवाई केली. सोलापूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून शहरातील व्यापारी व नागरिक यांना वेळोवेळी जाहीर आवाहन व प्रसिद्धीकरण देऊनही शहरात मोठ्या प्रमाणावर बंदी घालण्यात आलेल्या प्लास्टिकची विक्री व वापर होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांच्या नियंत्रणाखाली आरोग्य निरीक्षकांच्या माध्यमातून ही मोहीम सुरु केली आहे.

आज शनिवारी १८३ दुकानांची तपासणी करण्यात आली. नवी पेठ, बाळी वेस, मुळेगाव रोड, अक्कलकोट रोड, ७० फूट रोड, नीलम नगर, कुमठा नाका, सैफुल मार्केट, आसरा, स्टेशन चौक ते मरीआई चौक, दत्त चौक ते पाथरूट चौक ते मस्तान हॉटेल आदी परिसरात ही मोहीम राबविण्यात आली. यामध्ये २८ दुकानदारांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. ३७.७ किलो प्लास्टिक जप्त केले आहे.

या मोहिमेत मुख्य आरोग्य निरीक्षक सूर्यकांत लोखंडे, बाबासाहेब इंगळे, केदारनाथ गोटे, विजयकुमार तमशेट्टी, मंजूकुमार बागेवाडी, सुधाकर नागटिळक, नागनाथ मेंडगुळे, अन्वर शेख, आरोग्य निरीक्षक रोहित गवळी, सचिन कदम, पंकज शिरसागर आदींसह आरोग्य निरीक्षक सहभागी झाले होते.

## रिक्षा उलटल्याने महिला जखमी

**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

करजगीहून केशरजवळगा येथील मठाकडे जाताना रिक्षा उलटून झालेल्या अपघातात महिला जखमी झाली. हा अपघात २७ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता घडला. अर्चना प्रविण जत्ती (वय ४० रा. करजगी ता. अक्कलकोट) असे जखमी महिलेचे नाव आहे. अर्चना जत्ती यांना भावजी अमाने यांनी खासगी दवाखान्यातून पुढील उपचारासाठी सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे.

## नाल्यात पडून व्यक्तीचा मृत्यू

**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

सोलापूर : हैद्राबाद रोडवर मुळेगाव शिवारातील सोन्या मारूती पेट्रोल पंम्पाच्या जवळील पुलाच्या नाल्यात पडून अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाला. हा प्रकार २७ डिसेंबर रोजी रात्री ८.४० वाजण्याच्या सुमारास उघडकीस आला. अनोळखी व्यक्तीला बेशुद्ध अवस्थेत तालुका पोलीस ठाण्याचे हवालदार एफ.एम. बागवान यांनी बाहेर काढून उपचारासाठी शासकीय रूग्णालयात दाखल केले. मात्र त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

## तरूणीने केले विष प्राशन

**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील हिप्परगा येथे राहत्या घरी तरूणीने अज्ञात कारणातून विषारी औषध प्राशन केले. हा प्रकार शनिवारी सकाळी ९ वाजता घडला. आरती शिवाजी चव्हाण (वय २२ रा. बक्षी हिप्परगा ता. दक्षिण सोलापूर) असे विषारी द्रव्य प्राशन केलेल्या तरूणीचे नाव आहे. तिला त्रास होऊ लागल्याने वडील शिवाजी चव्हाण यांनी सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे.





## बिबट्याचा वावर... भयभीत झाला शिवार...

बार्शी : ढेंबरेवाडी येथे शनिवारी सायंकाळी बिबट्या दिसला असून तो वन विभागाच्या कॅमेऱ्यात कैद झाला आहे. या भागात वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी व प्राणीमित्रांनी पाहणी केली. पण त्यांच्या दृष्टीपथात तो आला नव्हता. पण सायंकाळी तो दिसला आहे.

# मंद्रुपमध्ये चोरट्यांचा धुमाकूळ

- पोलीस ठाण्याच्या परिसरातच अनेक घरे फोडण्याचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २८ डिसेंबर-**

शुक्रवारी रात्री चोरट्यांनी मंद्रुपच्या मुख्य रस्त्यावरील दुकानांसह अनेक घरे फोडण्याचा प्रयत्न केला. बंद असलेली घरे फोडल्याने चोरट्यांना ऐवज हाती लागला नाही. मात्र चोरट्यांनी पोलीस ठाण्याच्या शेजारीच घरे फोडून पोलिसांना आवाहन दिला आहे. मंद्रुप पोलिसांनी स्थानिक तरुणांच्या व ग्राम सुरक्षा दलाच्या मदतीने गस्त वाढविण्याची मागणी होत आहे.

पंधरा दिवसांपासून मंद्रुप पोलीस ठाण्याच्या हद्दीत भंडारकवठे, निंबर्गी, औज,



कुरघोट, टाकळी, मंद्रुप या ठिकाणी चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. मंद्रुप पोलिसांनी गस्त वाढविला आहे. मात्र पोलिसांना चकवा देऊन चोरांनी दुसऱ्या गावात घरे फोडण्याचा प्रकार सुरू केला आहे. मंद्रुपमध्ये शुक्रवारी रात्री सहा ते सात तरुणांनी हातात शस्त्र घेऊन तीन ते चार घरे व दोन दुकान फोडण्याचा प्रयत्न केला . घरातील व्यक्तींना बाहेरुन दरवाजा बंद करून घरातील खोली फोडण्याचा प्रकार झाला. मात्र अनेक ठिकाणी सतर्क नागरिकांनी सावधगिरी दाखविल्याने चोरांनी धूम ठोकला. ज्वेलर्स दुकानाचे कुलूप फोडून दुकान लुटण्याचा प्रकार सुरू असताना नागरिकांच्या सतर्कतेमुळे चोर पळून गेले. त्यामुळे मंद्रुपमध्ये चोरांना रिकाम्या हाताने परतावे लागले. यापूर्वी दोन ते तीन वेळा मंद्रुपमध्ये बंद घरे फोडण्याचा प्रकार घडला आहे . पोलिसांनी दुचाकीवरून गस्त वाढविला असतानाही चोरी होण्याचे प्रमाण वाढत आहे. सध्या शेतीकामासाठी शेतकरी शेतीत राहण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे शेतीत राहणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाला आहे. चोरट्यांनी मंद्रुप पोलीस ठाण्याच्या अर्धा किलोमीटर अंतरावरून चोरी करण्याचा प्रयत्न करून पोलिसांना आवाहन दिला आहे. त्यामुळे पोलिसांनी गस्त वाढवून चोरांना जेरबंद करावे अशी मागणी होत आहे. शनिवारी पोलिसांनी श्वानपथक आणून चोरांचा सुगावा लावण्याचा प्रयत्न केला. मात्र श्वान परिसरातच घुटमळत राहिल्याने चोरांचा तपास लागला नाही.

### ग्रामसुरक्षा दलाद्वारे गस्त सुरू

मंद्रुपमधील चोरट्यांचा सीसी टीव्ही फुटेज मिळाले आहेत. श्वानपथकाद्वारेही माहिती घेतली आहे. पोलिसांचे तपास सुरू आहे. सध्या ऊसतोडणी सुरू असून पहाटे एक ते चार या वेळेत पोलीस पाटील व ग्रामसुरक्षा दल यांना प्रत्येक गावात गस्त घालण्यास सांगितले आहे. नागरिकांनी सतर्क राहून संशय असल्यास मंद्रुप पोलिसांना कळवावे.

**- राजकुमार डांगे, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे, मंद्रुप**

### तरुणांनी गस्त घालून सतर्क राहावे

सध्या मंद्रुप परिसरात चोरट्यांनी धुमाकूळ घालून भीतीचे वातावरण निर्माण केला आहे. नागरिकांनी सतर्क राहावे. गावातील ग्रामसुरक्षा दल व तरुणांनी गावांच्या सुरक्षेसाठी सतर्क राहून गस्त घालावे. शिवाय रात्री गावात व शेतातील घर बंद करावे. संशय असल्यास मंद्रुप पोलिसांना त्वरितच कळवावे.

**- अनमोल केवटे, अध्यक्ष, युवा क्रांती सामाजिक संघटना, मंद्रुप**

## कुत्र्याला दुचाकी धडकल्याने जखमी

**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

ढोराळेहून वैरागकडे मोटारसायकलवर येत असताना, १ कि.मी. अंतरावर अचानक कुत्रा आडवा आल्याने धडकून झालेल्या अपघातात एकजण जखमी झाला. हा अपघात ११ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता घडला .. दादासाहेब तात्याबा जाधव (रा. ढोराळे ता. बार्शी) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. दादासाहेब यांच्यावर बार्शी येथील खासगी दवाखान्यात उपचार करून पुढील उपचारासाठी मुलगा संभाजी जाधव यांनी रूग्णालयात दाखल केले आहे.

## मोटारसायकल घसरून दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

औरादहून निंबर्गीकडे जाताना, दिड किलो मीटर अंतरावर औरादच्या कॉर्नरला मोटारसायकल घसरून झालेल्या अपघातात एकजण जखमी झाला. हा अपघात २७ डिसेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता घडला. लोकप्पा मल्लिनाथ आयवळे (वय ४० रा. निंबर्गी) असे जखमीचे नाव आहे. लोकप्पा यांना मंद्रुप येथील सरकारी दवाखान्यातून पुढील उपचारासाठी अंकित कोळूते यांनी सोलापूर येथील रूग्णालयात दाखल केले आहे.

# अ. भा. स्वकुळ साळी मराठी साहित्य संमेलनात समस्त साळीयांची भरली जत्रा

- ग्रंथ दिंडीने शुभारंभ, अनेक ग्रंथ प्रकाशन आणि संमेलनाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २८ डिसेंबर-**

स्वकुळ साळी समाजाचे तिसरे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त सोलापुरात समस्त मराठी साळीयांची साहित्य जत्रा भरली. शनिवारी २८ डिसेंबर रोजी दुपारी ग्रंथदिंडीने संमेलनाचा शुभारंभ झाला. आणि सायंकाळी स्वकुळ ध्वजारोहण व अनेक ग्रंथ प्रकाशनाने मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन सोहळा पार पडला. कष्टकरी विणकर स्वकुळ साळी समाज देशभरात असून यंदा तिसरे मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन नाशिक येथील उद्योजक सी.पी. साळी व सारिका साळी आणि संमेलनाध्यक्षा डॉ. संगीता बर्वे (पुणे) यांच्या हस्ते झाले.

श्री जिव्हेश्वर प्रतिष्ठान पुणे आणि श्री जिव्हेश्वर विद्यार्थी विकास मंच सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने अ.भा. स्वकुळ साळी मराठी साहित्य संमेलनातील पहिल्या सत्रात सकाळी गंथ दिंडी काढण्यात आली. सोलापूर शहर मध्यचे युवा आमदार देवेंद्र कोठे आणि सी.पी.साळी व डॉ. चंद्रशेखर बारगजे, कृष्णा सुरे, डॉ. चंद्रशेखर टोणपे यांच्या हस्ते ग्रंथ दिंडीचा दिशा इन्फोटेक येथे शुभारंभ झाला. यावेळी निघालेल्या साहित्य दिंडी पालखीत भगवान



जिव्हेश्वरांची प्रतिमा, जिव्हेश्वर ग्रंथ पुराण, ज्ञानेश्वरी व तुकोबांची गाथा यांचा समावेश होता. तसेच साहित्यिक, संत, महंत,महापुरुष आणि विठोबा रखुमाई यांच्या वेषात विद्यार्थिनी व विद्यार्थी ग्रंथ दिंडी मिरवणुकीत लक्ष वेधून घेत होते. तसेच महिलांच्या टाळ पथकाने ठेका धरला. भगवान जिव्हेश्वरांची भव्य प्रतिमा, घोषवाक्य फलकही मिरवणुकीत होते. वालचंद कॉलेज, साईबाबा चौक, सत्तर फूट मंडई, जुना कुंभारी नाका मार्गे ग्रंथ दिंडीचे समापन साहित्य नगरीत झाले. ग्रंथ दिंडी व साहित्य संमेलनात स्वागताध्यक्ष शरदकुमार एकबोटे, अध्यक्ष कृष्णा सुरे, डॉ.चंद्रशेखर बारगजे, डॉ.चंद्रशेखर टोणपे, उद्योजक संजय गणेश, विजय वक्ते, निशा वक्ते, अंबर सरवदे, ज्ञानेश्वर एडके, सदाशिव चिंचकर, अंबर ढगे, नंदकुमार सपार, शांताबाई गायकवाड. निवृत्ती गायकवाड, लक्ष्मण सरवदे, जयहरी साखरे, गोविंदराज एकबोटे, शांताबाई केंदोळे, महादेव सरवदे, आनंद कोंगे, सचिन चिल्लाळ, प्रदीप पवार, राजू सरवदे, पांडुरंग साखरे, सुभाष गायकवाड, दत्तात्रय गायकवाड, ज्ञानेश्वर सपकाळ, अनुराधा काजळे, उमेश गायकवाड, नेमिनाथ हेमाडे, सुधा हेमाडे, रघुराज उपरे, विजयकुमार पिसे व अनेक मान्यवर उपस्थित होते. तत्पूर्वी ज्ञातीचे विठ्ठल मंदिर आणि मारुती मंदिर येथे सकाळी ग्रंथ पूजन सोहळा पार पडला.

स्व. वसंतराव एकबोटे साहित्य नगरीत आणि चित्रकार स्व.चंद्रकांत पोरे व्यासपीठावर प्रारंभी भगवान जिव्हेश्वर प्रतिमा पूजन आणि स्वकुळ ध्वजारोहण संमेलन अध्यक्ष डॉ. संगीता बर्वे आणि अन्य उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन झाले. संमेलनानिमित्त काढण्यात आलेली अक्षर वस्त्र स्मरणिका आणि अन्य प्रमुख पाच ग्रंथांचे प्रकाशन मान्यवर यांच्या हस्ते झाले. तसेच समाजातील कर्तृत्ववान बांधव, भगिनी यांचाही याप्रसंगी सन्मान करण्यात आला. स्वागताध्यक्ष एकबोटे यांनी साळीयांच्या मूळ मराठी भाषेचे स्मरण करून हे साहित्य संमेलन अभूतपूर्व आहे. समाजातील कर्तृत्ववान मंडळींचे कार्य अभिमानास्पद असून साहित्य आणि संस्कृतीचे यानिमित्ताने पुन:स्मरण झाले असे ते म्हणाले.

संमेलन अध्यक्षा डॉ. संगीता बर्वे यांनी साहित्य संमेलन भरवणे काळाची गरज आहे. चांगले विचार साहित्य घडण्याचे हे ठिकाण असून येथे वैचारिक घुसळण होते. कला, साहित्य, संस्कृतीचा संगम संमेलनानिमित्त होतो, असे डॉ.बर्वे यानी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नरेंद्र गायकवाड, लक्ष्मी टोणपे यांनी केले, आभार प्रा. चंद्रशेखर टोणपे यांनी मानले. संमेलनानिमित्त कवी कट्टा, सांस्कृतिक कार्यक्रम, योग साधना, जिव्हेश्वर कथासार, परिसंवाद, कथाकथन आणि चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी २९ रोजी सायंकाळी साहित्य संमेलनाचा समारोप होणार आहे.

# तुरीच्या दरामध्ये प्रती क्विंटल तीन हजार रुपयांची घसरण

- व्यापाऱ्यांकडून सर्रासपणे शेतकऱ्यांची लूट सुरु



**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २७ डिसेंबर-**

मंद्रुप परिसरात शेतकऱ्यांनी तूर काढणी व मळणी करून रास केल्यानंतर व्यापाऱ्यांनी तुरीचे दर कमी केला आहे. व्यापाऱ्यांनी प्रती क्विंटल तीन हजार रूपयांपर्यंत दर कमी केल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. आर्थिक अडचण सोडविण्यासाठी शेतकरी तूर विक्री करीत असल्याने व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची लूट सुरू असल्याचे दिसून येते.

डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात तुरीचे दर प्रती क्विंटल दहा हजार रूपये होते. या काळात बाजारात तुरीचे आवक कमी असताना व्यापाऱ्यांनी दर वाढविले होते. मात्र डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यापासून शेतकऱ्यांनी तूर काढणीस सुरूवात केल्यानंतर व बाजारात तुरीचे आवक वाढल्याने व्यापाऱ्यांनी तुरीचे दर प्रती क्विंटल तीन हजार रूपये कमी केला आहे. महिला व पुरूष मजुरांचे मजुरी मोठ्या प्रमाणात वाढल्याने व इतर कौटुंबिक अडचण सोडविण्यासाठी शेतकरी तूर विक्री करीत आहेत. शेतकऱ्यांची अडचण व गरज पाहून व्यापारी अधिक फायदा मिळविण्यासाठी तुरीचे दर कमी करून तूर खरेदी करीत आहेत. मंद्रुप परिसरात तुरीचे दर घसरल्याने तूर उत्पादक शेतकरी दुधनी, कर्नाटकातील चडचण व हलसंगी या ठिकाणी तूर विक्री करण्यास प्राधान्य देत आहेत. मंद्रुप परिसरात शासनमान्य तूर खरेदी केंद्र सुरू केल्यास शेतकऱ्यांना फायदा होणार असल्याने खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी होत आहे.

### शेतकऱ्यांच्या अडचणीचा व्यापाऱ्यांना फायदा

डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात तुरीला प्रती क्विंटल दहा हजार रूपये दर होता. तूर रास करून बाजारात विक्रीस आणल्यानंतर व्यापाऱ्यांनी प्रती क्विंटल सात हजार रूपये करून तीन हजार रूपये दर कमी केले. त्यामुळे व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची अडचण पाहून आर्थिक लूट सुरू आहे.

**- बाळासाहेब कोरे, शेतकरी, मंद्रुप**







हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## शेळगीत ७ मार्चला सर्वधर्मीय मोफत सामुदायिक विवाह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ डिसेंबर-**

शेळगी-दहिटणे येथील केदारनाथ उंबरजे मित्रपरिवार व वात्सल्य प्रतिष्ठानच्या वतीने शुक्रवार ७ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ६.२७ वाजता गोरज मुहूर्तावर शेळगी येथे सर्वधर्मीय मोफत सामुदायिक विवाह सोहळा आयोजित केला आहे, अशी माहिती सिद्धय्या स्वामी-हिरेमठ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गेल्या नऊ वर्षापासून मोफत सामुदायिक विवाह सोहळा आयोजित



करण्यात येतो. आजतागायत १७० हून अधिक जोडप्यांचे विवाह करण्यात आले आहेत. यामध्ये वधू-वरांसाठी कपडे, वधूसाठी मणी मंगळसूत्र, संस्कार उपयोगी साहित्य मोफत दिले जाणार आहे. विवाह सोहळ्यासाठी विविध समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. या सोहळ्यासाठी इच्छुक वधू-वरांनी शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत नाव नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी महालिंगप्पा परमशेट्टी ९४२३५८८७०५, गजानन व्होनराव ९८२२२५४६३२ यांच्याशी संपर्क साधावा. या पत्रकार परिषदेस महालिंगप्पा परमशेटी, रेवणसिद्ध आवजे, मुन्ना बिराजदार, प्रकाश यारगले, मोहसीन इनामदार आदी उपस्थित होते.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### कमानीला श्री. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्याची मागणी

**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

सोलापूर-तुळजापूर मार्गावर एकरुख येथील श्री गणपती घाटाजवळील बांधण्यात आलेल्या कमानीस 'श्री छत्रपती शिवाजी महाराज' असे नामकरण करा, अशी मागणी छत्रपती भोसले राजे प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आली आहे. प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण भोसले यांनी ही मागणी केली आहे.

### शैलेश रेगे यांचे आज फडकुले सभागृहात व्याख्यान

**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार असा संदेश देणारे विश्वसंत कर्मयोगी थोर समाजसुधारक व जीवनविद्येचे प्रणेते सद्गुरु वामनराव पै यांचे सतशिष्य शैलेश सुहास रेगे, डोंबिवली, मुंबई यांचे 'मन: सर्व सिद्धीचे कारण' या विषयावर निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे आज रविवार, दि. २९ डिसेंबर रोजी सायं. ६ ते ८ या वेळेत होणार आहे.

### हुतात्मा स्मृती मंदिरात उद्या तीन उर्दू नाटकांचे सादरीकरण

**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

बज्मे गालीब सोलापूर यांच्या वतीने अंताशालेय उर्दू नाटय स्पर्धा होणार आहे यात एम. ए. पानगल उर्दू शाळा डॉ. हारून बागबान लिखित व महेमुद खतीब दिग्दर्शित तीन सवाल तर शमा उर्दू प्राथमिक शाळा स्व. नसीम मन्नान सोलापूरी लिखित शाहीन सदफ व अबरार नल्लामंदू दिग्दर्शीत मनहूस कदम आणि बिडी घरकुल सोशल शाळा बाबू आरके लिखित इरफान लालकोट दिग्दर्शित बडी बी सुब्हान अल्लाह सादर करणार आहेत. दुपारी २ ते ५ पर्यंत हे नाटके हुतात्मा स्मृती मंदिर येथे सादर होणार आहेत व सायं. सात वाजता बज्मे गालीबचे अध्यक्ष प्रा. बशीर परवाज यांच्या अध्यक्षतेखाली व उर्दू अदबी साहित्य मंडळाचे अध्यक्ष व माजी महापौर ॲड. यु.एन.बेरीया यांच्या हस्ते पारितोषिक वितरण होणार आहे. यात प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ रंगकर्मी प्रा.बी. एच.करजगीकर, राजा बागबान, सय्यद इकबाल, आसीफ इक्बाल उपस्थित राहतील. नाटय स्पर्धेत सर्व नाटयप्रेमीनी वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन नाट्य मंडळ संयोजक शफी कॅन्टन व अन्वर कमिशनर यांनी केले आहे.

### ए. आर. बुर्ला महाविद्यालयात उद्या संगणक विभागाचे उद्घाटन

**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयात संगणक विभागाचा उद्घाटन समारंभ ३० डिसेंबर रोजी आयोजित केला आहे. याप इंडिया ॲटोमोटिव्हसिस्टिम प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक छेन हुवाजू यांच्या हस्ते संगणक विभागाचे उद्घाटन होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम हे आहेत. संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्री. मल्लिकार्जून सरगम, खजिनदार श्री गोवर्धन कमटम, विश्वस्त श्री. श्रीधर चिट्याल विश्वस्त श्री. विजयकुमार गुल्लापल्ली, याप इंडियाॲटोमोटिव्ह सिस्टिम प्रायव्हेट लिमिटेडचे उपाध्यक्ष व समन्वयक मोनिका गेहलोत यांच्या प्रमुख उपस्थित हा कार्यक्रम होणार आहे. महाविद्यालयात बी. ए. बी. कॉम. बी. सी. ए. व एम.कॉम. चे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींना या संगणक विभागाचा उपयोग होणार आहे.

### भाडेकरूच्या फसवणूकप्रकरणी घरमालक महिलेवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

घराला भाडे नाही पैशाला व्याज नाही या पध्दतीने दिलेल्या भाडेकरूची ३ लाख ५० हजार रुपयांची फसवणुक करणाऱ्या घरमालक महिलेविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रतिश राजू शिंदे (वय ३०, रा. अलंकापुरी नगर, लक्ष्मी पेठ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन सुकेशनी नागनाथ लोंढे (रा. गंगा नगर, देगाव रोड) या महिलेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रतिश शिंदे यांनी लोंढे यांच्या टू बीएच के खोलीला घराला भाडे नाही पैशाला व्याज नाही या पध्दतीने लोंढे यांना ५ लाख रुपये भाड्याने देण्याचा करार केला होता. त्यापैकी ३ लाख ५० हजार रुपये घेऊन खोलीचा ताबा पाहिजे असेल तर आणखीन ३ लाख रुपये द्या नाही तर दिलेले पैसे विसरा असे म्हणून सुकेशनी लोंढे या महिलेने शिंदे यांना धमकी देऊन फसवणुक केली. म्हणून फौजदार चावडी ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# हस्तकौशल्याच्या माध्यमातून सिध्देश्वर मंदिरास येतीय स्वर्ण झळाळी

● सुवर्ण सिद्धेश्वरचे ७५ टक्के काम पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ डिसेंबर-**

एकीकडे गड्डा यात्रेची शहरात लगबग दिसत आहे. तर दुसरीकडे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धेश्वर महाराजांच्या मंदिरास सुवर्णसिद्धेश्वर मंदिरात रूपांतरित करण्यासाठी कारागिरांची मेहनत रंगात येत आहे. आतापर्यंत सुवर्ण सिद्धेश्वर मंदिराचे ७५ टक्के काम पूर्ण झाले आहे. तर उर्वरित २५ टक्के काम लवकरच पूर्ण होईल, असा विश्वास कारागीर प्रमुख सुरेश भारद्वाज (मिस्त्री) यांनी व्यक्त केला आहे.

ही संकल्पना सातत्यात उतरवण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून कारागीर रात्रंदिवस राबत आहेत. आपल्या हस्त कौशल्याच्या जोरावर सागमनाच्या लाकडावर अनेक नक्षीदार कलाकृती मूर्ती तसेच मंदिराचे हुबेहूब चित्र साकारले. त्यानंतर त्यावर चांदीचा मुलामा लावण्यात आला. त्या मुलामास सौंदर्यपूर्ण अशा नक्षीमध्ये पालटण्यात आले. अखेर श्रींच्या सभामंडपामध्ये तू लावण्यात आला आहे. त्यानंतर उर्वरित सभामंडपातील खांब आणि श्री शंभू महादेवाचे दक्षिणात्य रूप लवकरच साकारले जाणार आहे.

दरम्यान दक्षिण भारतातील विविध मंदिरांमध्ये असणाऱ्या देवी-देवतांच्या मूर्ती प्रमाणेच सिद्धेश्वर मंदिरात देखील शिव शंकराची मूर्ती लाकडामध्ये कोरली गेली आहे. त्यावर लवकरच चांदीचा आणि सोन्याचा मुलामा चढवण्यात येणार आहे. त्यानंतर तयार झालेली प्रतिकृती मंदिरामध्ये लावण्यात येणार आहे. या कामासाठी गेल्या अनेक दिवसांपासून बारा कामगार कार्यरत आहेत. सध्या मंदिरांमधील कमान, खांब, आणि विशेषत्वाने भगवान शंकराची मूर्ती साकारण्याचे काम सुरू आहे.





**आत्तापर्यंत एक हजार किलो चांदीचा तर दोन किलो सोन्याचा वापर**

सुवर्ण सिद्धेश्वर ही संकल्पना पूर्ण करण्यासाठी आतापर्यंत १ हजार किलो चांदी व दोन ते तीन किलो सोन्याचा वापर झाला आहे. आणखीन २५ टक्के काम अपूर्ण आहे. उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी चारशे किलो चांदी व एक किलो सोने आणखीन लागणार आहे. या क्षेत्रामध्ये आमची चौथी पिढी कार्यरत आहे. आतापर्यंत अक्कलकोट, तुळजापूर, कारवाड, धारवाड, हुबळी, विजापूर, हैदरा अशा विविध धार्मिक ठिकाणी हे धार्मिक काम केले आहे.

**- सुरेश (मिस्त्री) भारद्वाज, कारागीर प्रमुख**

**सागवानाच्या लाकडावर नक्षीकाम करून त्यावर सोने, चांदीचा मुलामा**

सागवान लाकडावर सर्वप्रथम हाताने नक्षी काढली जाते. हुबेहूब पद्धतीने नक्षी काढून झाल्यानंतर त्याला फिनिशिंग केली जाते. त्यावर सोन्याचा आणि चांदीचा पत्रा लावला जातो. पत्रा लाकडावाला चिटकून त्यावर ठोकले जाते. पॉलिश करून सभामंडपात लावण्यात आले आहे. सध्या भगवान शंकराची मूर्ती बनवत आहे. मूर्ती बनवण्यासाठी सहा दिवस लागले. तसेच दुसऱ्या एका लाकडावर नक्षीकाम करून त्यावर ही मूर्ती चिटकवली आहे. त्यावर देखील चांदीचा व सोन्याचा मुलामा लावण्यात येईल. नंतर श्रींच्या सभामंडपात मूर्ती उभारण्यात येईल. या सर्व नक्षी हस्तकौशल्याच्या माध्यमातून बनवण्यात आले आहेत यासाठी कोणताही मशीनचा वापर केला गेला नाही.

**- संतोष भारती, कारागीर उत्तर प्रदेश**

लाकडामध्ये आकर्षक नक्षीकाम केल्यानंतर त्यावर चांदीचा पत्रा लावून चांदी नक्षीवर बसवली जाते. त्यास पुन्हा पॉलिश केले जाते. अशा पद्धतीने स्वतंत्र नक्षी बनवून शेवटी त्या सभामंडपात त्याएकत्रित मंदिरात चिटकवल्या जात आहेत. सुवर्ण सिद्धेश्वर मंदिर ही संकल्पना उभारण्यासाठी उत्तर प्रदेश राजस्थान येथील कारागीर रात्रंदिवस कार्यरत आहेत.

लवकरच ही संकल्पना पूर्णपणे सातत्यात उतरणार आहे. त्यातील पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. तर दुसरा टप्प्यातील उर्वरित २५ टक्के काम हे दुसऱ्या टप्प्यात लवकरच पूर्ण होईल असा आशावाद कारागिरांनी व्यक्त केला आहे.



## जि.प. शाळांना वेळ अमावस्येनिमित्त सुट्टी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ डिसेंबर-**

ग्रामीण भागात वेळा अमवस्येला सर्वाधिक महत्त्व आहे. या दिवशी शेती जमिनीची पूजा केली जाते. त्यामुळे याचे महत्त्व लक्षात घेऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळेला सुट्टी असणार आहे. वेळा अमवस्या सणानिमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळांसह, सर्व माध्यमांच्या खासगी प्राथमिक शाळांना सुटी द्यावी, अशी मागणी विविध शिक्षक संघटनांसह, पालकांकडून दरवर्षी करण्यात येत होती. सदरच्या मागणीची दखल घेत, जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये सोमवारी शाळांना सुटी जाहीर केली आहे. शैक्षणिक सुटीमध्ये काही बदल झाल्याने यंदाच्या वर्षी उन्हाळ्याची सुटी ४ मे २०२५ पासून सुरू होईल, असेही शिक्षणाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

**प्राथमिक शिक्षण अधिकाऱ्यांनी दिले आदेश**

दरम्यान, जिल्हा परिषदेमधील विविध विभागांना देखील सोमवारी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे सोमवारी सुद्धा कोणतेही शासकीय काम सुरू असणार नाही, असेही कळवण्यात आले आहे.



## उत्सव दानाचा, सामाजिक ऋण फेडण्याचा

● साकव फाउंडेशनचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

उत्सव दानाचा, सामाजिक ऋण फेडण्याचा, या साकव फाउंडेशनच्या सामाजिक उपक्रमास सुरुवत झाली. माणसाशी जोडून दोन हातांमधील अंतर कमी करून समाजाच्या ऋणातून उतराई होऊया....

याचसाठी साकव फाउंडेशन विविध विषयांवर अतिशय चांगलं काम करीत आहे. याचे उदघाटन पद्मश्री राहीबाई पोपरे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी चंद्रीकाताई चव्हाण, डॉ श्री व सौ. प्रशांत दोंड, माऊली झांबरे आदी उपस्थित होते. यात छत्रपती संभाजी नगर, बीड, कुर्डूवाडी व येथील संस्था सहभागी झाले आहेत. शनिवारी व रविवारी (दि. २९) येथील डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात ९ ते रात्री ९ पर्यंत हा उपक्रम सुरू आहे.



(छाया : केवल तिवारी)

## गुलाब पुष्प प्रदर्शन...

**सोलापूर : वालचंद महाविद्यालयाच्या रस्त्यावर लोटस मल्टिपर्पज हॉलमध्ये द रोझ क्लब ऑफ सोलापूरच्या वतीने गुलाब पुष्प प्रदर्शन आयोजित केले होते. या प्रदर्शनात विविध गुलांबाच्या प्रकाराचा युवतींचा आपल्या मोबाईलवर टिपतानाचा शनिवारी सकाळी टिपलेला क्षण.**

## 'हरिभाई देवकरण'च्या सुवर्ण महोत्सवानिमित्त विविध स्पर्धा

▸ विज्ञान, रांगोळी १ जानेवारी पासून : समूहगीत ५; समूह नृत्य ११ जानेवारीला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ डिसेंबर-**

हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्राचार्या दिपा फाटक यांनी पत्रकार परिषदेत दिली. सोलापुरातील हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष असून या निमित्ताने विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे.हरिभाई प्रशालेशी संलग्न असलेले कनिष्ठ महाविद्यालय १९७५ पासून सुरू झाले आहे.

इथे अकरावी व बारावी वर्ग चालतात. याचबरोबर विविध तांत्रिक विषयाचे कोर्सही चालवले




जातात. यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, वाद - विवाद स्पर्धा घेण्यात आल्या आहेत. दि. १ व २ जानेवारी २०२५ रोजी जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन आणि रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

दि. ५ जानेवारी रोजी जिल्हास्तरीय समूहगीत स्पर्धा तर दि. ११ जानेवारी रोजी समूह नृत्य स्पर्धा होणार आहे. शहर जिल्ह्यातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे संघ या स्पर्धेसाठी पाठवावेत, असे आवाहन सुवर्ण महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेस पर्यवेक्षक शांतप्पा कुंभार, भानुदास बनसोडे, आप्पासाहेब राऊत, दिलीप फुटाणे, हनुमंत मोतीबने आदी उपस्थित होते.

# जनतेने मतांच्या रूपाने दिलेल्या दानाची उतराई करणार : आ. सुभाष देशमुख

● विजयानंतर तालुक्यातील विविध गावांना भेटी
● ग्रामस्थांशी साधला संवाद; मतदारांचे मानले आभार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ डिसेंबर -**

विधानसभा निवडणुकीत जनतेने भरघोस मतांनी निवडून देता आपल्यावरची जबाबदारी आणखी वाढवली आहे. जनतेने मतांच्या रूपाने दिलेल्या दानाचे उतराई नक्की करणार आहे. दक्षिण सोलापूर मतदारसंघाला राज्यातील टॉप मतदारासंघ बनवणार असल्याचे प्रतिपादन आ. सुभाष देशमुख यांनी केले.

विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर मतदार संघातील ग्रामस्थांशी जनसंवाद आणि आभार मानण्यासाठी तसेच माजी पंतप्रधाल अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त माळकवठे (ता. द. सोलापूर) येथे कार्यक्रम आयोजित कार्यक्रमात आ. देशमुख बोलत होते. आ. देशमुख यांनी दोन गेल्या दिवसात माळकवठेसह कारकल, बेलाटी, डोणगाव,तेलगाव, तिऱ्हेसह विविध गावांना भेट देत ग्रामस्थांशी संवाद साधला व निवडून दिल्याबद्दल जनतेचे आभार मानले.

देशमुख म्हणाले, अटलजींची जी स्वप्न आहेत ती पूर्ण करण्याचे काम नरेंद्र मोदी करत आहेत. भाजपा हा समाजातील शेवटच्या घटकासाठी काम करणारा पक्ष आहे. केंद्राच्या आणि राज्याच्या योजना जननेपर्यंत पोहचवण्याचे काम कार्यकर्त्यांनी करावे. या संपूर्ण दौऱ्यात



तालुकाध्यक्ष संगप्पा केरके, हणमंत कुलकर्णी, रामप्पा चिवडशेट्टी,चनगोंडा हविनाळे, जगन्नाथ गायकवाड, अप्पासाहेब मोटे, अंबिका पाटील, दीपाली व्हनमाने, अतुल गायकवाड, भीमाशंकर बबलेश्वर, गौरीशंकर मेंडगुदले, प्रसाद कुलकर्णी, सरपंच अमोगसिद्ध देशमुख, महादेव बिराजदार, नामदेव पवार, गुरप्पा हिंडी, सिद्धप्पा हंजगी, महिला तालुकाध्यक्ष वृषाली पवार, प्रभू राठोड, निर्मला कुंभार, माणिक नरोटे, सरपंच बाबा आमले, संजय भोसले, भास्कर मस्के, सुनिल टोणपे, आण्णा पाटील यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## कापड दुकानदाराच्या घरी साडेआठ लाखांची घरफोडी

**सोलापूर, दि. २८ डिसेंबर -**

अकलूज येथील स्वरूप नगरात राहणाऱ्या कापड दुकानदाराच्या घरी साडेआठ लाखांची घरफोडी झाली आहे.

याबाबत गौरव गजेंद्र पोळ (वय २६, रा. स्वरूप नगर, यशवंत नगर, ता. माळशिरस) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अकलूज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २५ डिसेंबरच्या पहाटे गौरव पोळ हे घराला कुलूप लावून परगावी गेले होते. रात्री साडेदहाच्या सुमारास पोळ हे घरी परत आले. त्यावेळी त्यांना घरामध्ये चोरी झाल्याचे दिसून आले. चोरट्याने पोळ यांच्या घराच्या गॅलरीमधील लोखंडी दरवाजाचे लॉक तोडून घरात प्रवेश केला. घरातील कपाटाचे ड्रॉव्हरमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा ८ लाख ५७ हजार रुपयांचा ऐवज चोरून



नेला. यामध्ये ३ तोळे वजनाच्या सोन्याच्या बांगड्या, ४ तोळे वजनाचा राणी हार, २ तोळे वजनाच्या तीन अंगठ्या, १ तोळ्याची सोन्याची चैन, ३ ग्रॅमचे सोन्याचे पेंडल, रोख १ लाख ६५ हजार रुपयांचा समावेश आहे. याबाबत अकलूज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक खारगे पुढील तपास करीत आहेत.

## अज्ञात कारणाने एकाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि. २८ डिसेंबर -**

तीस वर्षीय तरुणाने अज्ञात कारणावरून घरातील अँगलला नायलॉन दोरीच्या सहाय्याने गळफास घेवून आत्महत्या केली आहे. ही घटना २७ डिसेंबर रोजी रात्री साडे नऊच्या सुमारास सेटलमेंट फ्री कॉलनी नंबर २ मध्ये घडल्याचे उघड झाले आहे.

कुंदनसिंग प्रतापसिंग रजपूत (वय ३० रा.सेटलमेंट फ्री कॉलनी नं २ ) असे गळफास घेवून आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. कुंदनसिंग याने २७ डिसेंबर रोजी घरात होता. अज्ञात कारणावरून रात्री साडे आठच्या सुमारास नायलॉन दोरीच्या सहाय्याने घराच्या अँगलला गळफास घेतला. ही गोष्ट नातेवाईकांना कळाली. घटनेची माहिती तात्काळ सलगर वस्ती पोलिसांत देण्यात आली. पोलिस हवालदार एस.के गायकवाड हे घटनास्थळी पोहचले,त्यांनी कुंदनसिंग यांस गळ फासावरून नातेवाईकांच्या मदतीने खाली उतरवला.बेशुध्द अवस्थेत सिव्हिल रुग्णालयात दाखल केले असता,तो उपचारापूर्वीच मयत झाला असल्याचे सिव्हिलचे डॉ. आकाश माने यांनी घोषित केले,या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९८८

**एथ एकचि हे धनुष्यपाणी । परी जाहले गा चहूं वर्णी ।**
**ऐसी गुणकर्मी-कडसणी । केली सहजे ।।**

आज भारतीय समाजापुढे ज्या अनेक समस्या आहेत. त्या समस्यांपैकी जात ही एक मोठी समस्या आहे. काही कारण नसतांना माणूस केवळ स्वार्थासाठी माणसांची विभागणी वेगवेगळया जातीत करतो. धर्मासारख्या पवित्र शब्दाची विभागणी सुध्दा जात निहाय केली जाते. प्रत्येक प्राणी जसा वेगवेगळया जातीचा, तसा मनुष्य सुध्दा एका वेगळया मानव जातीचा म्हणून मानला जात नाही. मनुष्यांसाठी मानव ही केवळ एकच जात असायला पाहिजे. पण माणसांची विभागणी माणूसच वेगवेगळया जातीच्या नांवाखाली करतो. माणूस जे काम करतो, जो व्यवसाय करतो, त्यानुसार माणसांची विभागणी केली जाते. मूळात माणूस ही एकच जात आहे. हे सांगतांना भगवंत अर्जुनाला म्हणाले, स्थूल पाहता सर्व मानव एकच आहेत. सर्वांची जाती एकच आहे. परंतु माणूस जे काम करतो, त्या कामानुसार माणूसच माणसाची विभागणी करतो. माणसाने कर्मानुसार जी मानवांची विभागणी केली त्याला किंवा या चातुर्वण्य संस्थेस मी मुळीच कारणीभूत नाही किंवा मी चातुर्वर्ण्याची निर्मीती करणारा कर्ता नाही, असे भगवंत अर्जुनाला म्हणाले.



ज्याच्या वाटयाला जे कर्म आले, त्याने ते कर्म एकनिष्ठेने पार पाडले तर त्याच्याईतका भाग्यशाली कोणी नाही. स्वत:ला उच्च समजणारा जर त्याच्या कर्तव्यात कसुर करत असेल तर तो उच्च असण्याचे कारण नाही. एखादयाला मुठभर समाज उच्च मानत नसेल पण त्याचे कर्म उत्कृष्ट असेल तर तो ख-या अर्थाने उच्च आहे. माणूस कोणाच्या पोटी जन्माला आला यावर त्याचे श्रेष्ठत्व, कनिष्ठत्व न ठरवता, त्याच्या हातून घडणा-या कर्तव्यावरुन ठरले पाहिजे. अर्थात, एखादा व्यक्ति खूप मोठया माणसाच्या पोटी जन्माला आला आणि कुकर्म करत असेल तर त्याला श्रेष्ठ समजण्याचे कारण नाही आणि जर एखादा खूप लहान माणसाच्या पोटी जन्माला आला आणि खूप उत्कृष्ट कार्य किंवा त्याच्या वाटयाला आलेले कर्म नितिनियमाला धरुन करत असेल तर त्याला कनिष्ठ समजण्याचे कारण नाही. अर्थात, माणसाची प्रतिमा, माणसाचे मोठेपण हे त्याच्या हातून घडणा-या कर्मावर अवलंबून असते. कोण काय कर्म करतो, त्यापेक्षा तो किती निष्ठेने व धर्माचे (नीती नियमाचे) पालन करुन करतो हे जास्त महत्वाचे व आवयक आहे. बरेच लोक कर्म करतात पण स्वत:ला त्या कर्माचा कर्ता मानीत नाहीत. अर्थात, जे कर्मात लिंपत नाहीत ते ख-या अर्थाने सुखी असतात. जो निष्काम कर्मयोगी, फलाची अपेक्षा न ठेवता कर्म करतो, तो त्या कर्माचा भोक्ता होत नाही. त्याला ते कर्म बाधक ठरत नाही. भाजलेले बियाणे जसे उगवत नाही, तसे त्याचे कर्म त्यांना परिणामकारक ठरत नाही. अर्जुनाच्या वाटयाला युध्दाचे कर्म आले आहे, त्याने हे युध्दरुपी कर्म एकनिष्ठेने, फलाची अपेक्षा न करता केले तर त्याला ते बाधक होणार नाही. अगदी त्याचप्रमाणे आपल्या पैकी कोणीही स्वत:ला किवा ईतरांना उच्च निच न समजता किंवा आपल्या वाटयाला आलेल्या कर्माला लहान-मोठे न समजता, प्रसंगानुरुप ते कर्म एकनिष्ठेने, फलाची अपेक्षा न ठेवता पार पाडावे. असे निष्काम कर्म केले तर आपणाला ख-या आनंदाची प्रचिती येईल. संतांच्या सांगण्याप्रमाणे आपण सर्व एकाच ईश्वराची लेकरे आहोत हे लक्षात ठेवून सर्वांशी समतेने व चांगले वागणे आवश्यक व योग्य आहे याची सदैव जाणीव असावी.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : रविवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. २९ डिसेंबर २०२४ | अमावस्या |
| विक्रम संवत् २०८०-८१ | सेवागिरी महाराज रक्षोत्सव |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - मार्गशिर्ष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. चतुर्दशी - (२८.०१) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - ज्येष्ठा (२३.२१) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - गंड (२१.४०) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - विष्टि (१५.५१) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**वृषभ** : राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल. मुलांची काळजी घ्यावी.

**मिथुन:** आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता. वाचनाची गोडी वाढेल.

**कर्क:** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ-लालचेपासून दूर रहा. धंदा मध्यम राहील.

**सिंह** : विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता.

**कन्या** : व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा. जीवनात यशस्वी व्हाल.

**तुळ** : आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल. जिवनात यशस्वी. आनंदाने संकटावर मात कराल.

**वृश्चिक** : कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**धनु** : व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा.

**मकर** : सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी सम स्या दूर होतील. आळस करू नका.

**कुंभ** : मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

# कांद्याची आवक घटली तरी दर स्थिर!

**कमाल ४००० तर सर्वसाधारण १७०० दर कायम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ डिसेंबर-**

कांद्याच्या बाजारपेठेसाठी राज्यातील दुसऱ्या क्रमांकाची बाजार समिती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गेल्या काही दिवसांपासून कांद्याची आवक घटली आहे, मात्र दर स्थिर असल्याचे निदर्शनास आले आहे. वास्तविक पाहता दर घटल्यानंतर मागणी वाढवून कांद्याचे दर वाढले जातात. परंतु सोलापूर बाजार समितीत कांद्याचे दर हे कायम असल्याचे दिसत आहेत.






दरम्यान, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गेल्या काही दिवसांपूर्वी तणावाचे वातावरण होते. बाजारपेठ काही दिवसांसाठी बंद ठेवण्यात आली होती. त्यामुळे कांद्याचे मार्केट घसरून शेतकऱ्यांचे नुकसान होईल असा अंदाज वर्तवला जात होता. परंतु हा अंदाज चुकला आहे. (दि.२४) डिसेंबरपासून कांद्याचा दर हा सर्वसाधारणपणे आहे त्या स्थितीत टिकून आहे. मंगळवार (दि.२४) डिसेंबर रोजी कांद्याची सुमारे ४८००८ क्विंटल इतकी आवक होती. त्यादिवशी कांद्याला कमीत कमी ३०० रुपये, जास्तीत जास्त ४ हजार ३०० तर सर्वसाधारणपणे १७०० रुपये प्रतिक्विंटल हा दर मिळाला. त्यानंतर बुधवार (दि.२५) डिसेंबर रोजी बाजार समितीत २४६०१ क्विंटल कांदा विक्रीसाठी आणला गेला. तेव्हा देखील कांद्याला कमीत कमी २००, जास्तीत जास्त ४३०० तर सर्वसाधारणपणे १८०० रुपये दर मिळाला. त्याच प्रमाणे गुरूवार (दि.२६) डिसेंबर रोजी बाजार समितीमध्ये सुमारे ३३६६४ क्विंटल कांदा बाजारपेठेत विक्रीसाठी दाखल झाला. तेव्हा देखील लहान कांद्याला कमीत कमी १०० रुपये, मोठ्या कांद्याला जास्तीत जास्त ४०५०, तर सर्वसाधारण दर हा १७०० रुपये प्रतिक्विंटल भाव कांद्याला मिळाला. तर आज शनिवारी ३१८५८ क्विंटल कांद्याची आवक बाजार समितीत झाली. कमीत कमी दर २०० रुपये, जास्तीत जास्त दर ४२०० तर सर्व साधारण दर हा १९०० मिळाला आहे.

दरम्यान, आवक कमी झाल्यानंतर दर वाढणे अपेक्षित होते परंतु दक्षिण भारतात पावसाचा जोर असल्याने, कांद्याची मागणी घटली आहे. त्यामुळे तेथील खरेदीदार व्यापारी जोखीम घेण्यास तयार नाहीत. त्यामुळे आवक घटून देखील दर टिकून आहेत. दर घटण्यापेक्षा स्थिर असल्याने शेतकऱ्यांना देखील सोयीस्कर असल्याचे असल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगण्यात आले.

### वेळअमावास्यानिमित्त उद्या कांदा लिलाव बंद

ग्रामीण भागातील महत्त्वाचा असणारा वेळा आमावस्या सोमवारी मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर बाजार समितीमधील सर्व व्यापाऱ्यांनी एक दिवस कांदा लिलाव बंद ठेवण्याचा सर्वानुमते निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने वेळाअमावास्या सणाच्या पार्श्वभूमीवर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीतील कांद्याचे लिलाव बंद ठेवण्यात येणार आहेत. रविवारी रात्री सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतकऱ्यांनी विक्रीसाठी कांदा आणू नये. सोमवारी बाजारपेठ बंद राहील. त्यामुळे सोमवारी रात्री कांदा आणावा. त्याचे लिलाव मंगळवारी होतील. शिवाय आडते व्यापारी, माथाडी कामगार, ट्रान्सपोर्ट व सर्व घटकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन टर्मिनल मार्केट यार्ड आडत व्यापारी संघाच्या वतीने करण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना यार्डात कांदा आणून नये असे आवाहन केले आहे.



## केएलई स्कूलच्या कॅडेट्सची एनसीसी शिबिरात १८ पदकांची लयलूट

**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

चपळगाव येथे नऊ महाराष्ट्र बटालियन एनसीसी सोलापूरच्या वतीने आयोजित सीएसटीसी ७२५ शिबिरात केलई इंग्लिश मीडियम स्कूलच्या कॅडेट्सने अप्रतिम कामगिरी करत सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक अशी १८ पदकांची लयलूट केली.

या शिबिरात फायरिंग, ड्रिल विविध खेळा, साहित्यिक व सांस्कृतिक स्पर्धांमध्ये सुवर्ण व रौप्य पदक विजेत्यामध्ये अक्षिता येमुल, श्रेया शिंगाडे, दिव्या गड्डी, सृष्टी माने, मनुश्री गड्डम, मानस वाले, समर्थ बिराजदार तर कास्य विजेत्या मध्ये अक्षिता येमुल, श्रिया शिंगाडे ,साई श्री डिंगणे, वल्लवी वडावराव दिव्या गड्डीम ल्लिकार्जुन मंजुळे यांचा समावेश होता.

विद्यार्थ्यांना या यशासाठी एनसीसी शिक्षक सिद्राम बिराजदार यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे स्कूलचे प्राचार्य सतीश हिरेमठ यांनी अभिनंदन केले.

## विद्यापीठाचा बोर्ड ऑफ ॲप्रेटीसशिप ट्रेनिंगशी करार; फेब्रुवारी २०२५ मध्ये रोजगार मेळाव्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आणि भारत सरकारच्या शिक्षा मंत्रालय अंतर्गत असलेल्या बोर्ड ऑफ एप्रेटीसशिप ट्रेनिंग, पश्चिम विभाग, मुंबई यांच्यात सामंजस्य करार झाला. कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर आणि बोर्डाचे संचालक श्री पी. एन. जुमले यांच्या पुढाकाराने या करारावर बोर्ड ऑफ एप्रेटीसशिप ट्रेनिंग पश्चिम विभागाचे उपसंचालक श्री एन. एन. वडोदे व विद्यापीठातर्फे कुलसचिव योगिनी घारे यांनी स्वाक्षऱ्या केल्या.




विद्यापीठातील ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल विभागाच्या पुढाकाराने हा करार झाला. यावेळी प्लेसमेंट विभागाचे संचालक डॉ. अनिल घनवट, सामाजिकशास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. गौतम कांबळे, डॉ. विनायक धुळप, डॉ. आर. एस. मेंते, विद्यापीठाचे कायदा अधिकारी ॲड. जावेद खैरदी आदी उपस्थित होते. एप्रेटीसशिप एबेडेड डिग्री प्रोग्राम (एईडीपी) कोर्सेस नॅशनल एप्रेटीसशिप ट्रेनिंग स्कीम (एनएटीएस) मध्ये समावेश करून या कोर्सेसच्या विद्यार्थ्यांना एप्रेटीसशिप ट्रेनिंगच्या संधी विद्यावेतनासह उपलब्ध करण्यासाठी सामंजस्य करार झाला.

प्रा. महानवर म्हणाले की, या माध्यमातून फेब्रुवारी २०२५ मध्ये भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे. विद्यापीठ कॅम्पस आणि संलग्नित महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना चांगले उच्च शिक्षण देण्याबरोबरच त्यांना रोजगार व रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे.

## जैन संघटनेतर्फे ७ जानेवारीपासून प्लॉस्टिक सर्जरी शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ डिसेंबर-**

भारतीय जैन संघटना, जैन सोशल ग्रुप सोलापूर सेंट्रल, युगंधर मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ७ व ८ जानेवारी २०२५ रोजी मातोश्री जेठीदेवी, पिताश्री मोहनलाल छाजेड यांच्या स्मरणार्थ मोफत प्लॉस्टिक सर्जरी शिबीर आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती भारतीय जैन संघटनेचे राज्य अध्यक्ष केतन शहा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मजरेवाडी, विमानतळाजवळ असलेल्या युगंधर मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटलमध्ये हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये महागड्या शस्त्रक्रिया विनामूल्य करण्यात येतील. प्रसिद्ध प्लॉस्टिक सर्जन स्वर्गीय डॉ. शरदकुमार दिक्षित (अमेरिका) यांच्या स्मरणार्थ त्यांचे अमेरिकेतील शिष्य डॉ. राज, डॉ. ललिता लाला व त्यांचे सहकारी डॉक्टर्स यांच्यामार्फत हा मानवसेवा सुरू आहे. युगंधर मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटलमधून डॉ. विलास हरपाळे, सहप्रमुख डॉ. अभिजीत वडगावकर हे सहकार्य करणार आहेत. रुग्णांची नोंदणी व तपासणी फक्त मंगळवार दि. ७ जानेवारी २०२५ रोजी या एकाच दिवशी सकाळी ९ ते १२ वाजेपर्यंत होणार असून उर्वरित वेळी शस्त्रक्रिया पार पडणार आहेत. या शिबिराविषयी अधिक माहितीसाठी केतन शहा (९३७०४२००३३), संजय शहा (९३७००२६८११) श्याम पाटील (८९९९९०८६६०), अभिनंदन विभुते (९९२२९३२२००), अशोक छाजेड (९४२२०६८२०८) यांच्याशी संपर्क साधावा. या पत्रकार परिषदेस संतोष बंब, संजय शहा, अशोक छाजेड, अतुल गांधी, अभिनंदन विभुते आदी उपस्थित होते.



## उद्योग-व्यापारातील विश्वास आणि नीतीमूल्य जयकुमार पाटील यांनी जपली : डॉ. पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ डिसेंबर**

सोलापूर हे उद्योगाचं पूर्वीपासून केंद्र आहे. कापड गिरण्या आणि सूत व्यवसाय व वस्त्र उद्योग यासाठी सोलापूर प्रसिद्ध होतं आणि आहे. पण याला वेगळा आयाम देत स्व कलगोंडा पाटील आणि जयकुमार पाटील यांनी यांत्रिक उद्योगास प्राधान्य दिलं. त्यामुळेच लक्ष्मी उद्योग समूह, प्रिसिजन, क्रॉस इंटरनॅशनल यासह अनेक मोठे उद्योग सोलापुरात उदयास आले. चिंचोली एमआयडीसी चे जनक जयकुमार पाटील यांनीच ही किमया घडवून आणली कारण ही एमआयडीसी उभं करण्यासाठी त्यांनी अतोनात मेहनत घेतली आहे.

उद्योगशिल्प जयकुमार पाटील यांच्या विसाव्या पुण्यतिथी निमित्ताने यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र सोलापूर आणि मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चर्चासत्रात डॉ.रावसाहेब पाटील यांनी आपले विचार व्यक्त केले. या उपक्रमामागील यशवंतराव चव्हाण सेंटरची भूमिका दत्ता गायकवाड यांनी सांगितली. प्रारंभी प्रिन्सिपल के पी मंगळवेढेकर तसेच आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण आणि उद्योग शिल्प जयकुमार पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रा. सविता वैद्य यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी प्रा. स्नेहल पाठक, प्रा. टिंकेश ग्यामलानी सरफराज शेख दिनेश शिंदे आदी उपस्थित होते

## श्री चौडेश्वरी देवी मंदिर कळसारोहणानिमित्त आजपासून विविध धार्मिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ डिसेंबर-**

अक्कलकोट तालुक्यातील सुलेरजवळगे येथे श्री चौडेश्वरी देवीमंदिर कळसारोहण निमित्त रविवार दि. २९ डिसेंबर पासून शुक्रवार दि. ३ जानेवारी २०२५ या कालावधीत मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती वेदमूर्ती सिद्धय्या स्वामी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

रविवार दि. २९ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ ते रात्री १० या वेळेत कर्नाटकातील प्रसिद्ध प्रवचनकार डॉ. शांतवीर शिवाचार्य, हावगी लिंगेश्वर संस्थान हिरेमटा, गडीगौडगाव यांचे पुराण तसेच दि. ३१ डिसेंबर रोजी गावातून सुवासिनीसह श्री चौडेश्वरी देवी मंदिर कळसाची मिरवणूक काढण्यात येणार आहे. शुक्रवार दि. ३ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता काशीपीठाचे जगद्गुरु श्री श्री श्री डॉ. धर्मरत्न मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी व श्रीशैल पिठाचे श्री श्री चन्नसिद्धाराम पंडिताराध शिवाचार्य महास्वामीजींच्या दिव्य सानिध्यात गावातून सुवासिनीची अड्डपालखी जलकुंभ मिरवणूक पार पडणार आहे. या धार्मिक सभेस भागातील सर्व महास्वामिंची उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमास आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. विजयकुमार देशमुख, आ. सुभाष देशमुख, आ. देवेंद्र कोठे यांच्यासह आजी-माजी आमदार यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास पंचक्रोशीतील भक्तगणांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री चौडेश्वरी मंदिर देवस्थान पंच कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेस महादेव कुंभार, राजशेखर येळेगाव, श्रीशैल कुंभार, उमेश पुजारी आदी उपस्थित होते.

# शासकीय महाविद्यालयातील प्रशासकीय अधिकाऱ्यांना बडतर्फ करा


**भीमशक्ती संघटनेची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ डिसेंबर-**

सोलापूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील दोन प्रशासकीय अधिकाऱ्यांना बडतर्फ करावे, या मागणीचे निवेदन भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी यांना देण्यात आले.



दि. ६ डिसेंबर २०२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी महाराष्ट्रभर व संपूर्ण देशभर वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या माध्यमातून अभिवादन कार्यक्रम झाले. परंतु सोलापूर येथील डॉ. वैश्यपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील संबंधित दोन अधिकाऱ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती कार्यक्रम केला नाही. इतरांनाही करू दिले नाही परंतु या कार्यालयाची संपूर्ण जबाबदारी या दोन अधिकाऱ्यांवर असताना स्मृतिदिनाचा कार्यक्रम जाणून बुजून टाळण्यात आला, असा आरोप निवेदनात केला आहे. काही संघटनांनी व राजकीय पक्षांनी याचा निषेध नोंदवून त्या दोघा अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यानंतर अधिष्ठता डॉ. संजीव ठाकूर यांनी चौकशी समितीची नेमणूक करून चौकशी केली. चौकशी समितीने अहवाल नुसार जाधव व राऊळ या दोन अधिकाऱ्यांवर ठपका ठेवला. चौकशी समितीच्या अहवाल नुसार या दोषी ठरवण्यात आलेल्या या दोन अधिकाऱ्यांवर अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायदा, कर्तव्यात कसूर आणि शासनाच्या नियमाप्रमाणे राष्ट्रपुरुषाचा अवमान प्रकरणी देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी प्रदेश सरचिटणीस सुबोध वाघमोडे, पश्चिम महाराष्ट्र सरचिटणीस राजा कदम, शहर अध्यक्ष उमेश सुरते, सलीम मुल्ला, महिला जिल्हा अध्यक्षा प्रमिला तुपलवंडे, कमरूनिसा बागवान, मेजर सुखदेव साबळे, समीर मुजावर, इब्राहिम शेख, भारत क्षीरसागर आदी उपस्थित होते.



## जिजामाता शाळेत बाल आनंद मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ डिसेंबर-**

जिजामाता प्राथमिक शाळा व जिजामाता बालक मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने तुळशीदास नगर येथे बाल आनंद मेळावा संपन्न झाला. बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन कोंडी ग्रामपंचायतचे उपसरपंच शिवाजीअण्णा निळ यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलूसर होते तर प्रमुख अतिथी म्हणून संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सोमनाथ राऊत व भिवाजी भोसले, मुख्याध्यापक उदय जाधव उपस्थित होते. या बाल आनंद मेळाव्यामध्ये विद्यार्थ्यांनी ३५ हून अधिक स्टॉल लावले होते. यात विविध खाद्यपदार्थ, फळांचे, खेळाचे साहित्यांचा समावेश होते. या स्टॉलला ग्रामस्थ पालक व परिसरातील विद्यार्थ्यांनी भेट देऊन मेळाव्याचा आनंद घेतला. तसेच यावेळी मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलूसर यांना महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बाळे सोलापूरचे आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार मिळाल्याबद्दल उपसरपंच शिवाजी नीळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. या आनंद मेळाव्यात आठ हजार रुपये हून अधिक रूपयांचे विद्यार्थ्यांनी व्यवहार केले.संस्थेच्या संस्थापिका निर्मला ठोकळ, अध्यक्ष सचिन ठोकळ, सचिव शिल्पा ठोकळ यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### तामदर्डीतून दुचाकीची चोरी; अज्ञातांवर गुन्हा दाखल

**मंगळवेढा, दि.२८ डिसेंबर-**

तामदर्डी येथे एका शेताजवळ लावलेली ३५ हजार रुपये किंमतीची हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर मोटर सायकल चोरटयाने पळवून नेल्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान मोटर सायकल चोरीची मालिका थांबता थांबत नसल्यामुळे दुचाकी स्वार धास्तावले आहेत. यातील फिर्यादी मारुती शंकर जानकर (रा.शिरनांदगी) हे ऊसतोड कामगार असून दि.२४ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता तामदर्डी येथील महासिध्द पुजारी यांच्या शेताजवळ फिर्यादीचा साडू अंकुश थोरात (रा.निगडी ता.जत,जि. सांगली) यांच्या नावे असलेली व फिर्यादी वापरत असलेली हिरो कंपनीची स्प्लेंडर मोटर सायकल क्रमांक एम.एच.१० डी.बी.११५३ ही उभा केली होती. अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या संमतीवाचून स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी चोरुन नेली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले असून याचा अधिक तपास बोराळे बीटचे पोलीस हवालदार महेश कोळी हे करीत आहेत. दरम्यान यापुर्वीही मंगळवेढा शहर,ब्रम्हपुरी,माचणूर येथून मोटर सायकली चोरीला गेल्या असून त्याचा अद्यापही तपास लागला नसल्याने चोरट्यांचे मोटर सायकल चोरण्याचे धाडस दिवसेंदिवस वाढत असल्याने मोटर सायकल स्वार धास्तावले आहेत.



### श्री शिवाजी महाविद्यालयामध्ये रक्त तपासणी शिबीर

**बार्शी, दि. २८ डिसेंबर-**

येथील श्री शिवाजी महाविद्यालयाध्ये कनिष्ठ विभागांतर्गत कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त व सखी सावित्री समिती अंतर्गत बल्ड ग्रुप डिटेक्शन आणि हिमोग्लोबिन काऊंटिंग शिबिराचे एमसीव्हीसी विभागामार्फत आयोजन करण्यात आले होते. सदरील शिबिराचे उद्घाटन संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळेस कनिष्ठ विभागातील इ. ११ वी व इ. १२ वी कला, विज्ञान व किमान कौशल्य विभागातील ३२० विद्यार्थिनींचे व १५ शिक्षक महिला कर्मचाऱ्यांचे क्व लेंपीं आणि Blood Group डिटेक्शन करण्यात आले. किमान कौशल्य विभागाचे प्रमुख डॉ. दिपक जाधवर यांनी प्रास्ताविकातून शिबीरामध्ये रक्तगट व हिमोग्लोबिन तपासणी करण्यात येणार आहे. आपल्या उत्तम आरोग्यासाठी हिमोग्लोबिन टेस्ट करणे आवश्यक आहे असे म्हटले. डॉ. सुचेता जवान यांनी सर्व विद्यार्थीनींची रक्तगट तपासणी केली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए .बी शेख सर, उपप्राचार्य प्रा. एम. व्ही. ओव्हाळ, पर्यवेक्षक प्रा. रविंद्र वायकर ,कला समन्वयक डॉ. महादेव राऊत तसेच श्रीमती मनीषा चव्हाण, प्रा. सोमनाथ पेटकर, प्रा. बळीराम थोरे, प्रा. प्रेमसागर राऊत, मारुती मोहिते, शालेय समितीचे चेअरमन नंदन जगदाळे उपस्थित होते.



### माढा जिल्हा परिषद प्राथमिक मुलींच्या केंद्रशाळेत रतन टाटांची जयंती साजरी

**माढा, दि. २८ डिसेंबर-**

माढा जिल्हा परिषद प्राथमिक मुलींची केंद्र शाळा येथे शनिवारी श्रेष्ठ उद्योगपती रतनजी टाटा यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी रतन टाटा यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.तसेच यानिमित्ताने माढा रयत शिक्षण संस्थेच्या कला व वाणिज्य महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. गोवर्धन दिकोंडा यांच्या रतन नवल टाटा ई बुक या पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात आले. यावेळी डॉ. गोवर्धन दिकोंडा यांनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सुरेश माळी, विशेष शिक्षक प्रवीण भांगे,वैजीनाथ मोगल तसेच शाळेतील इतर शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती घावटे यांनी केले तर आभार प्रदर्शन वैजीनाथ मोगल यांनी केले.

### शितलकुमार मोटे यांना राज्यस्तरीय क्रांतिसूर्य पुरस्कार जाहीर

**करमाळा, दि.२८ डिसेंबर-**



पाथर्डी ता.करमाळयाचे सुपुत्र तसेच करमाळा आणि परांडा तालुक्याचे टीव्ही वृत्तवाहिनीने पत्रकार शितलकुमार मोटे यांना जगदीशब्द फाऊंडेशनच्या वतीने राज्यस्तरीय क्रांतीसुर्य पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. शितलकुमार मोटे यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली आहे त्यांचे कार्य इतरांसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे याची दखल घेत त्यांना पाच जानेवारी २०२५ रोजी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सभागृह गंजपेठ पुणे येथे सन्मानित करण्यात येणार आहे अशी माहिती जगदीशब्द फाउंडेशनचे अध्यक्ष जगदीश ओहोळ यांनी दिली.

### सोलापूर जिल्ह्यात मनाई आदेश लागू

**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून दि. २९ डिसेंबर २०२४ सकाळी ८ वा.पासून ते १२ जानेवारी २०२५ रात्री ८ वा. पर्यंत मनाई आदेश लागू करण्यात आलेले आहेत, असे अपर जिल्हादंडाधिकारी मनिषा कुंभार यांनी कळविले आहे. या आदेशानुसार शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, सुरे, झेंडा लावलेली काठी किंवा शरीरास ईजा करण्याकरीता वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणताही ज्वालाग्राही अगर स्फोटक पदार्थ वाहून नेणे, दगड किंवा फेकावयाची उपकरणे, व्यक्ती अगर त्यांची प्रेत यात्रा, प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे याला मनाई असणार आहे.

# सोलापुरात मंदिर महासंघाच्या माध्यमातून कार्य करणार

## शिर्डी येथील तृतीय महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदेत सोलापुरातून ६९ हून अधिक मंदिरांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ डिसेंबर-**

श्री साई पालखी निवारा, शिर्डी येथे २४ आणि २५ डिसेंबरला आयोजित करण्यात आलेल्या तृतीय 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे'त प्रत्येक मंदिरांसाठी सुरक्षा समिती स्थापन करण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला. याचबरोबर मंदिरांच्या भूम ीचे बेकायदेशीर हस्तांतरण रोखण्यासाठी 'अँटी लँड ग्रॅबिंग' कायदा शासनाने तात्काळ लागू करावा यांसह एकूण १० ठराव 'हर हर महादेव'च्या गजरात एकमताने संमत करण्यात आले. मंदिर महासंघाच्या या मागण्या घेऊन लवकरच मा. मुख्यमंत्र्यांची भेट घेण्याचे ठरवले असून त्यासाठी राज्याचे रोजगारहमी मंत्री श्री. भरतशेठ गोगावले यांनी विशेष सहकार्य करू, असे आश्वासन दिले आहे.

या परिषदेसाठी सोलापूर जिल्ह्यातून सर्वश्री दिलीप पाटील, मल्लिकार्जुन देवस्थान शेळगी, गोवर्धन मायकल, श्रीचौडेश्वरी देवस्थान, दीपक परदेशी, श्रीवैष्णव मारुती देवस्थान, भास्कर राऊळ, श्री वैष्णव मारुती देवस्थान जुने घरकुल, दुभाषी नारायण श्री वैष्णव मारुती देवस्थान जुने घरकुल, शैलेंद्र जोशी, जुने विठ्ठल मंदिर यांच्यासह ६९ हून अधिक मंदिर विश्वस्त प्रतिनिधी उपस्थित होते. यापुढील काळात देशासाठी आदर्श असे मंदिरांचे संघटन महाराष्ट्रात उभे करण्याचे निश्चय सर्वांनी केला.




मंदिरे, तसेच मंदिरांच्या भूमीवर झालेल्या अतिक्रमणाच्या विरोधात दर आठवड्यातून एकदा 'मंदिर तेथे सामूहिक आरती' करणे, काशी आणि मथुरा तीर्थत्रक्षेत्रांचा खटला जदलगती न्यायालयात चालववा, सरकारने राज्यातील सर्व मंदिरे सरकारमुक्त करून ती भक्तांच्या स्वाधीन करावीत, मंदिरात भक्तांनी अर्पण केलेला निधी महाराष्ट्र सरकारने विकासकामांसाठी न वापरण्याची घोषणा करावी; धर्मादाय आयुक्त कार्यालये मंदिरांना विविध कारणांसाठी देणगी देण्यासाठी आज्ञापत्रे पाठवत आहेत. अशी नियमबाह्य सरकारी पत्रे महाराष्ट्र शासनाने रोखावीत आणि मंदिरांचा निधी केवळ धार्मिक कार्यासाठी उपयोगात आणला जावा, अशी सूचना धर्मदाय आयुक्त कार्यालयाला करावी; महाराष्ट्रातील पौराणिक, ऐतिहासिक म हत्त्व असलेल्य मंदिरांचा तात्काळ जीर्णोद्धार करण्यासाठी सरकारने अर्थसंकल्पात भरीव तरतूद करावी; तीर्थक्षेत्रे, श्रीक्षेत्रे, गडकिल्ले यांवर असलेल्या मंदिरांवर झालेल्या अतिक्रमणाचे महाराष्ट्र सरकारने सर्वेक्षण करून तात्काळ ती अतिक्रमणे दूर करावीत; महाराष्ट्रातील 'क' वर्गवारीतील मंदिरे सर्व कागदपत्रे उपलब्ध करूनही 'ब' वर्गात वर्गीकृत केली जात नाहीत. याची शासनाने दखल घेऊन त्या संदर्भात तातडीने कार्यवाही करावी; मंदिर परिसर मद्य-मांस मुक्त होण्यासाठी सरकारने अधिसूचना काढावी; राज्यातील मंदिरांच्या पुजार्यांना प्रतिमाह मानधन देण्याचा निर्णय घ्यावा.

### मंदिरांच्या समस्यांवर चर्चा

दोन दिवसांच्या मंदिर परिषदेत मंदिरांच्या विविध समस्यांवर चर्चा, तज्ञ अन् मान्यवरांचे मार्गदर्शन, तसेच गटचर्चा आयोजित करण्यात आल्या. यात 'मंदिरे सनातन धर्मप्रचाराची केंद्रे बनवणे', 'वक्फ कायद्या'द्वारे मंदिरांच्या भूमीवर अतिक्रमण आणि मंदिरे बळकावणे यांवर उपाय', 'मंदिरांमधील वस्त्रसंहिता', 'धर्मादाय आयुक्त कार्यालय आणि मंदिरांचा सम न्वय' आदी विषय होते. त्यातून वरील ठराव संमत करण्यात आले.

# रोजगार हमी योजनेतील विहिरीच्या जाचक अटी तात्काळ शिथिल करा

## भाजपाचे जिल्हा सचिव लक्ष्मण केकान यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२८ डिसेंबर-**

रोजगार हमी योजने मधून सिंचन विहिरीच्या जाचक अटी शिथिल कराव्यात अशा मागणीचे निवेदन भाजपा सोलापूर जिल्हा सचिव लक्ष्मण केकान यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती करमाळा यांना दिले आहे.



निवेदनात पुढे म्हटले आहे की या जाचक अटीमुळे शेतकरी विहिरीपासून वंचित राहत आहे. सोलापूर जिल्ह्याच्या इतर तालुक्याचे तुलनेत या अटीमुळे तफावत आढळून येत असून माढा तालुक्यात १७०० विहिरी मंजूर आहेत. त्यापैकी १४००चे विहिरीचे काम चालू आहे. माळशिरस तालुक्यात ११०० मंजूर आहेत ७०० चे काम चालू आहे. पंढरपूर तालुक्यात ९०० चे मंजूर आहे साडेसहाशे काम चालू आहे. बार्शी तालुक्यात पंधराशे विहिरी मंजूर आहेत. त्यापैकी ९०० विहिरीचे काम चालू आहे. परंतु करमाळा तालुक्यामध्ये फक्त ९७ विहिरी मंजुरी असून प्रत्यक्षात ७२ विहिरी चालू आहेत. ही मोठी खेदाची बाब आहे करमाळा तालुक्यात फार मोठ्या संख्येने शेतकरी रोजगार हमी विहिरीचे काम घेण्याकरिता उत्सुक आहेत. परंतु संबंधित आपल्या कार्यालयाच्या जाचक अटीमुळे फार मोठ्या प्रमाणात शेतकरी या योजनेपासून वंचित राहत आहे. परिणामी शासनाने शेतकऱ्यांसाठी सुरू केलेले योजनेचा शेतकऱ्यांना अपेक्षित प्रमाणात फायदा होताना दिसत नाही. इतर तालुक्याच्या तुलनेत आपल्या तालुक्यात फक्त तीन अंकी संख्येतसुद्धा विहिरीची कामे मंजूर व चालू नाहीत सदर बाबी फार गंभीर असून सदर विषयात लक्ष घालून जाचक अटी शिथिल करून शेतकऱ्यान योजनेचा फायदा होईल, अशी भूमिका प्रशासनाने घ्यावी. या मागणीचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिले आहे. यावेळी शिष्टमंडळामध्ये भाजप किसान मोर्चा प्रदेश सचिव दीपक चव्हाण, किसान मोर्चा जिल्हा सरचिटणीस नरेंद्रसिंह ठाकुर, संजय घोरपडे, महादेव सराटे, मल्हारी वारगड, संतोष कांबळे, पांडव खाडे, नागनाथ केकान, सुहास पवार आदी उपस्थित होते.


# इस्लामपुरात श्री सिद्धनाथ-जोगेश्वरी मंदिराचे कळसारोहण

## सिद्धनाथाच्या नावाने चांगभलच्या जयघोषात, कलशावर केली पुष्पवृष्टी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २८ डिसेंबर-**

इस्लामपूर येथे श्री सिद्धनाथ-जोगेश्वरी मंदिर जीर्णोद्धार मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कळसारोहण सोहळा मोठ्या धार्मिक उत्साहात संपन्न झाला.

हभप रविंद्र महाराज यांच्या हस्ते कळसारोहण झाले. यावेळी आ. उत्तमराव जानकर, माजी पंचायत समिती उपसभापती अर्जुनसिंह मोहिते-पाटील, सहकार महर्षी साखर कारखाना संचालिका स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील, संजय देशमुख, अमर देशमुख, हभप धैर्यशील देशमुख, मच्छिंद्र पवार, डॉ. रामदास देशमुख, गौतम माने, संग्रामसिंह रणनवरे, बाळासाहेब माने-देशमुख, साहेबराव देशमुख, लक्ष्मण पवार, कुलदीप देशमुख, विठ्ठल नारायण पवार, राम चंद्र देशमुख, भानुदास पवार, रत्नशिव पवार, हनुमंत पवार, चंद्रकांत दाते, आनंद शेंडगे उपस्थित होते. मंदिरास आकर्षक फुलांनी सजविण्यात आले होते. धार्मिक विधीनंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आला. १९९४ साली मंदिराचा जीर्णोद्धार करण्याच ठरवले होते. यासाठी तत्कालीन उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांनी दोन सभामंडप मंदिरास दिले. मात्र इतर मंदिर बांधकाम अडचण आल्यानंतर ते थांबलं. त्यानंतर २०२३ साली माने-देशमुख परिवार पुढाकार घेऊन सुमारे ३१ लाख रुपये लोकवर्गणी जमा करून राहिलेलं कामकाज पूर्ण केल. १९९४ साली विदर्भ कोकण ग्रामीण बँक इस्लामपूर शाखेत ठेवलेलं मच्छिंद्र पवार व रामचंद्र देशमुख या दोघांच्या संयुक्त खात्यामध्ये ६३ हजार रुपये ठेव ठेवली होती. त्याचे २०२४ साली ५ लाख ६० हजार रुपये मिळाल्याने




हा कलशारोहन कार्यक्रम करण्यास मदत झाली. तसेच माने-देशमुख व ग्रामस्थांनी सढळ हाताने आर्थिक मदत केल्याने संपूर्ण कार्यक्रमाच आर्थिक नियोजन पूर्ण झाले. प्रास्ताविक धनंजय देशमुख यांनी केले. आ. उत्तमराव जानकर व अर्जुनसिंह मोहिते-पाटील यांनी निधी देण्याची ग्वाही दिली.

# माढ्यातील अंकिता भांगे, दीप्ती कदम सीए परीक्षेत उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २८ डिसेंबर-**

माढ्यातील अंकिता आनंद भांगे व दिप्ती विकास कदम या दोन्ही मुली सीएची परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत.



माजी जिल्हा परिषद सदस्य झुंजार भांगे यांची पुतणी व्यावसायिक आनंद भांगे व माढा नगरपंचायतीच्या गटनेत्या संजिवनी भांगे यांची कन्या अंकिता भांगे सीएच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन मोठे यश प्राप्त केले आहे. तिचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सोलापूर येथील इंडियन मॉडेल स्कूलमध्ये झाले तर अकरावी व बारावीचे वाणिज्य शाखेचे शाखेतील शिक्षण सोलापूर येथील हिराचंद नेमचंद महाविद्यालयात झाले. सोलापूर येथील भारती विद्यापीठातून तिने वाणिज्य शाखेची पदवी प्राप्त केली त्यानंतर ऑनलाईन पद्धतीनेच सीएच्या परीक्षेची तिने तयारी केली. दोन वर्षांच्या तयारीमध्ये तिने ही परीक्षा उत्तीर्ण होत यश मिळविले आहे. शेतकरी कुटुंबात जन्म झालेल्या दीप्ती विकास कदम हिने प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत सीएच्या परीक्षेत यश मिळवले असून तिचे प्राथमिक शिक्षण माढ्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत तर माध्यमिक शिक्षण सहकारमहर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशालेत झाले.



माढ्यातीलच कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये बारावी वाणिज्य शाखेचे शिक्षण घेतले व त्यानंतर पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये पदवीचे शिक्षण घेतले. कोणतेही क्लासेस न लावता केवळ ऑनलाइन पद्धतीच्या अध्यापनावरती दिप्ती सीएची परीक्षा उत्तीर्ण झालेली आहे. तिला कुटुंबीयांनी मोठे पाठबळ यासाठी दिले.

# विद्यार्थ्यांनी भरविला उमरडमध्ये बाजार

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २८ डिसेंबर-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उमरड येथे आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत बाल आनंद मेळावा अर्थात आनंदी बाजाराचे आयोजन करण्यात आले.

बाजाराचे उद्घाटन प्रमोद बदे, संजय कोठावळे यांनी केले. यावेळी माजी जि. प. सदस्य वामनराव बदे, बापूराव चोरमले, संदीप मारकड, जनार्दन मारकड, रवींद्र गिरी, मुकेश बदे, अण्णा पडवळे, चांगदेव चौधरी, मुख्याध्यापक अमृळे उपस्थित होते. या बाजारात इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी फळे, भाज्या, शालेय वस्तू, खाद्यपदार्थ विक्रीसाठी आणले होते. विद्यार्थ्यांचे विविध स्टॉल मांडण्यात आले होते.

गावकऱ्यांच्या उदंड प्रतिसादांने बाजार फुलून गेला होता. ग्राहकांनी आपल्या वस्तू खरेदी कराव्यात यासाठी लहान लहान मुले वेगवेगळ्या क्लुप्त्या वापरताना दिसत होते. आठवडी बाजारापेक्षा या शैक्षणिक बाजारात भाजीपाला स्वस्त मिळत असल्याने गावकऱ्यांनी खरेदीसाठी झुंबड उडवली होती तर आपला माल विकला जातोय याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरती दिसून येत होता. उमरड जिल्हा परिषदेच्या सर्व शिक्षकांच्या मेहनतीने या संपूर्ण बाजाराचे नियोजन करण्यात आले होते.



विद्यार्थ्यांमध्ये व्यवहारिक ज्ञान वाढावे विद्यार्थ्यांना खरेदी विक्री नफा तोटा यांची माहिती व्हावी तसेच गणिती क्रिया मापन याविषयीची विद्यार्थ्यांमध्ये जाणीव निर्माण व्हावी या उद्देशाने आनंदी बाजार भरविण्यात आला.
**- अनिल यादव, शिक्षक, जि. प. प्राथमिक शाळा, उमरड**

# सोलापूरचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील होणार की जयकुमार गोरे?

## चर्चेला उधाण; कधी संपणार उत्सुकता?

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २८ डिसेंबर-**

महाराष्ट्रात महायुतीचे सरकार स्थापन झाले असून मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे व अजित पवार यांची वर्णी लागली असून मंत्रिमंडळाचा विस्तारही झाला आहे. या मंत्रिमंडळाच्या विस्तारात सोलापूर जिल्ह्याला मंत्री पद देण्यात आलेले नाही. यामुळे बाहेरचेच पालकमंत्री लादण्यात येणार असल्याने चंद्रकांत पाटील की जयकुमार गोरे यांच्यापैकी कोणाची वर्णी लागणार याची उत्सुकता लागली आहे.

### नवीन वर्षात पालकमंत्री मिळणार

येथील सर्व घडामोडीवर बारकाईने लक्ष ठेवता येणार आहे. पण सध्या पक्षश्रेष्ठीं या दोघांपैकी कोणाला पालकमंत्रीपदाची संधी देतात, याकडे सध्या सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. नवीन वर्षाच्या पहिल्या आठवड्यातच सोलापूर जिल्ह्याला पालकमंत्री मिळणार असल्याची सध्या जोरात चर्चा सुरु आहे.

यामुळे खरा तर सोलापूरकरांचा थोडा हिरमोड निश्चितपणे झाला आहे पण मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस विराजमान झाले असल्याने तसेच जिल्ह्यात निवडून आलेले पाचही आमदार भाजपाचेच आहेत. यामुळे विकासकामांत कसलीही अडचण येणार नाही हे निश्चित आहे. मंत्रिमंडळ विस्तारानंतर आता सोलापूर जिल्ह्यात चर्चा रंगली आहे ती सोलापूरचा पालकमंत्री कोण होणार.





जिल्ह्यात मंत्री पद न दिल्यामुळे पुन्हा बाहेरचाच पालकमंत्री होणार हे निश्चित आहे. यामध्ये सध्या दोन नावाची चर्चा जोरात सुरू आहे ती म्हणजे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री तथा संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील. जे यापूर्वी पालकमंत्री पदावर विराजमान होते तर दुसरी चर्चा म्हणजे माण-खटावचे तडफदार आमदार तथा ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्या नावाची सध्या जोरात चर्चा सुरु आहे. जयकुमार गोरे सोलापूर जिल्ह्यातील म ाळशिरस मतदारसंघालगतचे असल्याने त्यांना सोलापूर जिल्ह्यातील संपूर्ण राजकारणाची माहिती येते तसेच माण - खटाव मतदारसंघ हा माढा लोकसभा मतदारसंघातच येतो यामुळे शक्यतो जयकुमार गोरे यांना पालकमंत्री पदाची संधी दिल्यास त्यांना फारशे इतर लांब नाही. यामुळे सोलापूरकडे चांगले लक्ष देता येणार आहे.

## पंढरपुरात ३४५ जणांचे रक्तदान

**पंढरपूर, दि.२८ डिसेंबर-**
पंढरपुरात झालेल्या शिबिरात ३४५ जणांनी रक्तदान केले. पांडुरंग परिवार युवक आघाडी, प्रणव परिचारक युवा मंच आणि परिचारक गटाकडून रक्तदान संकल्प दिवस साजरा केला जातो. गेल्या दहा वर्षापेक्षा अधिक काळ रक्तदानाचा संकल्प प्रणव परिचारक करतात. यंदाही हा संकल्प करण्यात आला. यावेळी मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते सहभागी झाले होते.



## संक्षिप्त वृत्त...

### शेतजमिनीच्या वादातून मारहाण; शेंडगेचा अटकपूर्व जामीन मंजूर

**बार्शी, दि. २८ डिसेंबर-**
माझ्या शेतात का आली म्हणून सख्या भावजयला दिराने काठीने डोक्यात, पायावर मारहाण करुन गंभीर जखमी केले व तिची साढी ओढून विनयभंग केला, अशी तक्रार वैराग पोलीस ठाण्यात ३० नोव्हेंबर २४ रोजी करण्यात आली होती. त्यात एका आरोपीस अटक केली व एक अरोपी फरार झाला होता. फरार आरोपी यांनी ड गणेश हांडे यांच्यामार्फत बार्शी जिल्हा व सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. फरार आरोपी घटनास्थळी नव्हता, त्याच्याकडून काहीही जप्त करायचे नाही, तो सिव्हील इंजिनिअर आहे. पुणे येथे कान्स्टकशन डेव्हलपर्स काम करतो, त्यांची बदनामी व्हावी म्हणून व पूर्वीच्या दिवाणी केसेस असल्यामुळे जाणूनबुजून या केसमध्ये खोटे नाव गोवले आहे, असा युक्तिवाद केला गेला व त्या संदर्भात रेकॉर्डवरील कागदोपत्री पुरावे कोर्टासमोर सादर केले व कोर्टाच्या निदर्शनास आणून दिले असा युक्तिवाद केला. तो ग्राह्य धरुन जिल्हा कोर्ट एल. एस.चव्हाण यांनी २५ हजार रुपयांच्या जात मुचलक्यावर जामीन अर्ज मंजूर केला. यात आरोपीच्यावतीने ड. गणेश हांडे यांनी काम पाहिले.



### पिलीव पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी मुलाणी, उपाध्यक्षपदी रोकडे

**पिलीव, दि. २८ डिसेंबर-**
माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील पत्रकार संघाच्या २०२५ च्या पदाधिकारी निवडीसाठी आज संघाचे विद्यमान अध्यक्ष अतुल नष्टे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी सर्वानुमते अध्यक्षपदी शाहरुख मुलाणी यांची तर उपाध्यक्षपदी संजय रोकडे, कार्याध्यक्षपदी प्रा. संजय पाटील तर सचिवपदी गणेश देशमुख व संघटक म्हणून सतिश पारसे यांच्या निवडी बिनविरोध करण्यात आल्या. यावेळी ज्येष्ठ पत्रकार दामोदर लोखंडे, अतुल नष्टे, प्रमोद भैस, सुजित सातपुते, उदय कदम, विश्वजीत गोरड, रघुनाथ देवकर आदी उपस्थित होते.




### सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठानचे पुरस्कार जाहीर

**सांगोला, दि. २८ डिसेंबर-**
आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने वर्धापन दिनानिमित्त दिले जाणारे विविध पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. चार व्यक्ती व एका संस्थेस हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष राजेंद्र यादव व सचिव संतोष महिमकर यांनी दिली. यामध्ये डॉ. महादेव संभाजी गायकवाड (लोणविरे) यांना सृजनशील शेतकरी पुरस्कार, विजय रामचंद्र चव्हाण सांगलीकर (सांगोला) यांना समाजसेवा प्रेरणा पुरस्कार, साधना श्रीगणेश कुलकर्णी (सांगोला) यांना कृतिशील आदर्श माता पुरस्कार, जानकाबाई दिगंबर चंदनशिवे (अजनाळे) यांना सार्थ स्वाभिमान पुरस्कार तर वाढेगाव येथील माणगंगा भ्रमणसेवा बहूउद्देशीय संस्था यांना आदर्श संस्था पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पुरस्कार वितरण सोहळा दि. १ जानेवारी २०२५ रोजी सायं.६ वा. सदानंद मल्टिपर्पज हॉल येथे होणार असल्याचे संतोष महिमकर यांनी सांगितले.



### ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**बार्शी, दि. २८ डिसेंबर-**
ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय बार्शी या संस्थेने २०२५ या सालातील कॅलेंडरचे प्रकाशन पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्यासह उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नारकुल व राहुल मडावी, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या हस्ते करण्यात आले. या कॅलेंडरमध्ये संस्थेने केलेल्या कामाचा आढावा. त्यामध्ये टीबी पेशंटला मोफत आहार, रक्तदान शिबीर, विद्यार्थ्यांना श्रवण यंत्र, वृक्षारोपण वाटप, भाविकांना अन्नदान वाटप, महिला सन्मान सोहळा, आदर्श शिक्षक पुरस्कार असे अनेक कार्याचा आढावा यामध्ये आहे. यासाठी अमोल भुरे यांचे सहकार्य लाभले. यावेळी स्वामी, धनाप्पा शेटे, सिंधुताई देशमुख, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राहुल वाणी, सचिव विजयकुमार दिवाणजी, नागनाथ सोनवणे, माणकोजी ताकभाते, अजय तिवारी, सागर घंटे, सुनील नवले, गणेश सातारकर, सायरा मुल्ला, रेखा विधाते, कोमल वाणी, सुजाता अंधारे, रेखा सरवदे, माधुरी वाणी, पुजा नवले,अनुसया अगलावे,चरण परदेशी, सादिक शेख उपस्थित होते.

# कृषी ज्ञान आत्मसात करुन प्रयोग करा

## डॉ. अविनाश पोळ : करमाळ्यात कमलाई कृषी प्रदर्शनाला उदंड प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२८ डिसेंबर-**
१५ ते २० देशांतून भ्रमंती करून ज्ञानसंग्रह करणारे राहुल रसाळ आणि गेल्या ५० वर्षापासून केळी क्षेत्रामध्ये काम करणारे जाचक कुटुंबीय ही ज्ञानाचे विद्यापीठे असून करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी हेच ज्ञानाचे दालन खुले करण्यासाठी आज राहुल रसाळ आणि कपिल जाचक यांना कमलाई कृषी प्रदर्शनमध्ये निमंत्रित केले आहे. शेतकऱ्यांनी कृषी ज्ञान आत्मसात करुन प्रयोग करावे असे आवाहन पाणी फाउंडेशनचे मार्गदर्शक डॉ. अविनाश पोळ यांनी केले.

यावेळी कळस कृषी प्रदर्शनाचे प्रमुख वैभव वाकचौरे, कपिल चाचक, राहुल रसाळ, तहसीलदार शिल्पा ठोकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील, पोलीस निरीक्षक विनोद घुगे, पाणी फाउंडेशन चे रवींद्र खोमणे, विभागीय समन्वयक संतोष शिंनगारे,



सुखदेव भोसले, विक्रम फाटक,उमेद चे योगेश जगताप,प्रा.लक्ष्मण राख आदी उपस्थित होते.

कपिल जाचक म्हणाले की, जळगाव पाठोपाठ करमाळा तालुका हा आता केळीचा समुद्र बनला आहे. तो एक्सपोर्टचा समुद्र बनलेला आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांनी अधिकाधिक केळी एक्सपोर्ट होण्याच्या दृष्टीने लागवडीचे नियोजन केले पाहिजे. पारंपरिक पद्धतीने केळी लागवड न करता ती जोड ओळ या पद्धतीने केली पाहिजे. त्याचा फायदा सूर्यप्रकाश मिळण्यासाठी होतोच. त्याचबरोबर अंतर मशागत करणेही सोपे जाते. राहुल रसाळ म्हणाले की, गेले २० वर्षापासून डाळिंब या पिकांची लागवड आम्ही सातत्याने करत आहोत. हे करत असताना यामध्ये आतापर्यंत कधीही फेल गेलेलो नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे या पिकाला खत आणि पाणी देण्याच्या वेळा व फवारणी करण्याची वेळही आम्ही काटेकोरपणे पळत आलेलो आहोत. फवारणीसाठी जे पाणी आपण वापरतो त्यामध्ये क्षार नसले पाहिजेत जर त्या पाण्यामध्ये अधिक क्षार असतील तर औषधाची मात्रा लागू होत नाही. फवारणी करत असताना तापमान ४० पेक्षा अधिक असेल तर आपल्या फवारणीतील ५० टक्के खत हे बाष्पीभवनद्वारे उडून जाते.

वैभव वाकचौरे म्हणाले की, पहिल्याच वर्षी कमलाई कृषी प्रदर्शनाला चांगला प्रतिसाद शेतकऱ्यांनी दिलेला आहे. त्यामुळे पुढील वर्षी प्रात्यक्षिकयुक्त कृषी प्रदर्शन भरवावे त्यामुळे शेतकऱ्यांच्या ज्ञानामध्ये अधिकची भर पडेल.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सोलापूर जिल्हा विभागीय समन्वयक सत्यवान देशमुख यांनी केले तर आभार कुंभारगाव ॲग्रो चे महेंद्र देशमुख यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. सुजाता भोर यांनी केले.

### यांचा करण्यात आला सन्मान

चेंज मेकर पुरस्कार देऊन तालुक्यातील १० महिला गट व विक्रमी उत्पन्न घेणाऱ्या २ शेतकऱ्यांचा करण्यात आला. यात महालक्ष्मी महिला शेतकरी गट साडे, अन्नपूर्णा महिला शेतकरी गट पोटेगाव, संघर्ष महिला शेतकरी गट कोर्टी, जिजाऊ महिला शेतकरी गट फिसरे, जिजाऊंच्या लेकी महिला शेतकरी गट सरपडोह, मदार महिला शेतकरी गट घोटी, कुटुंब महिला शेतकरी गट कुंभारगाव, क्रांती ज्योती महिला शेतकरी गट शेलगाव (क), राजमाता महिला शेतकरी गट वीट, कृषी क्रांती महिला शेतकरी गट हिसरे. वैयक्तिक पुरस्कार : राहुल राऊत (कुंभारगाव) एकरी तूर १८.२० क्विंटल, अक्षय शेंडे (घोटी) एकरी मका ४५ क्विंटल.

# कॅनॉलद्वारे रब्बी पिकांना पाणी सोडा

**माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. २८ डिसेंबर-**
बोरी धरण पूर्ण क्षमतेने भरले असल्याने,तसेच रब्बी पिके पाण्याअभावी जळून जात आहेत अशा बिकट अवस्थेत पाठबंधारे विभागाने ताबडतोब कॅनॉल द्वारे रब्बी पिकांना पाणी द्यावे अशी मागणी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी पाटबंधारे विभागाकडे केली आहे.

डिसेंबर संपला आजून कॅनॉल ची दुरुस्ती, डागडुजी पण या विभागाने केली नाही, सर्व रब्बी पिके कोमेजून माना टाकत आहेत, आगोदर च शेतकरी अस्मानी, सुलतानी संकटात सापडला असताना पाटबंधारे विभाग मूग गिळून गप्प का आहे, धरण उशाला अन कोरड घश्याला अशी शेतकऱ्यांची अवस्था झाली असताना अधिकारी बघ्याची भूमिका का घेत आहेत, कोणालाच कळत नाही,येत्या ८ दिवसात सर्व कॅनॉल ची स्वछता, साफसफाई, लिकेज दुरुस्त करून प्रशासनाने शेतकऱ्यांना पाणी द्यावे अशी जोरदार मागणी त्यांनी केली आहे.



दरवर्षी या दिवसात पाणी सोडले जाते, धरण भरूनही अधिकारी पाणी सोडण्यावर गप्पच आहेत, आठ दिवसांपूर्वी ही अणदूर मधील शेतकऱ्यांनी पाणी सोडण्याची मागणी निवेदनाद्वारे प्रशासनाकडे केली होती.

सध्या रब्बी हंगामातील पिके उदाहरणार्थ ज्वारी, गहू, हरभरा ही पिके जोमात आहेत सध्या दिवसभर कडक ऊन व रात्री जोरदार थंडी या मुळे पाण्याअभावी ही पिके धोक्यात आली आहेत बोरी धरण पूर्ण क्षमतेने भरले असून पाणी असताना पण पाणी सोडण्यासाठी प्रशासन कोणाची वाट बघत आहे हे कळत नाही,सर्व शेतकरी जी पाणीपट्टी आहे ती भरण्यास तयार आहेत तरी पाटबंधारे विभागाने त्वरित पाणी सोडले पाहिजे आता तर माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी मागणी केल्याने प्रशासन यावर कोणती भूमिका घेणार हे येत्या काही दिवसात कळेल. बोरी धरण भरल्यावर कॅनॉलद्वारे पाणी सोडले जाते. पाण्याची पातळी बघून २ ते ३ वेळा पाणी उन्हाळ्यापर्यंत सोडले जाते. परंतु या वर्षी पाणी सोडले नाही. पाणी सोडण्याची आतुरतेने वाट शेतकरी बघत आहेत. अगोदरच दुष्काळाच्या गडद छायेत शेतकरी असताना बोरी धरणातून पाणी सोडले जावे अशी जोरदार मागणी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी केली असून शेतकऱ्यांच्या कठीण समस्या चव्हाण हे स्वतः एक शेतकरी असल्याने त्यांना माहीत आहेत.

### कॅनॉलची दुरुस्ती सुरु

आता वेळेवर पिकांना प्रशासनाने पाणी सोडल्यास रब्बी पिके शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न देऊन जातील म्हणून शेतकऱ्यांचे कैवारी मधुकरराव चव्हाण यांनी ही रास्त मागणी प्रशासनाकडे केली असून प्रशासनाने पण आता वेळ न घालवता ताबडतोब पाणी सोडावे अशी मागणी जोर धरू लागली आहे. अशातच मैलारपूर खंडोबा मंदिराजवळ प्रशासनाने कॅनॉल दुरुस्ती चालू केली आहे. म्हणजे लवकरच पाणी सोडण्याची तयारी प्रशासन करीत आहे अशी माहिती खात्रीलायक सूत्रांकडून मिळाली आहे



## 'आर्या' विद्यार्थ्यांची सिद्धेश्वर कृषी औद्योगिक प्रदर्शनास भेट

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २८ डिसेंबर-**
विठ्ठल प्रतिष्ठान (टें) संचालित व महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी संलग्नित आर्या कृषि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सिद्धेश्वर कृषि औद्योगिक प्रदर्शन २०२४ ला उत्स्फूर्त भेट दिली.

या प्रदर्शनात दुग्धोत्पादन, रेशीम पीक, मधुमक्षिका पालन, वर्टीकल फार्मिंग, आधुनिक कृषी अवजारे, खते, औषधे, बी-बियाणे, यंत्रसामग्री, ट्रॅक्टर्स, सिंचन प्रणाली, फलोत्पादन, पॅकेजिंग, साठवणूक, बायोटेक्नॉलॉजी, टिशू कल्चर, पाणी व्यवस्थापन, ऑटो फार्मिंग टेक्नॉलॉजी, सौर ऊर्जा, पशुखाद्य व औषधे, डेरी उपकरणे, पोल्ट्री सोल्यूशन्स आणि कृषी अर्थसाह्य यासंबंधी माहिती व प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांना अनुभवायला मिळाली. विद्यार्थ्यांनी प्रदर्शनातील विविध स्टॉल्सना भेट देऊन कृषी क्षेत्रातील अद्ययावत तंत्रज्ञान आणि नवनवीन पद्धतींवर आधारित माहिती घेतली. या भेटीद्वारे त्यांच्यात आधुनिक कृषीविषयक आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत झाली असून अभ्यासक्रमाला पूरक असा हा अनुभव ठरला आहे. सदर सहलीचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन उबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या भेटीत प्रा. संदीप मुरूमकर, प्रा. ज्ञानेश्वरी झोळ व कुमार शिंदे यांनी सहभाग घेतला.

## करमाळ्यातील १७ अंगणवाड्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२८ डिसेंबर-**
भारताचे माजी पंतप्रधान आदर्श संसदपटू अटलबिहारी वाजपेयी राजकारणात चार दशक सक्रीय होते.असे मत भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष शशिकांत पवार यांनी व्यक्त केले. ते माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या शंभराव्या जयंतीनिमित्त करमाळा शहरातील १७ अंगणवाड्यांमधील मुला- मुलींना साहित्य वाटप कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते.

यावेळी पांजरपोळ गोरक्षण संस्थेमध्ये गाईंना चारा देण्यात आला. अंगणवाडीमध्ये साहित्य वाटप संजय घोरपडे, नगरसेवक संजय सावंत, नगरसेवक महादेव फंड, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब कुंभार, सोशल मीडियाचे नितीन कांबळे, भाजपा करमाळा तालुका संयोजक सुप्रिया नितीन कांबळे, किसान मोर्चा जिल्हा सरचिटणीस नरेंद्रसिंह ठाकुर, व्यापार आघाडी जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब होसिंग, दलित सेना जिल्हाध्यक्ष लक्ष्मणराव भोसले, रासप जिल्हा सरचिटणीस अंगद देवकते, श्याम सिंधी, दिनेश मडके, दयानंद बंडगर, ॲड. प्रशांत बागल, प्रमोद फंड, प्रदीप देवी, निलेश जोशी, मनोज कुलकर्णी, विकास गाडे, सतीश भिसे, श्रीकांत ढवळे, अलीम बागवान, सुजित क्षीरसागर, पत्रकार अलीम शेख, मनोहर बुऱ्हाडे, किसन कांबळे, महेशकुमार वैद्य, महेश शहाणे आदी उपस्थित होते.



# महाकुंभमेळ्यासाठी साडेतीन हजार थाली, थैली

## अक्कलकोट निसर्ग सेवा फाउंडेशनचा पुढाकार; सर्वस्तरातून कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२८ डिसेंबर -**
उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे १४४ वर्षांनी होणाऱ्या महाकुंभमेळातील प्लास्टिक व घनकचरा मुक्त करण्यासाठी अक्कलकोट निसर्ग सेवा फाउंडेशन वतीने सोलापूर जिल्ह्यात सर्वात जास्त निधी संकलन करून साडेतीन हजारांपेक्षा जास्त स्टील ताट, पिशवी जमा करून जिल्ह्यात आदर्श निर्माण केल्या असल्याची माहिती सोलापूर जिल्हा पर्यावरण धार्मीक गतिविधिचे प्रमुख प्रवीण तळे यांनी दिली.

अक्कलकोट येथे श्रीमनिप्र डॉ. अभिनव बसवलिंग महास्वामिजी संस्थान तुप्नीन मठ नागणसूर, श्रीमनिप्र प्रभुशांत महास्वामी, प.पूज्य अण्णुमहाराज समाधी मठ यांच्या दिव्यसानिध्यात सन्मान सोहळा झाला. याप्रसंगी पोलिस निरीक्षक महेश स्वामी, बाळासाहेब मोरे, ॲड. शरद फुटाणे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष मल्लिनाथ साखरे, अजित कोठारी, वीरशैव लिंगायत महिला मंडल अध्यक्ष मलम्मा पसारे, महानंदा उडचाण, उपस्थित होते.



अक्कलकोट तालुका उमेद महिला बचत गटने १,१०१ ताट-पिशवी, आमदार सचिन कल्याणशेट्टी ५०१ ताट-पिशवी, अन्नछत्र मंडळ २५० ताट-पिशवी, बसनिंगप्पा खेडगी २०१ ताट-पिशवी, श्री वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थान १०१ ताट -पिशवी, समाधी मठ २१८ ताट-पिशवी, श्री स्वामी समर्थ विसावा कट्टा १०८ ताट-पिशवी, अक्कलकोट कोळी महासंघ १०१, विजयकुमार पाटील ५२, वीरशैव महिला मंडळ ५१, ऋषी लोणारी २५, व्यापारी संकुल ५१, प्रफुल्ल इचगे ७५, शंकर आलोणे १५, राजश्री कलशेट्टी १५, शिर्के ज्वेलरी २५, मंगरुळे प्रशाला ५१, शंकर आलोणे १५ ताट-पिशवी दिल्या आहेत. यावेळी महेश वागदरे, सुनील बिराजदार, सुशील हिरस्कर, संदीप कटकदौंड, विद्याधर गुरव, मल्लम्मा पसारे, संतोष वग्गाले, पत्रकार बसवराज बिराजदार, लायन्स क्लब माजी अध्यक्ष शिरीष पंडित, गुंडू येळमेली, धुळप्पा बजे आदींनी परिश्रम घेतले. बाबू रामदे, श्रीकांत जिड्डमनी, स्वामीनाथ आलदी, शिवानंद पाटील, प्रसन्न हत्ते, वैशाली लोकापुरे, सुवर्ण साखरे, भिमराव साठे, राचप्पा वागदरे, तम्मा शेळखे, दत्तकुमार साखरे, बाबू रामदे, राजश्री कलशेट्टी, सुवर्ण बिराजदार, प्रमोद लोकपुर, तात्या लक्ष्मण समाने, स्वामीनाथ धनशेट्टी, एम. बी. पाटील, शिवाजी चौगले उपस्थित होते. विद्याधर गुरव यांनी सूत्रसंचालन केले तर आनंद खजुरगी स्वागत केले. प्रवीण तळे प्रास्ताविक केले आणि अभिजित लोके आभार मानले.

### उमेदचा जिल्ह्यात आदर्श

पंचायात समिती उमेद महिला बचत गटाचे अक्कलकोट तालुका व्यवस्थापक आनंद प्रकाश मोरडे यांच्या नेतृत्वाखाली संघटना अध्यक्ष श्रीमती धूंडवा मदरी, संघटना सचिव बिसमिल्ला जमादार यांनी महिला बचत गटाच्या माध्यमातून सुमारे एक लाख अकरा हजार रुपये निधी संकलन करून प्लास्टिक व कचरा मुक्तीसाठी एक हजार थाली व एक हजार थैली जमा करून तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यात आदर्श निर्माण केल्या बद्दल सन्मान करण्यात आला.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला स्पर्धेत तन्वी खडके जिल्ह्यातुन प्रथम




**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२८ डिसेंबर -**
अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला हेलस व मनस फाउंडेशन जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठवाडा विभागीय कथाकथन स्पर्धा २०२४ किशोर गटामध्ये छत्रपती हायस्कूलची विद्यार्थिनी तन्वी अशोक खडके हिने विभागात तिसरा क्रमांक व धाराशिव जिल्ह्यातुन प्रथम क्रमांक पटकावला आहे. स्मशानभूमीत भूमीत खाल्लेली भाकर कथेचा विषय घेऊन त्याने सुंदर मांडणी केल्याने प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ व रोख पाचशे रुपयांचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. सदरील स्पर्धा ही जिजाऊ ज्ञानतीर्थ विद्यापीठ परभणी येथे संपन्न झाली. या यशाबद्दल तन्वीचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.



### संक्षिप्त वृत्त...

#### रुपामाता दिनदर्शिका पुस्तीकाचे अ‍ॅड. व्यंकटराव गुंड यांच्या हस्ते उद्घाटन

**धाराशिव, दि.२८ डिसेंबर -**
रुपामाता अर्बन को ऑप क्रेडीट सोसायटी लि उस्मानाबाद व रुपामाता मलटीस्टेट को ऑप क्री सोसायटी लि उस्मानाबाद यांच्या महिना अखेर संचालक मंडळाच्या सभेमध्ये रुपामाता समूहाचे प्रमुख अ‍ॅड. व्यंकटराव गुंड यांच्या हस्ते रुपामाता दिनदर्शिका पुस्तीकाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी चेअरमन शंकर गाडे, व्हा. चेअरमन अमोल गुंड, संचालिका गंगुबाई चौधरी, रुक्मीन पवार, कस्तुराबाई जाधव, वैशाली गाजरे, संचालक संदीपान गुंड, रुपामाता अर्बन बँकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी सत्यनारायण बोधले, रुपामाता मलटीस्टेट संस्थेचे मुख्यकार्यकारी अधिकारी मिलिंद खांडेकर व इतर सभासद उपस्तीथ होते.

#### संस्कार गॅस सर्विसेसचे उद्घाटन

**जळकोट, दि.२८ डिसेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथे मुंबई-हैदराबाद या राष्ट्रीय महामार्गावर संतोष अंगुले यांनी नव्याने सुरू केलेल्या स्वयंरोजगाराच्या माध्यमातून संस्कार गॅस सर्विसेस या नव्या व्यवसायाचे उद्घाटन करण्यात आले. संस्कार गॅस सर्विसेसचे उद्घाटन भारतबाई उमराव अंगुले व सरपंच गजेंद्र पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष श्रीनिवास पाटील, जितेंद्र कदम, विश्वास भोगे, शिवराम कदम, शंकरराव भारत गॅसचे नारायण अंगुले, अंकुश अंगुले, ओमकार अंगुले, संस्कार अंगुले, मनोज गंगणे, नामदेव हिराळे, आनंद आगलावे, संतोष हिराळे, ईश्वर आगलावे, गणेश हिराळे, शंकर आगलावे, लक्ष्मण हिराळे, अनिल आगलावे, रघुनाथ कांबळे, शुभम सूर्यवंशी, प्रदीप सलगरकर, विठ्ठल भोगे, सचिन हासुरे, अमोल कदम, सिद्धू स्वामी तुकाराम बंडगर, सलीम तांबोळी, झापर नुरसे, उषा अंगुले, आरती आगलावे, शुभांगी आगलावे, अंजली आगलावे, राजश्री अंगुले, भाग्यश्री अंगुले, अंकिता आगलावे, आदित्य आगलावे, गावकरी उपस्थित होते.

## आनंद वार्ता; रामदऱ्यामध्ये जानेवारीत पाणी येणार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ डिसेंबर -**
मराठवाड्याच्या न्यायहक्काच्या कृष्णा मराठवाडा उपसा सिंचन योजना क्र. २ मधील पाचव्या टप्प्याचे काम अंतिम होत आले आहे. यावर्षी झालेला अधिकचा पाऊस, भूसंपादन प्रक्रियेत जाणीवपूर्वक आणलेले अडथळे व वीज वाहक तारेच्या चोरीमुळे डिसेंबर अखेरीस अपेक्षित असलेली पंपगृहाची चाचणी आता जानेवारीत घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे सिंदफळ तलावातील पाणी तुळजाभवानी देवीच्या चरणी रामदरा तलावात पुढील महिन्यात दाखल होणार असून या कार्यक्रमासह अतिशय महत्वपूर्ण असलेल्या या योजनेच्या पाहणी व आढावा बैठकीसाठी वेळ देण्याची विनंती जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांना केली असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

बुधवार २५ डिसेंबर रोजी जलसंपदा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यां समवेत महत्वाची आढावा बैठक घेण्यात आली. कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाच्या कामाच्या प्रगतीचे तपशीलवार सादरीकरण करण्यात आले. उपसा सिंचन योजना क्र.२ बरोबरच एकूण प्रकल्प कार्यान्वित होण्यास नक्की किती कालावधी लागणार, नेमक्या कोणत्या अडचणी अजूनही आहेत आणि त्या दूर करण्यासाठी काय उपाययोजना करायला हव्यात याबाबत सविस्तर चर्चा झाली. कालमर्यादा निश्चित करून प्रत्येक शिल्लक काम पुर्ण करण्याबाबतचा जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना तक्ता देण्यात आला असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत उपसा सिंचन योजना क्रमांक २ चे काम सध्या मोठ्या वेगात सुरू आहे. यावर्षी अपेक्षेपेक्षा अधिकचा पाऊस झाल्याने तसेच भूसंपादन प्रक्रियेत जाणीवपूर्वक आणलेले अडथळे व वीज वाहक तारेची २ वेळा झालेली चोरी यामुळे यापूर्वी निर्धारित केल्यानुसार डिसेंबर अखेरीस चाचणी घेता आली नाही. या बाबींवर आता तोडगा काढण्यात आला असून जानेवारीत टप्पा क्रमांक ५ ची चाचणी घेण्यात येणार आहे. पाचव्या टप्प्याच्या चाचणीसह, या महत्वपूर्ण प्रकल्पाची पाहणी व आढावा बैठक घेण्यासाठी जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांना वेळ देण्याची विनंती करण्यात आली आहे.

कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाच्या टप्पा क्र.२ अंतर्गत एकूण ५ पंपगृह आहेत. यापैकी टप्पा क्र. २, ३ व ५ मधील बहुतांश कामे पूर्ण झाली आहेत. टप्पा क्र. १ व ४ मधील ही ७५ टक्क्यांहुन अधिक कामे पूर्ण झाली आहेत. आपल्या जिल्ह्यासाठी अत्यंत महत्वपूर्ण असलेला हा प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने टप्पा क्र.१ व ४ मधील कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याबाबत संबंधित कंत्राटदारांना सूक्ष्म नियोजन करून त्याप्रमाणे काम करण्याच्या सूचना दिल्या आहेत. कामाचा नियोजित आराखडा जाणून घेत स्थापत्य, विद्युत व यांत्रिकी विभागाच्या अधिकारी आणि कंत्राटदरांनी सु-समन्वयाने नियोजनानुसार काम पूर्ण करण्याबाबत सूचना केल्या आहेत. भूसंपादनाबाबत असलेल्या अडी-अडचणी प्राधान्याने दूर करण्याबाबत सोलापूर आणि पुणे जिल्हाधिकारी यांना सूचना करण्यात आल्या आहेत आणि सर्व भूसंपादन प्रकरणे निकाली काढणेबाबत कालबद्ध कार्यक्रम निश्चित करून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश दिले असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

### जिल्हाधिकारी घेणार पंधरा दिवसाला आढावा : आमदार पाटील



बैठकीत झालेल्या चर्चेनुसार व सादर केलेल्या नियोजनानुसार प्रकल्पाचे टप्पा निहाय काम निर्धारित कालावधीत पुर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. प्रकल्पाचे महत्व लक्षात घेवून कामांची टप्पा निहाय प्रगती व वेळोवेळी येणाऱ्या अडचणी सोडविण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांना दर १५ दिवसाला आढावा घेण्याचे सूचित केले आहे.

सदरील बैठकीस अधीक्षक अभियंता वि. ब. थोरात, कृष्णा मराठवाडा बांधकामचे कार्यकारी अभियंता अ. आ. नाईक, सोलापूर यांत्रिकी विभागाचे कार्यकारी अभियंता यु.ई.पेरंपल्ली, उपअभियंता रणदिवे, छत्रपती संभाजी नगर येथील गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन विभागाचे उपअभियंता तांडारे, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभागाच्या टप्पा क्र. ५ चे सहाय्यक अभियंता यो.सु. घुले, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग तुळजापूरचे उपअभियंता पी.यु. मंगरुळे, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग धाराशिवचे उपविभागीय अधिकारी व्ही. एस. पाटील यांच्यासह कंत्राटदार कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

#### माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना खामसवाडीत श्रद्धांजली

**खामसवाडी, दि.२८ डिसेंबर -**
देशाचे माजी पंतप्रधान, जागतिक अर्थतज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांचे नधन झाले. या महान नेत्याच्या निधनाची बातमी सगळीकडे कळल्यावर शेकडो मोबाईलवर श्रद्धांजली स्टेटस पहायला मिळाले. यावरून या महान व्यक्तिमत्वाची समान्यतील ओळख लक्षात येते. खामसवादीमध्ये जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जगदंबा विद्यालय, अभिनवं विद्यामंदिर, वस्तीशाळा, ग्रामपंचायत, विविध कार्यकारी सोसायटी, नेहरू युवा मंडळ सामाजिक संस्था, सिद्धिविनायक बँक, प्रियदर्शनी सार्वजनिक वाचनालय आदी ठिकाणी माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. जिल्हा परिषद शाळेत माजी पंतप्रधान यांनी अर्थमंत्री असताना व जागतिक अर्थव्यवस्था काय हे जगाला दाखवून दिले याबद्दल आठवणीचा उजोळा माहिती देण्यात आली.

## मरण पावलेल्या वासराची पुन्हा शिकार; बिबट्या कॅमेरात कैद

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२८ डिसेंबर -**
कळंब तालुक्यातील मलकापूर शिवारात गुरुवारी रात्री वासराची दहा वाजेदरम्यान शिकार केल्याचा प्रकार घडला होता. सदरील प्रकारानंतर वनविभागने वासरा जवळ ट्रॅप कॅमेरे बसवले होते. प्रत्यक्ष दर्शी लोकांनी तो प्राणी वाघसदृष्य असल्याचे सांगितले असले तरी ट्रॅप कॅमेऱ्यात बिबट्याने पुन्हा शिकार केलेले वासरु घेऊन गेल्याचा प्रकार कैद झाला आहे.

गुरुवारी (ता.२६) कळंब तालुक्यातील मलकापूर येथील शेतकरी विश्वास आनंदराव लोमटे, किरण लोमटे, हेमंत लोमटे शेतात गेले असता हेमंत लोमटे यांचे गायीचे वासरु हिंस्त्र वाघसदृष्य वन्यप्राणी फरफटत घेऊन जात असल्याचे निदर्शनास आल्याने आजुबाजुचे शेतकरी जमा होऊन आरडाओरडा केला. सदरील घटनेची माहिती वनविभाग अधिकाऱ्यांना संपर्क करुन सदरील घटनेची माहिती देताच येडशी अभयारण्याचे वन्यप्राणी वनपरिक्षेत्रपाल ए.डी. मुंडे, वनविभाग भूम परिक्षेत्राचे वनक्षेत्रपाल दीपक गांधले वनरक्षक सतीश साळुंके यांच्यासह सर्व कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन परिसरात टेहळणी करण्यास ज्वारी हे पिक उंच असल्याने रात्रीची वेळ असल्याने ठसे टेहळणी करता येत नसल्याने जमावाला घरी पाठवून आज सकाळी घटनास्थळाचा पंचनामा करुन त्याठिकाणी ट्रॅपकॅमेरे बसवण्यात आले आहेत.

त्या कॅमेऱ्यात शुक्रवारी (ता.२८) पहाटेच्या वेळी वासराची शिकार केलेले वासरु ओढून नेत असताना बिबट्या ट्रॅप कॅमेऱ्यात कैद झाला आहे. गुरुवारी सकाळी पंचनामा करुन ट्रॅप कॅमेरे बसवण्या दरम्यान पायाच्या अस्पष्ट ठस्यावरून तो बिबटया असल्याचा अंदाज वनविभागच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला होता. तो अंदाज ट्रॅप कॅमेऱ्यांनी कैद केला.

ज्वारी पीक मोठे असल्याने लावलेल्या कॅमेऱ्यात बिबट्याचे फोटो अस्पष्ट आले. त्यांच्या अंगावरील खवले पाहता तो बिबट्याच असुन शिकार केलेले वासरु आज ट्रॅप कॅमेरे काढताना बिबट्याने अन्यत्र ओढून नेल्याचे दिसले.

> मलकापूर शिवारात ट्रॅप कॅमेऱ्यात ट्रॅप झालेले फोटो कॅमेरे कमी अंतरावर असल्याने अस्पष्ट असले तरी त्यांच्या अंगावरील खवल्यामुळे तो बिबट्याचं असल्याची खात्री आहे. शिवाय रात्री रामकुंड (ता. वाशी) येथेही लावलेल्या ट्रॅप कॅमेऱ्यात बिबट्या सात वाजेदरम्यान बिबट्या कैद झाला आहे.
>
> **- दीपक गांधले,** वनपरिक्षेत्र अधिकारी भुम.

## धोकादायक खड्ड्यामुळे जीव धोक्यात; जळकोटला बसस्थानक नसल्याने गैरसोय



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२८ डिसेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील मुंबई-हैदराबाद महामार्गावरील जळकोट गावाला बसस्थानक नसल्याने प्रवाशांची प्रचंड गैरसोय होत आहे. वारंवार जनतेतून मागणी होत असताना या प्रश्नाकडे गांभीर्याने दुर्लक्ष केले जात आहे. जळकोट येथील बसस्थानकावर दोन्ही पुलाच्या बाजूला असलेल्या धोकादायक खड्ड्यामुळे जीव धोक्यात येत आहे. परवा एका प्रवाशाचा खड्ड्यात पडल्यामुळे थोडक्यात जीव वाचला.

जळकोट येथे महामार्गाचे काम होण्याअगोदर जिल्हा परिषदेच्या शाळेच्या समोर तत्कालीन खासदार कल्पना नरहिरे यांच्या खासदार निधीतून छोटे बसस्थानक बांधण्यात आले होते. त्यामुळे काही प्रमाणात गैरसो दूर झाली होती. परंतु मुंबई हैदराबाद महामार्गाचे चौपदरीकरण झाल्याने हे बसस्थानक पाडण्यात आले. मुंबई-हैदराबाद महामार्गाचे काम झाल्यानंतर बसस्थानकावर आजूबाजूला असलेली झाडेही तोडल्याने प्रवाशांना कसल्याच प्रकारचा निवारा सध्या नाही. ऊन, वारा व पाऊस याचा सामना करत प्रवाशांना एसटीची वाट पाहत उभारावे लागत आहे. जळकोट बस स्थानकावर नेहमीच प्रवाशांची गर्दी असते. त्यात महिला प्रवाशांची संख्या वाढली आहे. महिला प्रवाशांना बसण्यासाठी जागाच नसल्याने फ्रुट गाड्यांच्या बाजूला आश्रय घ्यावा लागत आहे. मुंबई, पुणे, हैदराबाद आदि शहरातून पहाटे प्रवास करून उतरणाऱ्या प्रवाशांना बसण्यासाठी जागा नसल्याने हॉटेलचा आसरा घ्यावा लागत आहे.

जळकोट बसस्थानकावरील पुलाच्या दक्षिण उत्तर बाजूला मोठे खड्डे असल्याने या खड्ड्यानजीक प्रवासी, महिला व नागरिक थांबत असल्याने प्रचंड धोका निर्माण झाला आहे. अनेकजण या खड्ड्यात पडले आहेत. परवा एका प्रवाशाचा तोल जाऊन खड्ड्यात पडल्याने थोडक्यात जीव वाचला आहे. या प्रकरणाकडे महामार्गाचे प्राधिकरण कार्यालय साफ दुर्लक्ष करत आहे. बसस्थानक व महामार्गाच्या कामासंदर्भात वारंवार तुळजापूर तालुका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन कुंभार यांनी महामार्गाच्या संबंधित कार्यालयाकडे वारंवार मागणी केली आहे. कुंभार यांच्या मागणीवर गतिरोधक करण्यात आले. परंतु बसस्थानकाचा अजून पत्ता नाही. आमदार जगजितसिंह पाटील यांच्या आमदार निधीतून बसस्थानकाचे दोन्ही बाजूला शेड मंजूर झाल्याचे समजते. या कामाला अजूनही सुरुवात झाली नाही. आ. पाटील यांनी जळकोटच्या बसस्थानकाचा प्रश्न मार्गी लावावा. अशी मागणी प्रवासी व नागरिकातून होत आहे.

सध्या तरी वारंवार खड्ड्यात पडण्याचे प्रमाण वाढत आहे. लोकप्रतिनिधी याकडे केव्हा लक्ष देतात. याची चर्चा मात्र ऐकावयास मिळत आहे.

## शहरातील घाटशीळ कार पार्किंग अपुरे; रस्त्यावरच वाहनांची पार्किंगमुळे वाहतूक कोंडी

**काखेत कळसा आणि गावाला वळसा ... पं.स. कार्यालय, तहसील कोर्टाप्रमाणे स्थलांतरित केल्यास शहराच्या मध्यवर्ती भागात होऊ शकते भाविकांसाठी अद्यावत सुसज्ज कार पार्किंग...**




१) शहरात जवळजवळ पाच एकर एरियात असलेले पंचायत समितीचे कार्यालय २) पंचायत समिती कार्यालया शेजारी असलेले कर्मचाऱ्यांची वसाहत घरे मोडकळीस आलेले दिसून येत आहेत. ३) सध्या शहरात असणारे घाटशीळ कार पार्किंग भाविकांच्या वाहनांसाठी अपुरे पडत आहे.

**तभा वृत्तसेवा / सचिन ताकमोघे**
**धाराशिव, दि.२८ डिसेंबर -**
शहरातील अनेक शासकीय कार्यालय नळदुर्ग रोड येथील हंगरगा ग्रामपंचायतीच्या गायरान क्षेत्रात नेहली जाणार असून तुळजापूर शहरातील पंचायत समिती कार्यालय देखील शहराबाहेर नेहल्यास शहरात भाविकांच्या वाहनांसाठी भलेमोठे अद्यावत कार पार्किंग होऊ शकते. शहरात एवढी मोठी जागा असताना भाविकांच्या खाजगी गाड्या पार्किंगचा सतत उद्भवणारा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागू शकतो. प्रशासनाची अवस्था सध्या काखेत कळसा आणि गावाला वळसा मणीप्रमाणे झाली असून शहरात मंदिर शहर विकास प्राधिकरणामार्फत भाविकांना अत्याधुनिक सुविधा पुरवण्यासाठी व्यवस्थित नियोजनबद्ध विकास होऊ शकतो. पण नेते, पुढारी, लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाची ती मानसिकता नसल्याचे दिसून येत आहे.

सध्या पंचायत समितीच्या आणि गटशिक्षण अधिकारी यांचे कार्यालय असणाऱ्या इमारती मोडकळीस आलेल्या दिसून येत आहेत. या इमारतीचे नूतनीकरण करण्याची पंचायत समितीची मागणी असून या इमारती नूतनीकरण केल्या तरीही अधिक वर्ष टिकू शकतील याची शक्यता नाही. सध्या असणाऱ्या इमारतीला गळती लागली असून पावसाळ्यात पावसाचे पाणी कार्यालयामध्ये येत असल्याचे कर्मचारी सांगतात. तुळजापूर शहरातील सर्वच शासकीय कार्यालय शहराबाहेर केल्यास तुळजापूर शहरात तालुक्यातून येणाऱ्या नागरिकांची होणारी गर्दी आणि भाविकांची गर्दी यामुळे नेहमीच होणारी वाहतूक कोंडी बहुतांश प्रमाणात कमी करता येऊ शकते.

कोर्ट, तहसील, ग्रामीण पोलीस ठाणे, राज्य उत्पादन शुल्क असे अनेक कार्यालय शहराबाहेर घेतले असून सुद्धा त्या ठिकाणी अजून दहा एकर जागा शिल्लक असल्याचे समजते.

त्यामुळे या राहिलेल्या दहा एकर जागेत तुळजापूर शहरात असणारे बाकीचेही कार्यालय शहराबाहेर घेतल्यास एकाच ठिकाणी सर्व कार्यालय होतील. सर्व कार्यालय एका ठिकाणी झाल्यास नागरिकांना देखील ते सोयीचे होऊ शकते.

तुळजापूर तालुक्यातून मोठ्या प्रमाणात शासकीय कामासाठी येणाऱ्या नागरिकांच्या वाहनाची गर्दी तसेच कर्मचाऱ्यांच्या वाहनांची मोठ्या प्रमाणात होणारी गर्दी देखील शहरात न होता शहराबाहेर होईल.

त्यामुळे पंचायत समितीसह शहरातील सर्वच कार्यालय शहराबाहेर नेहण्याची मागणी तुळजापूर शहरातील सुज्ञ नागरिक करत आहेत.

### घाटशिळ कार पार्किंगच्या अडचणी...

सध्या शहरात असणाऱ्या घाटशीळ कार पार्किंग नेहमीच भाविकांच्या गाडीने फुल होत असल्यामुळे सोलापूर मार्गे येणाऱ्या गाड्या हडको येथील कार पार्किंगकडे वळवल्या जातात. हे पार्किंग फुल भरल्यास शहरात वाहतूक कोंडी निर्माण होते. पंचायत समिती येथील जागेवर कार पार्किंग केल्यास या पार्किंगवर लोड न येता सोलापूर, नळदुर्ग आणि लातूर या तिन्ही मार्गावरून येणाऱ्या भाविकांच्या गाड्यांची पार्किंगची सोय एकाच पार्किंगमध्ये होऊ शकते.

### पोलीस प्रशासन असमर्थ...

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या अवतीभवती रोडच्या मधोमध भाविक त्यांच्या वाहनांची पार्किंग करतात.त्यामुळे भाविकांना आणि शहरवासीयांना पायी चालत जात असताना देखील कसरत करत जावे लागते. तर टू व्हीलर आणि भाविकांच्या फोर व्हीलर वाहनधारकां मध्ये नेहमीच तू-तू - मैं-मैं होताना दिसून येते. मोठ्या प्रमाणात रस्त्यावर भाविक गाड्या पार्किंग करत असताना देखील पोलीस प्रशासनाकडून केवळ बघ्याची भूमिका घेतली जात असल्याने नागरिक आश्चर्य व्यक्त करतात.

### तर पार्किंग करण्याची गरज भासणार नाही...

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या नवरात्र यात्रेत सलग पंधरा दिवस दररोज लाखोच्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत असतात. लाखोच्या संख्येने येणाऱ्या भाविकांच्या वाहनाची संख्या देखील त्याचप्रमाणे असते. या १५ दिवसांसाठी प्रशासन तात्पुरत्या स्वरूपात इंजिनिअरिंग कॉलेजचे मैदान पार्किंगसाठी वापरते. पंधरा दिवसात शहरात असणारे एकमेव क्रीडा मैदान पूर्णपणे खराब होते. त्यामुळे पंचायत समिती येथील पाच एकर एरियात कायमस्वरूपी पार्किंग केल्यास नवरात्र काळात तात्पुरत्या स्वरूपाचे किमान नळदुर्ग रोडवरील तरी कार पार्किंग करण्याची गरज देखील भासणार नाही.

## संक्षिप्त वृत्त...



### बालविवाह निर्मूलन स्पर्धेत धरित्री विद्यालयाचे यश

**जळकोट, दि.२८ डिसेंबर -**

ज्ञानदीप कलोपासक मंडळ संचलित, धरित्री विद्यालय, आलियाबाद येथे सक्षम बालविवाह निर्मूलन प्रकल्पाअंतर्गत घेतलेल्या विविध स्पर्धेमधील विजेत्यांचा सत्कार समारंभ पार पडला. या उपक्रमांतर्गत निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा व गायन स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. सहभागी विद्यार्थ्यांमधून प्रथम व द्वितीय क्रमांक काढण्यात आले. यामध्ये निबंध स्पर्धेत प्रथम वैष्णवी तुळशीराम चव्हाण, द्वितीय कल्याणी अण्णासाहेब फंड वक्तृत्व स्पर्धेत प्रथम गायत्री शंकर वाघमारे व द्वितीय दिव्या मोहन जाधव, चित्रकला स्पर्धेत प्रथम ज्ञानेश्वर रामचंद्र माळी व द्वितीय करण सुनील पिस्के, गायन स्पर्धेत प्रथम नागिणी रुद्राप्पा हल्ले, द्वितीय राजनंदिनी दयानंद बागल या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. विद्यार्थ्यांना प्रकल्प अधिकारी सक्षम बालविवाह निर्मूलन तथा बालविकास अधिकारी जिल्हा परिषद धाराशिव यांच्याकडून प्रमाणपत्र देण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक सुनील पुजारी यांनी सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार केला. या स्पर्धेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मार्गदर्शन लाभले.



### कळंब येथे राष्ट्रीय ग्राहक दिन सप्ताहनिमित्त पोस्टर प्रदर्शन

**कळंब, दि.२८ डिसेंबर -**

कामगार कल्याण मंडळ गट कार्यालय अंतर्गत केंद्र कळंब येथे ग्राहक दिन २४ डिसेंबर ते ३० डिसेंबर सप्ताह निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.२७ डिसेंबर रोजी ग्राहक संरक्षण कायदा १९८६ तसेच या कायद्यामध्ये वेळोवेळी झालेल्या सुधारणा व ग्राहकाची होणारी फसवणूक टाळावी व यासाठी ग्राहकात जागृती निर्माण व्हावी याविषयीची माहिती मिळावी तसेच आरोग्यविषयक जागृती निर्माण व्हावी यासाठी पोस्टर प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या पोस्टर प्रदर्शन उद्घाटन कार्यक्रमाच्य अध्यक्षस्थानी महादेव महाराज अडसूळ हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माधव सिंग राजपूत, अच्युतराव लोमटे, प्रशांत वेदपाठक, दत्तात्रय कदम, विनायक रामढवे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी माधवसिंग राजपूत यांनी ग्राहक संरक्षण कायदा व यातील तरतुदी तसेच व वस्तू खरेदी करीत असताना घ्यावयाची काळजी याविषयी माहिती दिली व जागो ग्राहक जागो या कार्यक्रमात सर्वांनी सहभाग नोंदवावा असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन महिला केंद्र सहाय्यक संचालिका प्रतिज्ञा वरखेडकर यांनी तर आभार अनुजा कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिज्ञा वरखेडकर, दिनेश गिरी, यशोदा शिंपले, अनुजा कुलकर्णी, वैशाली घाडगे यांनी परिश्रम घेतले.

पवनचक्की कंपनीचे ठेकेदार आणि त्यांनी पोसलेल्या गुंडांना प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा वरदहस्त ! पवनचक्की कंपनीकडून शेतकऱ्यांची पिळवणूक

# धाराशिवची आक्का, आक्काच्या वरचा आका आणि आकाच्या वरचा मेनबोका कोण?

**धाराशिवच्या 'आक्का' निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांच्या भ्रष्टाचाराची खुली चौकशी करण्याची अमोल जाधव यांची मागणी...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२८ डिसेंबर -**

धाराशिवची अक्का निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांची सीडीआर मार्फत चौकशी करा चौकशीतून दूध का दूध पानी का पानी होईल. गोरगरीब शेतकऱ्यांना न्याय मिळेल धाराशिव जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्यांच्या गुंडशाही प्रवृत्तीला कुठेतरी चाप बसला पाहिजे मेसाई जवळगा येथील सरपंचावर हल्ला झाला तसं धाराशिव जिल्ह्यात कोणाचा संतोष देशमुख होऊ नये. आणि अवैध पवनचक्की बंद करा, अशी मागणी शिवसैनिक उद्धव ठाकरे गट अमोल जाधव यांनी दि.२८ डिसेंबर रोजी तुळजापूर येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये सांगितले आहे.

त्यांनी याबाबतीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मुख्य सचिव सुजाता सैनिक पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे महासंचालक संजीव कुमार सिंगल विभागीय आयुक्त गावडे आणि धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मैनक घोष यांना तक्रार दिली आहे. असे पत्रकार परिषदेमध्ये सांगितले. पुढे बोलताना जाधव म्हणाले की, धाराशिव बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच आदरणीय संतोष देशमुख यांची पवनचक्कीच्या अर्थकारणातून हत्या झाल्याने पूर्ण महाराष्ट्र स्तब्ध झाला आहे. तसाच काहीसा प्रकार धाराशिव जिल्ह्यात सुरू आहे. धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर तालुक्यातील मेसाई जवळगा गावातील सरपंचाचे वाहन पवन चक्कीच्या ठेकेदार आणि गुंडांनी पेटवून देण्याचा प्रयत्न केला. बीड जिल्ह्यामध्ये सर्व घटनांचा सूत्रधार हा कोणी आका आहे मात्र धाराशिव मध्ये आमची 'आक्का' म्हणजेच निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव याच मुख्य सूत्रधार आहेत. धाराशिव जिल्ह्यात पवनचक्कीच्या ११ कंपन्या कार्यरत आहेत. त्या कंपन्याचे



अधिकारी हे डायरेक्ट धाराशिवच्या निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना हप्ता देतात. पवनचक्की उभी करताना शेतजमिनीचा औद्योगिक अकृषी परवाना लागतो. तो परवाना देताना निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव या सर्व नियम धाब्यावर बसवून लाखोंची लाच घेऊन नियमबाह्य परवाना देतात. जिल्ह्यात पवनचक्कीचे ठेकेदार मोठ्या प्रमाणात मुरुमाचे उत्खनन करतात. अशावेळी एखादा अधिकारी गौणखनिजावर कारवाई करायला गेल्यास त्याला निवासी उपजिल्हाधिकारी बोलून घेतात आणि त्याला समजावून सांगतात की, हा शासनाचा महत्त्वाचा प्रकल्प आहे. हे नियमित जिल्हाधिकारी कार्यालयाला गौण खनिजचा पैसा भरत असतात. त्यामुळे पवन चक्की वाल्यांवर कारवाई करून त्यांना त्रास देऊ नका. अन्यथा मला तुमच्यावर कारवाई करावी लागेल. अशा स्वरूपाच्या गुंडांना लाजवेल असे धमक्या देत असतात. शोभा जाधव ह्या जिल्ह्याच्या अप्पर जिल्हा दंडाधिकारी या नात्याने जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनवर नियंत्रण मिळवून आहेत. कुठेही कुठल्याही कंपनी किंवा कंपनीचा ठेकेदारांना काहीही अडचण आल्यास निवासी उपजिल्हाधिकारी या डायरेक्ट पोलीस स्टेशनच्या पोलीस अधिकाऱ्याला बोलवून कंपनी वाल्यांना मदत करण्याचे आदेश देतात. त्यामुळे कंपनीचे ठेकेदार आणि त्यांनी पोसलेल्या गुंडांना प्रशासनातील एवढ्या वरिष्ठ अधिकाऱ्याचा वरदहस्त असल्यामुळे ते शेतकऱ्यांना पिळू पिळू घेत आहेत. आणि जो कोणी त्यांच्या विरोधात आवाज उठवेल त्याला सिनेमाला लाजवेल अशा स्टाईलने दहा दहा काळ्या स्कॉर्पिओमध्ये येऊन धमक्या देऊन मारण्याचे काम सुरू आहे. या शोभा जाधव यापूर्वी बीडमध्ये अंबाजोगाई येथे उपविभागीय अधिकारी होत्या. तेथे त्यांनी तलाठ्यांची एक कार्यशाळा घेतली आणि त्या कार्यशाळेमध्ये तलाठयांनी लाज कशी घ्यावी याचे प्रशिक्षण दिल ते महाराष्ट्रभर गाजलं होतं. तसेच त्या कळंब येथे तहसीलदार असताना गोरगरिबांच्या अन्नात त्यांनी माती कालावली होती. त्यांनी गोरगरिबांची तांदूळ गहू यामध्ये घोटाळा केला होता. त्यांच्यावर गुन्हा सुद्धा दाखल झाला होता. उमरगा येथे असताना त्यांनी शासकीय जमीन खाजगी व्यक्तीला विकली होती. त्यामध्ये त्या निलंबित सुद्धा झाल्या होत्या. लातूर येथे असताना त्यांच्या संपत्तीची लाच लुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी सुद्धा सुरू आहे. बीडमध्ये असताना निवडणूकीच्या कामात भ्रष्टाचार केल्यामुळे त्यांची निवडणुकीची विभागीय चौकशी सुद्धा सुरू आहे. तरीसुद्धा धाराशिवचे जिल्हाधिकारी सचिन ओम्बसे यांनी निवडणूक आयोगाला ना हरकत प्रमाणपत्र देऊन अशा भ्रष्ट मॅडमला आरडीसी बनवलं. धाराशिव येथे निवासी उपजिल्हाधिकारी म्हणून आल्यापासून त्यांनी करोडोची माया जमा केली. कर्मचाऱ्यांच्या बदल्या, तलाठ्यांच्या बदल्यां प्रतिनियुक्त यामध्ये २५ हजारापासून १ लाख रुपयापर्यंतचा रेट आहे. फटाका परवाना पन्नास हजार रुपये घेतल्याशिवाय देत यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केलेला आहे. बंदुकीचे लायसन देताना सुद्धा प्रत्येक फाईल मध्ये एक लाख रुपये घेतल्याशिवाय फाईल मंजूर झाल्यावर सुद्धा ऑनलाईन करत नाहीत. निवासी उपजिल्हाधिकारी या पदाला वाहन देय नसताना सुद्धा गौण खनिज मधून खाजगी गाडी लावून त्याच गाडीने धाराशिव येथून सोलापूर आणि त्यांच्या स्वतःच्या घरी जातात.

असे असंख्य भ्रष्टाचार करण्याचे नवनवीन स्रोत त्यांनी शोधले आहेत. धाराशिवचा 'बीड' होऊ नये यासाठी आमच्या जिल्ह्याच्या 'आक्का' असलेल्या निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांना तात्काळ निलंबित करा आणि त्यांनी गैरमार्गाने जमा केलेल्या संपत्तीची फौजदारी गुन्हा दाखल करून खुली चौकशी करावी. अन्यथा आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा शिवसेनेचे अमोल जाधव यांनी दिला आहे.

## सराफ सुवर्णकार फेडरेशनचा मेळावा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२८ डिसेंबर -**

येरमाळा शहरामध्ये दि.२७ डिसेंबर रोजी सराफ व सुवर्णकार व्यवसायासंदर्भात मार्गदर्शनपर मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्या जिल्हाभरातील सराफ व्यापाऱ्यांनी हजेरी लावली होती.

या मेळाव्यामध्ये सराफ व्यवसायातील विविध अडचणी संदर्भात मराठवाडा सराफ सुवर्णकार फेडरेशनचे अध्यक्ष गणेश बेद्रे तसेच कळंब येथील CIT secretary किशोर गोरे, मराठवाडा सुवर्णकार फेडरेशनचे उपाध्यक्ष कृष्णा डहाळे, धाराशिव जिल्हा सराफ सुवर्णकार फेडरेशनचे अध्यक्ष दत्ता माळी, जिल्हा कार्यकारी अध्यक्ष विजयकुमार ईखे, जिल्हा सचिव मयूर जालनेकर, जिल्हा समन्वय समिती अध्यक्ष तानाजी मुंडे, जिल्हा कोषाध्यक्ष सच्चिदानंद पोतदार, कळंब तालुकाध्यक्ष बालाजी बावळे, वाशी तालुकाध्यक्ष दीपक महामुनी व इतर मान्यवर व्यक्तींचे मार्गदर्शन झाले. असे ४० मेळावे पूर्ण मराठवाड्यामध्ये होणार असून याचा सांगता मेळावा धाराशिव येथे होणार आहे असे येरमाळा सुवर्णकार फेडरेशन चे अध्यक्ष विशाल पंडीत यांनी बोलताना सांगितले. या कार्यक्रमाला वाशी, येरमाळा, येडशी, ढोकी, तेर, दहिफळ तसेच परिसरातील सर्व सराफ सुवर्णकार मोठया संख्येने उपस्थित होते.

हा मेळावा यशस्वी होण्यासाठी धाराशिव जिल्हा सराफ सुवर्णकार फेडरेशनचे उपाध्यक्ष विशाल पंडीत, अशोक पंडीत, लिंबराज बारकुल, किरण दिक्षीत, आदेश बोराणा, औदुंबर बारसकर, अक्षय बावळे, संतोष महामुनी बाळासाहेब महामुनी, धनजंय बारकुल यांनी परिश्रम घेतले. कार्यकमाचे सुत्रसंचलन मयुर जालनेकर यांनी तर आभार कृष्णा ढाळे यांनी केले.

## कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयात राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२८ डिसेंबर -**



कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी येथे कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे अंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचे आज रोजी आयोजन करण्यात आले. स्पर्धेचा विषय होता कृत्रिम बुद्धिमत्ता शाप की वरदान या स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण गंभीरे यांनी केले.

यावेळी स्पर्धेचे संयोजक प्राध्यापक अश्विनी नवले, संयोजन समिती सदस्य प्राध्यापक डॉ. पार्थराज क्षीरसागर, प्रा. महादेव उंदरे, प्राध्यापक अशोक पाटील, प्राध्यापक लक्ष्मण धावारे, प्राध्यापक महेश गुरमे, प्राध्यापक व्ही.एस. गुंजाळ उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षक म्हणून विनोद गादेकर, पोपट गोसावी व एस.बी. छबिले यांनी काम पाहिले. या स्पर्धेमध्ये गायकवाड क्षितिजा किरण व चव्हाण नम्रता भाऊराव, बीपी सुलाखे कॉमर्स कॉलेज बार्शी यांनी प्रथम क्रमांक तसेच कोकाटे वैष्णवी दत्ता आणि पठाण सानिया मुजममिल कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी यांनी द्वितीय तर वाघमारे साक्षी धनाजी व सपकाळ तनवी त्र्यंबक शंकरराव पाटील महाविद्यालय भूम यांनी तृतीय क्रमांक मिळाला. या स्पर्धेसाठी प्रथम बक्षीस पाच हजार रुपये, द्वितीय बक्षीस तीन हजार रुपये तर तृतीय बक्षीस दोन हजार रुपये वितरित करण्यात आले. स्पर्धेचा फिरता चषक बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज बार्शी यांनी मिळवला. या स्पर्धेसाठी वाशी कळंब बार्शी भूम येथील स्पर्धाकांनी भाग घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक ए.डी. उंद्रे यांनी केले तर प्राध्यापक विठ्ठल गुंजाळ यांनी आभार मानले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्राध्यापक झेंडे, प्राध्यापक देसाई मुकुंद कोळी, स्वप्निल शेळकांदे, नवनाथ निकम यांनी परिश्रम घेतले.

## साने गुरुजी कथामालेत शंभर विद्यार्थ्यांचा सहभाग

**मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन गौरव...**



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२८ डिसेंबर -**

उमरगा येथील आयएसओ मानांकित मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत जिल्ह्यात द्वितीय आलेल्या जिल्हा परिषद हायस्कूल मध्ये अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला मुंबईकडून आयोजित करण्यात आलेल्या श्यामची आई संस्कार परीक्षेत इयत्ता पाचवी ते दहावीच्या शंभर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

श्यामची आई हे पुस्तक १०० विद्यार्थ्यांनी समज पूर्वक वाचून त्यावर आधारित १०० गुणांची वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी प्रश्नांची परीक्षा घेण्यात आली.

या परीक्षेत सातवी वर्गातील वैष्णवी केदारे या विद्यार्थिनीने १०० पैकी ८५ गुण घेऊन शाळेत प्रथम क्रमांक मिळवला.

श्रावणी भास्कर बनसोडे द्वितीय ८४ गुण, आदित्य त्र्यंबक सगर ८२ गुण, पल्लवी दशरथ पवार ८२ गुण, सृष्टी सतीश बिराजदार ८० गुण, पायल दशरथ पवार ८० गुण, अस्मिता शिवराज भोसले ८० गुण सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशालेचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व पारितोषक देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी शंभर विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या शाळेतील शिक्षिका सरिता उपासे, ममता गायकवाड, सोनाली मुसळे, शिल्पा चंदनशिवे,धनराज तेलंग, सदानंद कुंभार, संजय रूपाजी, बशीर शेख, विद्यानंद सूत्रावे यावेळी उपस्थित होते.

## शिक्षकांचे साहित्य प्रदर्शनामध्ये माध्यमिक गटातून गुरव तालुक्यात प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**कदेर, दि.२८ डिसेंबर -**

भावना वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन संजीवनी मॉर्डन इंग्लिश स्कूल उमरगा येथे आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये उच्च प्राथमिक माध्यमिक आणि शिक्षकांचे वैयक्तिक साहित्य प्रदर्शन गट पाडण्यात आले होते.

त्यामध्ये श्री सिद्धेश्वर विद्यालयातील विज्ञान विषय शिक्षक मनोज कुमार सूर्यकांत गुरव यांनी शासनाने ठरवून दिलेल्या विषयापैकी मायक्रोग्रीन जगातील सर्वात शक्तिशाली अन्न आणि त्याबद्दल माहिती याविषयी उत्तमरीत्या साहित्य प्रदर्शन करून माध्यमिक गटातून उमरगा तालुक्यात येण्याचा बहुमान पटकावला.

या कार्यक्राचे प्रमुख पाहुणे तथा उद्घाटक



उमरगा तालुक्याचे विद्यमान आमदार प्रवीण स्वामी, गटविकास अधिकारी मरोळ, गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार यासह सर्व विस्तार अधिकारी केंद्रप्रमुख उपस्थित होते.

पुढील जिल्हास्तरीय निवडीबद्दल मनोजकुमार गुरव यांचे श्री सिद्धेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. विठ्ठलराव पटणे, सेक्रेटरी विठ्ठलराव बदोले, मुख्याध्यापक राजेंद्र माशाळे,

विद्यालयातील सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या वतीने शाल पुष्पहार देऊन त्यांचे अभिनंदन केले.

# तब्बल आठ महिन्यानंतर आली गुत्तेदाराला जाग

## 'तरुण भारत' ने आवाज उठवताच गुत्तेदाराने स्मशानभूमीचा केला काळोखा दूर...



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२८ डिसेंबर -**

उमरगा तालुक्यातील बलसुर येथे ३१ वर्षानंतर सार्वजनिक स्मशानभूमी बांधण्यात आली आणि या समशानभूमी ला गुत्तेदारांकडून विजेचे पोल रोवण्यात आले होते.

मात्र आठ महिने उलटूनही या विजेच्या पोलला ताराच ओढण्यात आल्या नसल्याने ही स्मशानभूमी बांधल्यापासून अंधाराच्या काळोख्यातच होती.

ही बाब तरुण भारतच्या प्रतिनिधीला समजताच तात्काळ महावितरणच्या अधिकाऱ्याशी संपर्क साधला असता त्यांनी असे सांगितले की या स्मशानभूमीसाठी वीज पुरवठा करण्याकरिता टेंडर द्वारे गुत्तेदाराला काम देण्यात आले आहे.

त्या संदर्भात गुत्तेदाराशी संपर्क साधून तात्काळ काम पूर्ण करून घेण्याचे आश्वासन दिले.

मात्र तरुण भारतच्या प्रतिनिधीने एवढ्यावरच न थांबता गुत्तेदाराशी संपर्क साधून काम का झाले नाही याची विचारपूस केले असता गुत्तेदारांनी तात्काळ दखल घेऊन दोन दिवसातच स्मशानभूमीच्या रोवण्यात आलेल्या पोलवरती तात्काळ तारा ओढून पथदिवे बसवून देण्याचे मान्य करून तब्बल आठ महिन्याच्या प्रतीक्षेनंतर काम पूर्णत्वास नेले आणि या स्मशानभूमीचा काळोखा दूर झाला.

परंतु यापुढे स्मशानभूमीस अद्याप कंपाउंड वॉल घेण्यात आलेले नाही, पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आलेली नाही, तात्पुरता का होईना आसरा ही करण्यात आलेला नाही.

या सगळ्या बाबीकडे नागरिकांची प्रतिक्षा कायम आहे.

**सुखाने मरू द्यावे...**

भूकंपानंतर या उभ्या देशाने कोरोना सारख्या महामारीचा सामना केला. त्यावेळेसही बऱ्याच ठिकाणी स्मशानभूमी नसल्याने किंवा जागा अपुरी पडल्याने सोयीप्रमाणे अंत्यसंस्कार करण्याची वेळ उद्धभवली होती त्याची पुनरावृत्ती होण्याची वाट न पाहता व नागरिकांची गैरसोय दूर करण्याकरिता प्रशासनाने व संबंधित कार्यालयाने अशा योजना प्रभावीपणे राबवून व पूर्णत्वास नेऊन मरणाऱ्याला तर सुखाने मरू द्यावे ही म्हण सार्थ ठरवावी.

तरुण भारत वृत्तपत्रामुळे महावितरणच्या गुत्तेदाराला तात्काळ जाग आली व स्मशानभूमीत गेल्या आठ महिन्यापूर्वी उभ्या केलेल्या पोलच्या डोलाऱ्यास तारा बसवून स्मशानभूमीतील अंधार दूर झाल्याचे समाधान वाटते. तरुण भारतने अशाच सामाजिक प्रश्नांना वाचा फोडावी. तरूण भारतने केलेल्या सहकार्यामुळे मी ग्रामस्थांच्या वतीने आभार व्यक्त करते.

**- सरपंच अश्विनी भोसले**

दैनिक तरुण भारत यांनी सामाजिक कार्यात लक्ष घालून नागरिकांची गैरसोय दूर केली त्याबद्दल त्यांचे मनस्वी आभार. ग्रामपंचायतीने नागरिकांना मुबलक पाणी, गटारी व्यवस्थापन, रस्ते, आरोग्य व शिक्षण या बाबींकडे लक्ष देऊन निधी आणून वेळेत काम पूर्ण करून गुत्तेदारांची मक्तेदारी मोडीत काढून नागरिकांची होणारी गैरसोय दूर करून गावचा सर्वांगीण विकास साधावा हीच अपेक्षा.

**- ॲड. प्रभाकर पाटील**

## खामसवाडीच्या जगदंबा विद्यालयात सेवापुर्ती सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.२८ डिसेंबर -**

खामसवाडी (ता.कळंब) येथील जगदंबा विद्यालयात नवनिर्वाचित संचालक मंडळ वर्षपूर्ती व शाळेचे शिक्षक अनिल काळे यांचा सपत्नीक सेवानिवृत्ती सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

स्व. त्र्यंबकदादा शेळके यांच्या निधनानंतर शाळेत नवनिर्वाचित अध्यक्ष व संचालक मंडळ स्थापन झाले. तर शाळेचे शिक्षक अनिल काळे यांचीपण सेवानिवृत्ती आजच असल्याने हा आगळावेगळा सोहळा शिक्षक, विद्यार्थी, गावातील नागरिक, महिला यांच्या उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमासाठी कळंबचे काँग्रेसचे नेते तथा माजी नगराध्यक्ष पांडुरंग कुंभार, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा गोदावरी केंद्रे हे उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष अशोक शेळके, मुख्याध्यापिका मंदाकिनी सावंत यांनी व शाळेच्या शिक्षक, विद्यार्थी यांनी अनिल काळे व पत्नी यांचा यथोचित सत्कार केला. छडी न मारता विद्यार्थ्यांत मिसळणारा शिक्षक म्हणुन मान्यवरांनी काळे यांचे कौतुक केले.

या कार्यक्रमाला संस्थेच्या संचालिका ज्योती किशोर शेळके, ज्योती सुनील पाटील, कुंदन शिंदे, गावातील महिला तसेच संस्थेचे संचालक मंडळ गणपती यादव, शहाजी शिंदे, सुरेश पाटील, सिद्धिविनायक बँकेचे पालक संचालक बलराम कुलकर्णी, नाना महाजन, आबाराव पाटोळे यांच्यासह गावातील नागरिक, पत्रकार उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आगलावे यानी केले तर आभार सुरवसे यांनी मानले.

# महाराष्ट्रात विकासाचे शहर म्हणून आपल्या उदगीरची ओळख : आ. संजय बनसोडे

## आ. संजय बनसोडे यांच्या संबंधित ठेकेदारास दर्जेदार व वेळेत काम करण्याच्या सुचना...



तभा वृत्तसेवा
उदगीर, दि.२८ डिसेंबर -

मागील पाच वर्षात विकासाची गंगा सर्वसामान्यांच्या दारापर्यंत पोहचवली असुन भविष्यातही उदगीर व जळकोटच्या विकासाची गंगा थांबु देणार नाही. मतदार संघात पर्यावरण पुरक योजना राबवणार असुन शहरातील मलनिसरण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान कार्यक्रमांतर्गत उदगीर शहर भुयारी गटार योजनेसाठी तब्बल ३५० कोटी रुपये मंजूर केले असुन या योजनेच्या पहिल्या टप्प्यातील १६२ कोटीच्या कामाला आज सुरुवात होत असुन सदर काम १८ महिन्यात पूर्ण होईल, जवळपास ९५ कि.मी. भुयारी गटारीचे काम पूर्ण होणार असुन शहरातील रोगराई कमी होवुन उदगीर शहर स्वच्छ सुंदर होणार असल्याने व मागील पाच वर्षाच्या काळात आपण जो भौतिक विकास केल्याने महाराष्ट्रात विकासाचे शहर म्हणून आपल्या उदगीरची ओळख निर्माण झाली असल्याचे मत माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

ते उदगीर शहरातील बोधनगर येथील उदगीर शहर भुयारी गटार योजनेच्या भुमीपुजनाप्रसंगी बोलत होते. यावेळी माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी सभापती सिद्धेश्वर पाटील, समीर शेख, माजी नगराध्यक्ष बस्वराज बागबंदे, उषा कांबळे, सुधीर भोसले, तहसीलदार राम बोरगावकर, न.प.चे अभियंता सुनिल कटके, जिल्हा नियोजन सदस्य प्रा. श्याम डावळे, भरत चामले, रा.काँ. चे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, ता. कार्याध्यक्ष वसंत पाटील, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, भाजपाचे तालुकाध्यक्ष शिवशंकर धुप्पे, शहराध्यक्ष मनोज पुदाले, फैजुखाँ पठाण, धनाजी मुळे, शिवाजी भोळे, बाळासाहेब मरलापल्ले, नजीर हाशमी, अनिल मुदाळे, राजकुमार भालेराव, श्रीरंग कांबळे, नरसिंग शिंदे, शफी हाशमी, नवनाथ गायकवाड, दत्ता पाटील, सनाउल्ला खान, पाशा मिर्झा बेग, मुकशे भालेराव, महिला जिल्हाध्यक्षा उत्तरा कलबुर्गे, अॅड. दिपाली औटे, मधुमती कनशेट्टे, काजल मिरजगावे, वैशाली कांबळे, उषा माने, उर्मिला वाघमारे, हुसना बानो, सुनिता तेलंगे, मंदाकिनी जीवने आदी उपस्थित होते.

> देशाचे माजी पंतप्रधान आणि आर्थिक सुधारणांचे जनक व जागतिक किर्तीचे अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांचे निधन झाल्यामुळे त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन त्यांना श्रध्दाजंली वाहण्यात आली.

पुढे बोलताना आ. संजय बनसोडे यांनी हरातील सांडपाणी व मलपाणी यामुळे होणाऱ्या विविध रोगराई व दुर्गंधी पासून नागरिकांना दिलासा मिळणार आहे. भुयारी गटार योजनेच्या पहिल्या टप्प्यातील काम हे म्हाडा, बोधननगर, इंडियानगर, निडेबन वेस, कपाळे गल्ली, रोकडे हनुमान, चौबारा, गांधीनगर, म.फुलेनगर, संजयनगर, नांदेड नाका, उदय कॉलनी, म. बस्वेश्वर चौक, शहर पोलीस ठाणे, चर्च रोड, आदी भागातुन होणार आहे. दुसऱ्या टप्प्यातील कामाला ही लवकरच सुरुवात करणार आहोत. मागील काळात पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडवला असुन येत्या काळात उदगीर व जळकोटच्या विकासाची गंगा थांबु देणार नाही असे आ. बनसोडे यांनी सांगितले.

मतदार संघातील जनतेचे प्रेम हीच माझी ताकत असुन तब्बल ९३ हजार मतांनी मला मोठे मताधिक्य दिल्याने जनतेचे आभार मानले. भुमीगत गटार योजनेची माहिती प्रकल्प प्रमुख ऋषीकेश बंडगर यांनी दिली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन माजी नगरसेवक अनिल मुदाळे यांनी केले तर आभार नवनाथ गायकवाड यांनी मानले. यावेळी बोधन नगर, म्हडा कॉलनीसह उदगीर शहरातील नागरीक व महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# बिबट्याच्या अफवेने टाका, मासुर्डी शिवार हादरला

## वनविभागाच्या पथकाकडून परिसराची पाहणी...

तभा वृत्तसेवा
औसा, दि.२८ डिसेंबर -

तालुक्यातील टाका व मासुर्डी शिवारात बिबट्याचा वावर असल्याचा व्हिडीओ सोशल मिडियावर या परिसरात फिरत आहे. यामुळे या शिवारातच नव्हे तर या शिवारालगतच्या परिसरातील नागरिक व शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण पसरले. परंतू या भागात फिरत असलेला व्हिडीओ या परिसरातील नसल्याचा खुलासा या भागाची पाहणी करुन वनपरिमंडळ अधिकारी पांडुरंग चिल्ले यांनी केला आहे. तसेच या भागात बिबट्यांचा वावर असल्याचे अद्याप दिसुन आले नसल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले आहे.

धाराशिव जिल्ह्यासह मराठवाड्यातील कांही भागात बिबट्यांचा वावर असल्याच्या बातम्या प्रसिध्द झाल्यानंतर टाका व मासुर्डीतील अफवेनंतर वनविभागाने तात्काळ शोधमोहिम हाती घेतली. या सोशल मिडियावरील अफवेने नागरिकामध्येंच नव्हे तर शेतकऱ्यांमध्ये कमालीची दहशत पसरली. याचबरोबर रब्बी हंगामातील गहू, हरभरा, ज्वारी पिकांना रात्रीच्या पाळीत पाणी देण्यासाठी काया करावे याची चिंता भेडसावत होती. याचबरोबर शेतात गोठे आसलेल्या शेतकऱ्यांना बिबट्यांच्या भितीमुळे सायंकाळी दुधाळ व बैलजोडी दररोज घराकडे आणावी लागत होती. बिबट्याच्या अफवेचे लोन चार दिवसात या परिसरातील प्रत्येक नागरिकापर्यंत पोहंचल्याने या भागातीला शिवार दिवसाही ओस पडू लागला. यामुळे या भागातील शेतीची कामे खोळंबली. तसेच मजुरांच्या हाताला काम मिळेना म्हणुन उपासमारीची वेळ आली. या अफवेची माहिती मिळताच वनक्षेत्र अधिकारी डि.एम. मोटे यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाच्या चमूने पाहणी केली. मात्र बिबट्या चा वावर असल्याच्या पाऊल खुणा, केस किंवा विष्टा आढळून आली नाही. हि केवळ अफवा असून अशा प्रकारे अफवा पसराऊन शेतामध्ये चोऱ्या करण्याचा हेतू ठेवून अशा अफवा जाणीवपूर्वक पसरविण्याचा प्रयत्न करण्याचा हेतू नाकारता येत नाही. या अफवेमुळे शेतकरी शेतांमध्ये जाणार नाहीत. याचा गैरफायदा घेण्याचा हेतू दिसून येतो.



शेतकरी व नागरिकांनी सोशल मीडियावर येणारे व्हिडिओची सत्यता पडताळून पाहावीअसे आवाहन वनपरिमंडळ अधिकारी पांडुरंग चिल्ले यांनी केले आहे.

# पे टू पे सोशल फाउंडेशनतर्फे लग्न समारंभात भेटवस्तू प्रदान

तभा वृत्तसेवा
जळकोट, दि.२८ डिसेंबर -

पे टू पे सोशल फाउंडेशनच्या सामाजिक दायित्वमधून बेटी पढाव बेटी बचाओ या उपक्रमांतर्गत जळकोट व परिसरातील नळदुर्ग, चिकुंद्रा, गुंजोटी व मुरूम येथील बेटी पढाव बेटी बचाव या योजनेत सहभागी झालेल्या लाभार्थी मुलींना लग्न समारंभात भेटवस्तू प्रदान करण्यात आले.

पे टू पे हे सोशल फाउंडेशन असून, देशभरात बेटी पढाव बेटी बचाओ या अंतर्गत मुलींचा जन्मदर वाढावा. यासाठी मुलगी जन्माल्यापासून ते विवाह पर्यंत कमी रकमेवर हे फाउंडेशन लाभ देते. आत्तापर्यंत हजारो मुलगी असलेल्या कुटुंबांनी लाभ घेतला आहे. तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील काशिनाथ सगर यांची कन्या स्वाती हिच्या विवाहप्रसंगी सिलिंग फॅन देण्यात आले. यापूर्वीही जळकोट येथील एका विवाह सोहळ्यात प्रत्यक्ष धनादेश देण्यात आला होता. नळदुर्ग या ठिकाणी दोन विवाह समारंभात भेटवस्तू प्रदान करण्यात आले तर चिकुंद्रा येथे दोन, गुंजोटी येथे दोन तर मुरूम येथे दोन विवाह समारंभात भेटवस्तू प्रदान करण्यात आले.

जळकोट येथील कार्यक्रमात पे टू पे सोशल फाउंडेशनचे सोलापूर व धाराशिव एरिया मॅनेजर महेश डोंगरे, अनिल छत्रे, मेघराज किलजे, शिवानंद नाटेकरी, भाग्यश्री पवार, भाग्यश्री चित्रे, संजीवनी बेडगे, काशिनाथ सगर आदि उपस्थित होते.

# लातूर ते औराद शहाजानी हायवेची पथकाची लोदग्यापर्यंतच पाहणी

## निलंगा तालुक्यातील शेतकरी, नागरिकांनी उपविभागीय अधिकारी शरद झाडके यांच्याकडे मांडल्या व्यथा...

### तात्काळ उपाययोजना नाही झाल्यास शेतकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

तभा वृत्तसेवा
निलंगा, दि.२८ डिसेंबर -

लातूर जहिराबाद हायवेवरच्या अपुर्ण कामाच्या विरोधात औसा तालुक्यातील लोदगा गावचे सरपंच पांडुरंग गोमारे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण केल्यामुळे औराद ते लातूर कामाची पडताळणी करण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर घुगे यांनी समिती तयार करून सदरील रस्त्याचा अहवाल देण्याचे आदेश काढल्याने समितीने गुरूवार दि.२६ डिसेंबर २०२४ रोजी लोदगा तालुका औसा इथपर्यंत च पाहणी केली. व समिती पाहणी करण्यासाठी येणार आहे म्हणून वाट पाहणाऱ्या निलंगा तालुक्यातील शेतकऱ्यांची निराशा झाली. निटुर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सुरेंद्र धुमाळ यांनी निलंगा उपविभागीय अधिकारी शरद झाडके यांच्याशी चर्चा करून निलंगा तालुक्यातील पानचिंचोली ते औराद शहाजानी पर्यंतच्या शेतकऱ्यांच्या व वाहनधारकांच्या समोरील अडचणी मांडल्या.

लातूर-जहिराबाद हायवेवर चे काम गुत्तेदारांने अतिशय निकृष्ट दर्जाचे केले असुन अनेक कामे अपूर्ण ठेवली आहेत. रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले असून, रस्त्याच्या मधोमध भेगा पडल्या आहेत, दुभाजकात व रस्त्याच्या कडेची काटेरी झुडपे रस्त्यावर आलेली आहेत.

शेतकऱ्यांना महामार्गावर येण्यासाठी रस्ता नाही, रस्त्याच्या दोन्ही बाजूने नाली नसल्याने पाणी शेतात थांबत आहे व रस्ता जंपिंग झाल्याने अनेक अपघात होत आहेत. यासह अनेक समस्याची सोडवणुक प्रशासनाने लवकरात लवकर करावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.




तात्काळ उपाययोजना नाही झाल्यास आंदोलनाचा इशारा यावेळी शेतकऱ्यांनी दिला.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेंद्र धुमाळ, तुळशीदास साळुंके, बाबासाहेब पाटील, ज्ञानेश्वर पिंड, दत्तात्रय पिंड, राजन साळुंके, बबन चामे, महंमद शेख, बालाजी पिंड, प्रदिप पिंड, अविनाश कुलकर्णी, अण्णाराव पिंड, नारायण चामे, संभाजी राजे आदींसह निटूर परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अपघातग्रस्त विद्यार्थ्यांची सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्याकडून विचारपूस

तभा वृत्तसेवा
चाकूर दि.२८ डिसेंबर -

चाकूर तालुक्यातील शिवणखेड (बु.) येथील शैक्षणिक सहलीसाठी कोल्हापूरला जाणाऱ्या श्री गणेश विद्यालयातील विद्यार्थ्यांची खाजगी बस उलटल्याची घटना घडली होती.

यावेळी अपघाताची माहिती मिळताच राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी तात्काळ विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची विचारपूस करत उपचार करण्याची सूचना केली होती.त्यानंतर लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर ना. बाबासाहेब पाटील आले असता त्यांनी शाळेला सदिच्छा भेट देत विद्यार्थ्यांची विचारपूस केली. प्रसंगी बालाजी सूर्यवंशी, अनिल वाडकर, इस्माईल पठाण, किशन घुड्डे पाटील, चंद्रकांत वल्लमपल्ले, बालाजी आलापुरे, उमाकांत कलमे, चंद्रकांत कलमे, संदीप शेटे, बिलाल पठाण, सचिन तोरे सह आदी मान्यवर उपस्थित होते.

## ▶▶ क्राईम वृत्त...



### सायली कुलकर्णीचे वादविवाद स्पर्धेत यश

उदगीर, दि.२८ डिसेंबर -

श्रीराम विद्यालय रेणापूर येथे आयोजित मराठवाडास्तरीय वादविवाद स्पर्धेत लालबहादूर शास्त्री विद्यालयातील सायली कुलकर्णी हिने वैयक्तिक गटात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले तसेच आनंदी स्वामी हिने उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केले. एकूण या स्पर्धेसाठी ३४ विद्यार्थ्यांचा सहभाग होता स्पर्धेचा विषय शिक्षणाची खाजगीकरणाकडे होत असलेली वाटचाल असा होता. या विद्यार्थिनीच्या यशाबद्दल स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, कार्यवाह शंकरराव लासुणे, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष सतनप्पा हुरदळे, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, उपमुख्याध्यापक अरुण पत्की, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, पर्यवेक्षक माधव मठवाले, मार्गदर्शक शिक्षिका अनिता येलमटे, अंबिका पारसेवार यांनी अभिनंदन केले. याप्रसंगी पालक उमाकांत कुलकर्णी, प्राजक्ता जोशी तसेच आठवी ते दहावी विभागातील सर्व शिक्षक कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### क्रांतीसुर्य अकडमीचे अजित ढोले यांची ग्रामीण जिल्हाप्रमुखपदी निवड

औसा, दि.२८ डिसेंबर -

युवा कार्यक्रम एवं खेल मंत्रालय भारत सरकारशी संलग्न असलेल्या स्टेअर्स फाउंडेशन च्या वतीने कराटेचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी लातूर ग्रामीण जिल्हाप्रमुख पदी औसा तालुक्यातील प्रशिक्षक अजित प्रभाकर ढोले यांची निवड करण्यात आली आहे. यामुळे जिल्ह्यातील कराटे खेळाडूंना आता जिल्हा, राज्य व राष्ट्रीय कराटे चम्पीयन स्पर्धेत खेळण्याची संधी मिळणार आहे. मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे टूर्नामेंट टेक्निकल डायरेक्टर गणेश मंगल गिरी तसेच कराटे प्रमुख विशाल जाधव, महाराष्ट्र राज्याचे स्पर्धा समिती चेअरमन राजकपूर बागडी यांच्याद्वारे करण्यात आली आहे. मुले, मुली व महिलांना स्वताःचे संरक्षण करता यावे यासाठी या खेळाचा प्रसार व प्रचार करुन खेळाचा दर्जा उंचावून शहर व ग्रामीण भागात खेळाडूंची संख्या वाढविण्यासाठी प्रशिक्षण शिबीर, पंच शिबीर व मुलीकरिता सेल्फ डिफेन्स चे विशेष वर्ग सुरु करण्यात येणार आहेत. अजित ढोले यांच्या निवडीचे सर्वच स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.





### शिवाजी महाविद्यालयात मोफत कोडींग कार्यशाळा संपन्न

उदगीर, दि.२८ डिसेंबर -

सेवा शिवाजी महाविद्यालयात बीसीए, बीएससी कॉम्प्युटर सायन्स व लॉयन्स क्लब लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत कोडींग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्र. प्राचार्य डॉ.आर.एम. मांजरे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सुदर्शन वुंजे, व्याख्याते प्रा. अशोक पांचाळ, डॉ.एस.डी. नीटुरे, डॉ.व्ही.एम. पवार, प्रबंधक बालाजी पाटील, गुरनाळे व्ही.डी. लाडके आर.एम., शेडोळे पी.एम., मोरे एम. बी., शेख झेड.बी., मुरमे ए.बी. यांची होती. यावेळी व्याख्याते अशोक पांचाळ यांनी विद्यार्थ्यांना प्रोग्रामिंग भाषांची ओळख करून दिली. सी, सी प्लस प्लस, जावा अशा उपयुक्त प्रोग्रामिंग भाषांचा परिचय करून दिला. त्यांनी ओम्पायर कोड प्रदर्शित केले. विद्यार्थ्यांना भविष्यात प्रोग्रामिंग भाषा कशा पद्धतीने उपयोगाची पडते याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. मांजरे म्हणाले, विद्यार्थ्यांना कोडींगचे ज्ञान येणे ही काळाची गरज आहे. आज आपल्यासमोर त्यावर खूप छान मार्गदर्शन झाले. त्याचा आपल्याला नक्कीच उपयोग होईल असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. विष्णू पवार यांनी तर आभार प्रदर्शन शेख झेबाझुनी यांनी केले.

# महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक सबलीकरणात पशुसखी प्रशिक्षण दिशादर्शक : डॉ. नंदकुमार गायकवाड

## उदगीर पशुवैद्यक महाविद्यालयात माविम पुरस्कृत पशुसखी प्रशिक्षणाचे उद्घाटन...




तभा वृत्तसेवा
उदगीर, दि.२८ डिसेंबर -

शेळीपालनाशी निगडीत बचत गटाच्या महिलांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी आणि सामाजिक स्तर उंचावण्यासाठी महाविद्यालयामार्फत देण्यात येत असलेल्या प्रशिक्षणातून पशुसखीची क्षेत्रिय भूमिका अधिक धारदार होईल, असे अध्यक्षीय स्थानावरून उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. नंदकुमार गायकवाड यांनी आपले मत प्रकट केले.

प्रशिक्षणाच्या उद्घाटन प्रसंगी माविम लातूरचे सहाय्यक जिल्हा समन्वय अधिकारी दीपक टेकाळे, प्रकल्प सहसमन्वयक डॉ. नरेंद्र खोडे आणि हितन कुऱ्हे, माविम प्रकल्प सल्लागार, लातूर हे उपस्थित होते. डॉ. गायकवाड आपल्या मार्गदर्शनात पुढे म्हणाले की, पशुसंगोपनात महत्वाची भूमिका बजावित असून सुद्धा ग्रामीण महिला विस्तार उपक्रमापासून आणि त्यातून मिळणाऱ्या वैज्ञानिक माहिती, तंत्रज्ञान आणि कौशल्यापासून उपेक्षित राहतात.

त्यांना प्रशिक्षित केले तर नवतंत्राचा प्रसार आणि गोठयातील नवतंत्राचा उपयोग वाढेल. नवतंत्राचा उपयोग केल्यास उत्पादकता आणि उत्पादन वृद्धिंगत होईल. माविम पुरस्कृत प्रकल्पाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाच्या चळवळीत आमच्या महाविद्यालयाला या निमित्य कार्य करण्याची सुवर्ण संधी मिळाली आहे, त्याचा आयोजन समितीने आणि पशुसखीने परिपूर्ण उपयोग करून घ्यावा, असे आवाहन केले. वर्ष २०२३-२४ आणि २०२४-२५ मध्ये लातूर, बीड, नांदेड आणि धाराशिव जिल्ह्यातील एकूण १४५ पशुसखीना प्रथम टप्प्यात प्रशिक्षण पूर्ण करून गेल्या आहेत. त्यापैकी दि.२३ ते २७ डिसेंबर दरम्यान आयोजित या निवासी पहिल्या पाच दिवसीय प्रशिक्षणात लातूर जिल्ह्याच्या विविध तालुक्यातून माविमतर्फे निवडलेल्या ३० पशुसखी महिला सहभागी झालेल्या आहेत.

प्रशिक्षणाच्या आयोजनासाठी प्रशिक्षण समन्वयक डॉ. शरद आव्हाड, तसेच आयोजन समिती समवेत पदव्युत्तर विद्यार्थी डॉ. संकेत नरवाडे, डॉ. अय्यन पाटील, डॉ. वेदान्त पांडे, डॉ. सुहासिनी हजारे, डॉ. विनोद जाधव, डॉ. साहिल सय्यद, डॉ. ओम होळकर, डॉ. वेंकटेश चव्हाण यांनी अथक मेहनत घेतली.

# अतिखराब रस्त्यावरुन वाहने नेताना वाहनाधारकांची तारेवरची कसरत

## आरळी (खुर्द-बुद्रुक)-काळेगाव रस्ता करण्याची मागणी...

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.२८ डिसेंबर -

तालुक्यातील आरळी (खुर्द) आरळी (बु) काळेगाव हा रस्ता गेली कित्येक वर्षे अतिखराब झाला असुन या भागातील नागरीकांना त्या रस्त्यावुन वाहाने नेत असताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तसेच अनेक अपघातही या रस्त्यावर होत आहेत.

रस्ता खराब असल्याने येथे एसटी महामंडळाने बस सेवाही बंद केलेली होती. त्यामुळे येथील विद्यार्थांना शिक्षणासाठी तुळजापूर येणे अशक्य झाले होते. त्यावेळी गावकऱ्यांनी वर्गनी गोळा करुन स्व-खर्चातुन रस्त्याची डागडुजी केली होती. हा रस्ता करण्यात यावा म्हणुन बऱ्याच वेळा शासन दरबारी गावकऱ्याकडुन पाठपुरावा केला असता हा रस्ता नकाशावर नाही अशा पध्दतीची उत्तरे या विभागाशी निगडीत असलेले जबाबदार अधिकारी देत असुन, काल परवा झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये उमेदवार असलेल्या प्रमुख पक्षांच्या लोकांना गावकऱ्यांनी जाब विचारला असता विधानसभा झाल्यानंतर तुमचा रस्ता लगेच होईल अशा पध्दतीचे आश्वासन दिले गेले असताना सुध्दा आजपर्यंत या रस्त्यासाठी कुठलीही शासकिय हालचाल होताना दिसत नसुन यामुळे या भागातील सर्व नागरीक हैरान झाले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः वैयक्तीक लक्ष घालुन या भागातील या देशाचे नागरीक असलेले, या देशाचे मतदार नागरिक ज्यांना लवकरात-लवकर रस्ता तयार करुन देवुन सहकार्य करावे अन्यथा स्वराज्य पक्ष जिल्हाधिकारी कार्यालयसमोर लोकशाही पध्दतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सदरील निवेदनात दिला आहे.




सदरील निवेदनावर स्वराज्य पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेश गवळी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या स्वाक्षरी आहे.

